# प्रकरण ४ – प्रारंभिक राष्ट्रवाद

## आदिवासींच्या चळवळी

बिटिशांची राजवट या देशात स्थापन झाल्यानंतर वसाहतवाद्यांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याच्कराचा प्रतिकार आदिवासी समाजानेही केला. आदिवासींच्या चळवळी दोन प्रकारच्या होत्या. एक म्हणजे त्यांचे शोषण करणारे जे वर्ग होते त्यांच्याविरुद्ध चालवलेली चळवळ. त्या वर्गात्त जमीनदार, सावकार, व्यापारी, ठेकेदार, सरकारी अधिकारी व खिश्चन मिशनरी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. आदिवासींची दुसरी चळवळ ही भारताच्या स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत होती, आदिवासी जमाती, जमीनदार, सावकार, व्यापारी, ठेकेदार यांना परकीय समजत होत्या. १७६३ पासून आशा उठावांना सुरवात झाली. १८५७ च्या उतावापूर्वी भारतात संन्याशी उठाव (१७६३), चुआर उठाव (१७६८), फकीरांचे बंड (१७७६-१८००), तमार (Tamar) उठाव (१७८९), खेरवारच्या संथाळांची चळवळ (१८३३), हो जमातीचे बंड (१८२०), खासींचा उठाव (१८२४), कुकींचे बंड (१८२६), कोळ्यांचे बंड (१८३१), खोंड जमातीचा उठाव (१८३६), फराईसी व पागलपंथीयांचा उठाव (१८३८), सिंगपो जमातीचा उठाव (आसाम) उमाजी नाईकाचे बंड (१८२६), इत्यादी अनेक उठाव घडून आले होते. इ.स. १८५८ नंतर राष्ट्रवादाची जागृती व प्रसार होवू लागला होता.

## संथाळांची चळवळ :

संथाळ ही आदिवासी जमात असून बंगाल, बिहार, ओरीसा या राज्यात संथाळांची वस्ती सर्वाधिक होती. सुरवातीला ते गंगेच्या खोऱ्यात रहात होते. नंतर ते छोटा नागपूरच्या डोंगराळ भागात वस्ती करून राहू लागले. १८ व्या शतकाच्या शेवटी जंगले तोडण्यास सुरवात झाल्यामुळे त्यानी छोटा नागपूर सोडून ईशान्येकडील राजमहाल टेकड्याकडे वस्ती केली. दमिन-इ-कोई हे त्यांनी आपले केंद्र बनविले. इंग्रजांनी जंगले तोडण्यासाठी व नवीन जमीन लागवडीखाली आणण्यासाठी संथाळांचा उपयोग करून घेतला. इंग्रजांनी त्या भागात जमीनदारी सुरू केली. बरचसे व्यापारी व सावकार त्यांनी त्या भागात आणले. त्यामुळे संथाळांची मोठी पिळवणूक सुरू झाली. संथाळांच्या जमिनी व्यापारी व सावकार यांनी बळकावून त्यांना आपले गुलाम केले. आपल्यावरील अन्याय नाहीसा करण्यासाठी संथाळांनी सुरवातीस सनदशीर मार्गाचा अवलंब केला. पण अधिकारी वर्गाने त्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे संथाळ आक्रमक बनले, त्यांनी हिंसक मार्गाचा अवलंब केला.

इ.स. १८५४ च्या सुमारास माझी व परगणाईत हे आदिवासी जमातींचे पुढारी एकत्रित आले. त्यांनी ३० जून १८५५ रोजी भागानिधी येथे एक सभा घेतली. त्यांनी बंडाचा झेंडा उभारून उपरे व त्यांचे वसाहतवादी धनी यांना हाकलून लावण्याचा निर्णय घेतला. संथाळांचे नेते सिदो व कान्हू यांनी आपल्यावर देवाची मर्जी असून आपण स्वतः इंग्रजांशी लढाई करणार असून त्यात इंग्रजांचा पराभव अटळ आहे असे सांगितले. त्यामुळे आठ हजारपेक्षा जास्त संथाळ एकत्र आले.

ढोल व ताशे ही परंपरागत वाद्ये वाजवताच ते एकत्र येत. साधारणपणे दीड ते दोन हजार बंडखोरांची एक अशा तुकडचा तयार करण्यात आल्या. महाजन, जमीनदार, त्यांची घरेदारे, पोलीस ठाणे, रेल्वेमार्ग बांधण्याचे काम, पोस्ट, वाहने इत्यादी कामे डिकूकडून केल्या जाणाऱ्या शोषणाच्या व वसाहतवादी सत्तेच्या सर्व प्रतिकांवर हे बंडखोर कडाडून हल्ले बढवू लागले. आदिवासी नसलेल्या उपन्या परंतु गरीबांनी आदिवासींना मदत केली. गवळी आणि इतरांनी साधानसामग्री आणि सेवा पुरविल्या, लोहारानी बंडखोरांच्या टोळ्याबरोबर राहून त्यांची शस्त्राचे सज्ज केली.

सरकारने हा उठाव मोडून काढण्यासाठी सैनिकांच्या तुकडचा पाठवून उठाव व्याप्त प्रदेशात लष्करी कायदा पुकारला. बंडखोरांच्या नेत्यांना पकडण्यासाठी दहा हजार रूपयापर्यंत बक्षिसे जाहीर केली. १५००० पेक्षा जास्त संथाळांना ठार केले. अनेक खेडी उद्‌ध्वस्त केली. विश्वासघाताने सियो संधाळास पकडण्यात आले. त्याला १८५५ मध्ये ठार केले. १८६६ मध्ये कान्हू पकडला गेला.

**कोळी व रांपा जमातींचे उठाव :**

इ.स. १८२० नंतर छोटा नागपूर भागातील कोळी जमातीने ब्रिटिशांची सत्ता स्थिरावत असताना उठाव केला. हजारो बंडखोरांना ठार मारल्यावरच ब्रिटिशांची सत्ता या भागात पुन्हा स्थिरावली. आंध्रप्रदेशाच्या किनार पट्टीतील रांपा या डोंगरी आदिवासींनी सरकारच्या पाठींब्याने मनसबदारांनी चालविलेल्या विध्वंसाविरूद्ध व जंगलनिबंधांविरूद्ध १८७९ च्या मार्च महिन्यात उठाव केला. बंडखोरांचा बिमोड करण्यासाठी सरकारच्या पायदळाच्या अनेक, घोडदळाची एक आणि खंदक खोदणाच्या व सुरुंग पेरणाऱ्या सैनिकांची एक अशा कित्येक पलटणी पाठवाव्या लागल्या. इ.स. १८८०च्या शेवटी उठावाचा शेवट झाला.

**सरवारी लराई किंवा मुक्ती लराई चळवळ :**

छोटानागपूरच्या डोंगराळ भागात ही चळवळ उदयास आली. आपल्या प्रदेशातून ब्रिटिशांनी आणलेल्या जमीनदारांना हाकलून देवून आपले जमिनीवरचे प्राचीन काळापासूनचे परंपरागत हक्क पुन्हा मिळविणे हा या चळवळीचा उद्देश होता. शेतजमीनीशी संबंधित चळवळ, पुनरूज्जीवन चळवळ व राजकीय चळवळ अशा तीन टप्प्यात ही चळवळ आकाराला आली. पहिल्या दोन टप्यात जमिनदार आणि त्यांची कुळे यांच्यातील संघर्ष हे वैशिष्ट्ये होते. जमीनदारांनी वाढविलेल्या भाडेपट्ट्याला विरोध करण्यासाठी आदिवासी कुळांनी चळवळ सुरू केली. जमीनदारांनी कर वाढविण्याबरोबर कुळांच्या जमीनी काढून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कुळे आणि जमीनदार यांच्यात वारंवार संघर्ष होऊ लागला. १८९० पासून सरवारी चळवळीने मिशनरी आणि सरकारी अधिकारी अशा सर्व युरोपीयनांच्या विरोधात संघर्ष सुरू केला. अशा युरोपियनांचा जमीनदारांना पाठींबा होता. आपल्यावरील सर्वप्रकारच्या अन्यायाला ब्रिटांश राजवट कारणीभूत आहे असे आदिवासी लोकांना बाटू लागले. त्यामुळे ब्रिटिश राजवटीचा शेवट केला तर आपणास पूर्वीचे चांगले दिवस परत मिळतील असे त्यांना वाटू लागले. सुरवातीस सनदशीर मार्गाने अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. परंतु अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असत, आपणास सनदशीर मार्गाने न्याय मिळत नाही हे पाहून त्यांनी हिंसाचाराला सुरवात केली. धनुल्यबाण, भाले यासारख्या परंपरागत शस्त्रांचा वापर करून जमीनदार व अधिकाऱ्यांच्या हत्या घडवून आणल्या. सप्टेंबर १८९२ मध्ये चळवळीतील लोकांनी ठेकेदार, जमीनदार व जर्मन मिशनरी यांना मारण्याचा कट रचला. परंतु त्यांचा कट फसला, कटाच्या अंमलबजावणीसाठी योग्य नेता व नियोजनाचा अभाव होता. त्यानंतर त्यांना बिरसा मुंडाचे नेतृत्व लाभले.

**मुंडा जमातीचा उठाव :**

इ.स.१८९५ ते १९०१ या काळात बिरसा मुंडा याच्या नेतृत्वाखाली मुंडा या वन्य जमातीने उठाव (अलगुलान) केला. जहागीरदार, ठेकेदार, महसूलाचे मक्तेदार, व्यापारी व सावकार यांनी आदिवासींच्या सामाजिक जमीनमालकी पद्धतीवर घाला घातला होता. त्याविरूद्ध हे मुंडा सरदार तीस वर्ष संघर्ष करीत राहिले.

इ.स. १८७४ मध्ये एका गरीब बटाईदार कुटुंबात जन्मलेल्या बिरसाने जर्मन मिशनरी शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले होते. मिशनऱ्यांवर टिका केल्यामुळे त्याला शाळेतून काढून टाकले. या घटनेने तो युरोपीयनांचा कट्टर विरोधक बनला. तो म्हणत असे 'सर्व साहेब व मिशनरी यांची टोपी एकच आहे' १८९५ मध्ये आपणास दैवी साक्षात्कार झाल्याचे त्याने सांगितले. त्याच्याभोवती जमलेल्या हजारो मुंडा सरदारांनी त्याला नवा धार्मिक संदेश देणारा मुक्तिदाता मानले. मुंडा सरदारांच्या प्रभावाखाली या धार्मिक चळवळीने लवकरच शेतीविषयक व राजकीय आंदोलनाचे स्वरूप धारण केले. गावोगावी फिरून व मोठे मेळावे भरवून बिरसाने आपल्या अनुयायांची धार्मिक व राजकीय संघटना उभारली. १८९९च्या नाताळच्या पूर्वसंध्येला त्याने मुंडा राज्य स्थापन करण्यासाठी बंडाचा झेंडा उभारला, ठेकेदार, जहागीरदार, राजे व अंमलदार आणि ख्रिश्चन मिशनरी यांची हत्या करण्यास बंडखोरांना प्रोत्साहन दिले. प्रचलित कलियुगाऐवजी सत्ययुगाची स्थापना झाल्याचा दावा त्याने केला, उपऱ्या डिकूशी लवकरच लढाई सुरू होईल व त्यांच्या रक्ताने येथील जमीन लाल झेंड्याप्रमाणे लाल होईल असे त्यांने जाहीर केले. बिगर आदिवासी गरीबांना मात्र त्याने त्रास दिला नाही.

मुंडा जमातीच्या मुक्ततेसाठी बिरसाने तलवारी, भाले, कुऱ्हाडी, धनुष्यबाण इत्यादी शस्त्रांनी सज्ज असलेले सहा हजार बंडखोर संघटित केले होते. दुर्दैवाने फेब्रुवारी १९०० मध्ये त्याला अटक झाली. व जून १९०० मध्ये तुरुंगात असतानाच तो मरण पावला, त्याचे बंड फसले. पण बिरसा लोकमानसात एक आख्याखिका बनला.

**गुजरातमधील देवी चळवळ :**

दक्षिण गुजरातमध्ये इ.स.१९२२-२३ च्या दरम्यानं सुरू झालेली देवी चळवळ सुरवातीला सामाजिक चळवळ होती, मांस खाणे, दारू किंवा ताडी पिणे, बकरी किंवा कोंबडी कापणे किंवा विकणे यासारख्या गोष्टीपासून आदिवासी लोकांनी दूर रहावे असा आदेश सालबाई देवीने दिला आहे, असे या चळवळीमध्ये गृहीत धरले होते. दारूपुरवठा करणाऱ्या पारसी आणि जमीनदारांवर बहीष्कार टाकावा. जे लोक देवीचे आदेश मानणार नाहीत त्यांना दुर्दैवाला, कदाचित मृत्युलाही सामोरे जावे लागते असा प्रचारल्यांनी केला. डिसेंबर १९२२ पर्यंत सुरत शहरासह आदिवासी परीसरात ही चळवळ पसरली. आपले शोषण करणाऱ्या वर्गाना या चळवळीने आपले लक्ष बनविले. दारूचा व्यापार करणारे पारसी, सावकार, जमीनदार, मुस्लीम यांच्याबरोबर काम करण्याचे नाकारले. पारसी लोकांची सावली आंगावर पडली तरी आदिवासी आंघोळ करू लागले. सुरवातीला ही चळवळ धार्मिक किंवा सामाजिक स्वरूपाची असली तरी १९२२ पासून असहकार चळवळीचा भाग बनली. परदेशी कपडचांची होळी करा व सरकारी शाळांवर बहिष्कार टाका असे आदिवासींनी सांगण्यास सुरवात केली. जलालपूर तालुक्यातील एका ताडी दुकानदाराला दंड म्हणून राष्ट्रीय शाळेला १२० रूपये देणगी द्यावयास लावली. १९२१पासून बार्डोली तालुक्यात गांधीजीच्या कायकर्त्यांनी आदिवासी समाजात कार्य करण्यास सुरवात केली होती. सविनय कायदेभंग चळवळीपूर्वीच गांधीजींनी आदिवासींना आपल्या चळवळीत सामावून घेण्यास सुरवात केली. आदिवासींनी राष्ट्रीय चळवळीला पाठींबा देण्यास सुरवात केली. काही काळात गांधीजीचे नाव देवी चळवळीशी जोडले गेले, त्यानंतर काँग्रेस नेत्यांनी बाडोलीला भेटी देऊन देवी चळवळीच्या बैठकांना खादी वापरून देवीचा संदेश पसरविण्याचा सल्ला दिला. काँग्रेसने २१ जानेवारी १९२३ रोजी सरदार वल्लभभाई पटेलांच्या अध्यक्षतेखाली कालीपराज परिषद भरविली होती. या परिषदेला २०,००० आदिवासी हजर राहिले, या परिषदेने ताडीची झाडे तोडण्याचा, दारू दुकाने बंद करण्याचा व खादी वापरण्याचा संदेश देणारा ठराव पास केला. त्यानंतरच्या दोन दशकात आदिवासी चळवळीने गांधीजींच्या चळवळीला पाठींबा दिला.

**मीदनापूरमधील आदिवासी चळवळ (१९१८-१९२४) :**

मीदनापूरमधील जंगल महालातील संथाळ, भूमीजी व कुर्मी (महतो) या आदिवासी जमातींनी १७६० मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या विरोधात उठाय केला होता. परंतु ब्रिटिशांनी त्या प्रदेशात आदिवासींच्या जमीन प्रमुखांऐवजी जमिनदारांची नेमणूक केली. १९व्या शतकाच्या शेवटी बाहेरून आलेल्या जमीनदारांनी आदिवासींच्या जमिनीवर अतिक्रमण केले. इतर आदिवासी जमातीप्रमाणेच या प्रदेशातील आदिवासी जमातींचीही जमीनदार, सावकार, व्यापारी, यासारख्या उपऱ्यांकडून पिळवणूक होऊ लागली. आदिवासी जमातीमध्ये या उपऱ्यांबद्दल असंतोष निर्माण झाला,

जंगल महाल आणि शेजारच्या बंकुरा व सिंगभूम पट्ट्यात ब्रिटिशांविरूद्ध आदिवासींनी १९२१ ते १९२३ च्या दरम्यान चळवळ सुरू केली. १९२१ पर्यंत काँग्रेसचा या भागात फारसा संपर्क नव्हता. १९२१ पासून सी. आर. दास यांनी या भागात जागृती सुरू केली. त्यामुळे असहकार चळवळीशी सामांतर चळवळ सुरू झाली, युरोपीयन जमीनदारांनी 'मीदनापूर जमीनदारी कंपनी' स्थापना करून आदिवासींचे शोषण सुरू केले होते. काँग्रेसने जमीनदारी कंपनीविरोधात मोहिम सुरू केली. त्यांच्या जमिनीवर काम करणाऱ्या आदिवासींचा संप घडवून आणला, जमीनदारी कंपनीने न्यायालयात जाण्याचे ठरवले. दरम्यान संपाचे रूपांतर उठावात झाले.

जुलै १९२१ मध्ये २०० संतरत स्त्रियांच्या मोर्चाचे नेतृत्व शैलजानंद सेन यांनी केले. त्यांनी जमीनदारांच्या भाताच्या गाऊचा आडविल्या. मे १९२१ मध्ये काँग्रेसने ७०० संथाळांची एक बैठक घेवून दारू पिण्यापासून दूर रहाण्याचे ठरविले. शैलाजानंद व मुरारी मोहन रॉय यांनी आदिवासींना परदेशी मालावर व विशेषतः कपड्यांवर बहीष्कार घालण्याचे आपल्या भाषणातून अवाहन केले. १९२२ मध्ये परदेशी कपडचावर बहीष्कार घालण्याची मोहिम खूपच प्रसिद्धीस आली. आदिवासींनी काँग्रेसबरोबर आपले चांगले संबंध असल्याचे दाखवून दिले. १९२२ मध्ये चौरीचौरा प्रसंगामुळे गांधीजींनी चळवळ आधनकपणे बंद केली. परिणामी आदिवासींची चळवळ एकाकी पडली व बाहेरच्या संबंधापासून वंचित राहिली.

१५ ते २१मे १९१८ मध्ये मयूरमंजमधील संथाळांनी सरकारच्या विरोधात उठाव केला. आदिवासींची सक्तीने कामगार भरती केली जाणार होती, परंतु संथाळांच्या उठावामुळे सरकारला नोकर भरतीची योजना रह करावी लागली. १४ जून १९१८ रोजी संथाळांनी जंगलकायदा, चौकीदारी कर इ. बंधनांच्या विरोधात उठाव केला, संथाळांच्या एकत्रीत प्रयत्नांमुळे सरकारचे सर्व उपाय कुचकामी ठरले. संथाळांनी उठावाची व्याप्ती वाढवून सरकारच्या सर्व प्रकारच्या दडपशाहीतून सुटका करवून घेण्याचा प्रयत्न चालविला. ऑगस्ट १९२२ मध्ये आदिवासींनी जंगलांचा वापर करणे व तलावातून मासेमारी करणे हे आपले पारंपारिक हक्क असल्याचे ठासून सांगितले. पुढे ही चळवळ केवळ 'मीदनापूर जमीनदारी कंपनी' पुरती मर्यादित न राहता, भारतीय जमीनदारांच्या विरोधातही सुरू झाली.

**माल्वा (Malda) मधील जीतू संथाळची चळवळ :**

इ.स. १९२४ ते १९३२ च्या दरम्यान माल्दा जिल्ह्यातील जमीनदारांच्या विरोधात संथाळांनी चळवळ चालू केली. ही चळवळ राष्ट्रीय चळवळीबरोबर गुंफली गेली. जमीनदारांबरोबरच या संघर्षात्त स्वराज्य पक्षाने कुळांना पाठींबा दिला. त्यामुळे या चळवळीचा नेता जीतू संथाळया स्वराज्य पक्षाबरोबर घनिष्ट संबंध आला. त्यामुळे या चळवळीला हिंदू जातीयवादाची छटा प्राप्त झाली होती. त्याभागातील आदिवासी समाजात काम करणारे स्वराज्य पक्षाचे कार्यकर्ते काशीश्वर चक्रवर्ती 'संन्याशी बाबा' या नावाने ओळखले जात होते. जीतू संथाळच्या मदतीने त्यांनी संन्याशी दल स्थापन केले. त्यांनी आदिवासींना त्यांची आदिवासी म्हणून असलेली ओळख सोडून दिल्यास हिंदू धर्मात त्यांना चांगला दर्जा देण्याचे आश्वासन दिले.

जीतूने १९२८ मध्ये संथाळांना जमीनदारांच्या पिकाची लूट करण्याच्या सूचना दिल्या. त्याने शेतकऱ्यांना कुळांचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर लुटीच्या खूपच घटना घडू लागल्या. ३ डिसेंबर १९३२ मध्ये जीतूने संथाळाच्या चळवळीचे हिंदुत्ववाद्यांच्या चळवळीत रूपांतर केले. पाडुआ या शहरातील आदीना मस्जीद ताब्यात घेऊन तिचे मंदिरात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश राजवटीचा शेवट होऊन आपले स्वतःचे राज्य निर्माण झाल्याचे घोषित केले. त्याचे स्वराज्य पक्षाशी असलेले संबंध आणि हिंदुत्ववादी चळवळीमुळे माल्यामधील राष्ट्रवादी हिंदुनी त्याला पाठिंबा दिला. या चळवळीने संथाळांना हलाखीच्या अवस्थेत आणून सोडले. या चळवळीच्या अपयशाचा परिणाम म्हणजे जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढल्या, कुळांना त्यांच्या जमीनीवरून हाकलून लावले, जमीनदारांनी जावा दराने कर आकरणी करण्यास सुरवात केली, आदिवासीचे इतरही मार्गानी शोषण होवू लागले. या सर्व समस्या १९३०च्या दशकात वाढीस लागल्या.

**ओरिसातील आदिवासी आणि राष्ट्रीय चळवळ :**

ओरीसा आणि बिहारमधील कटक, पुरी, बालासोर, अंगुल, खौडमाला या ओरीसा विभागात ही चळवळ विस्तारित झाली होती. शेतकऱ्यांसह आदिवासी जमातींनी १९२० व १९३०च्या दशकात राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला. त्यांनी असहकार चळवळीत भाग घेऊन कर भरण्यास नकार दिला. फेब्रुवारी १९२२ मध्ये शेतकरी आणि आदिवासींनी जंगलात धाडी घालून जंगल कायदा मोडला. शेतकऱ्यांनी कर भरण्याचे नाकारले. जे कर भरतील त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला. मे १९२१ मध्ये सरकारने १४४ कलम पुकारून अनेक आदिवासींना अटक केली. त्यामुळे भुयान

आदिवासी संतप्त झाले व त्यांनी सुपरीटेडेंटच्या बंगल्याला घेराव घातला. मात्र सरकारने अटक केलेल्यांना न सोडता तुरूंगात टाकले. ही चळवळ हळुहळु शांत पुढील काही दिवसात झाली.

अल्लुरी सीताराम यांच्या रम्पा उठावाने ओरीसातील आदिवासींना जंगल कायद्याविरुद्ध उठाव करण्यास प्रोत्साहित केले. १९२० ते १९३० च्या दरम्यान गुणपूरच्या आदिवासींनी कर न भरण्यासाठी संघर्ष सुरू केला. त्यांनी जंगलविषयक कायदे मोडण्यास सुरवात केली. त्यांना नियंत्रणात आणणे कठीण झाले. खाँड आदिवासींनी सुद्धा कर भरणे बंद केले. त्यांनी पोलीसांवर हल्ले केले. त्यामुळे अनेक जणांना अटक झाली. जमीनदार, सावकार यांची दडपशाही, व शोषण, पिळवणूक आणि दोष पूर्ण जंगल कायदे यामुळे कोरापत आणि गंजम प्रदेशातील आदिवासींनी सविनय कायदेभंग चळवळीला चांगलाच प्रतिसाद दिला.

**आसाममधील आदिवासी चळवळ :**

ब्रिटिशकालीन आसाम प्रांत १८७३ मध्ये आकारास आला. तत्कालीन आसाम प्रांतात आसाम, नागालैंड, मेघालय व मिझोराम इ. प्रदेशाचा समावेश होत होता. याप्रदेशावर ब्रिटिशांचे अतिक्रमण होऊ लागल्याने आदिवासींनी विरोध करण्यास सुरवात केली. आसाममधील आदिवासींनी १८५७ च्या उठावापासून प्रेरणा घेतली. १८६० मध्ये ब्रिटिशांच्या विरोधात दोन प्रमुख उठाव घडून आले. एक म्हणजे जैतीया डोंगराळ भागातील व दुसरा नावांग (Nowgong) प्रदेशातील उठाव. हे उठाव प्रामुख्याने, करामध्ये वाढ झाल्याने घडून आले होते. वाढविलेल्या करांच्या विरोधात खासी या आदिवासी जमातीने आपल्या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली धनुष्य व बाण यांच्या सहाय्याने लढण्यास सुरूवात केली. १८६३ पर्यंत त्यांनी शरणागती स्वीकारली नाही. शेवटी सैन्य पाठवून त्यांना पराभूत केले. १८६० मध्ये नावगाँग जिल्ह्यातील (Poppy) कॉफी उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध संघर्षास सुरवात केली. या संघर्षाचे कारणही वाढविलेला कर हेच होते. तसेच या शेतकऱ्यांना पान आणि सुपारी उत्पादनावरही वाढीव कर घेण्यास सुरवात केली होती, सरकारी अधिका-यांनी वाढविलेल्या कर गोळा करण्यासाठी बळाचा वापर करण्यास सुरवात केली. नावगाँग प्रदेशातील विशेषतः फुलांगुरी भागातील आदिवासींनी ब्रिटिशांच्या विरोधात जोरदार चळवळ सुरू केली. त्यांनी जेंतीया डोंगराळ प्रदेशातील आदिवासींच्या उठावापासून प्रेरणा घेतली होती.

आदिवासी प्रदेश ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्यात समाविष्ट करण्यापूर्वी त्यांची स्वतंत्र आर्थिक आणि सामाजिक जीवनपद्धती होती. जमीन आणि जंगल ही त्यांच्या चरीतार्थाचे प्रमुख साधने होती. ब्रिटिशांनी त्यांच्या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर वसाहतवादी धोरणांचा अवलंब करून आदिवासींची जीवनपद्धती विस्कळीत केली. नवे कायदे जमीनदारी, कारखानदारी, मध्यस्थ, सावकारी इ. सर्व वसाहतवादाचे हस्तक आदिवासी जमातींना आपले शत्रू वाटू लागले. आदिवासी जमातींनी सुरवातीला आशा (डिकू) उपाविरुद्ध संघर्ष चालू केला. नंतर त्यांच्या चळवळीने वसाहतवादा विरोधी स्वरूप धारण केले. त्यांची चळवळ प्रामुख्याने हिंसक स्वरूपाची होती. जमीनदार, सावकार मात्सारख्या उपऱ्यांवर हल्ले करून त्यांना ठार करून त्यांची घरेदारे पेटवून दिली. सरकारने शांतता प्रस्थापित करण्याच्या नावाखाली त्यांना गुन्हेगार जाहीर केले. त्यांना तुरुंगात डांबून अनेकांना फासावर लटकविले. या आदिवासी जमातीच्या चळवळी राष्ट्रीय चळवळीशी फारशा सलग्न नसल्या तरी काही ठिकाणी त्या समांतर होत्या,

वसाहतवादी ब्रिटिशांच्या काळात शेतकरी व आदिवासी या असंघटित सर्वसामान्य जनतेने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी चळवळी उभ्या केल्या व ब्रिटिश सरकार व त्यांच्या मध्यस्थांच्या विरोधात उठाव घडवून आणले. शेतकऱ्यांच्या चळवळी सुरवातीस असंघटीत स्वरूपात होत्या. कालांतराने त्या त्या प्रदेशातील शेतकरी एकसारख्या समस्यांमुळे एकत्र आले. महात्मा गांधीजींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास सुरवात केल्यानंतर शेतकरी चळवळ व राष्ट्रीय चळवळ यांचा संबंध येऊ लागला, सविनय कायदेभंग चळवळीनंतर शेतकरी चळवळीला राजकीय स्वरूप मेऊ लागले. समाजवादी कॉंग्रेस पक्षाच्या स्थापनेनंतर अखिल भारतीय किसान परिषद स्थापन झाली. त्यामुळे शेतकरी चळवळ राष्ट्रीय पातळीवर जाऊन पोहोचली.

आदिवासी चळवळी सुरवातीपासून शेवटपर्यंत आपापल्या भागापुरत्या मर्यादित राहिल्या. त्यांचे दैनंदिन जीवन अवलंबून असलेल्या जमीनपद्धती व जंगले यांच्या वापराच्या पद्धतीत ब्रिटिशांनी बदल घडवून आणला हेच त्यांच्या असंतोषाचे मुख्य कारण होते, आदिवासी जमातींनी आपापल्या जमातीच्या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली हिंसक चळवळी केल्या. जमात्त प्रमुख आपणास दैवी शक्ती प्राप्त झाल्याचे किंवा जादू जादूटोणा येत असल्याचे सांगत.

**शेतकरी चळवळी**

**प्रास्ताविक**

ब्रिटिशपूर्व काळात भारतात ग्रामीण भागात शेतकरी स्वतंत्र होता. त्याचे जमीनीवर नितांत प्रेम होते. जमीन विकणे हा प्रकार क्वचितच होत असे. इंग्रजांच्या आगमनानंतर जमीन महसूल पद्धती, जमीन मालकी इत्यादीमध्ये अमूलाग्र बदल घडून आला. जास्तीत जास्त महसूल मिळविण्यासाठी त्यांनी जमीनदार वर्गाला हाताशी धरुन शेतकऱ्यांची पिळवणूक केली. शेतकऱ्यांनी जुलूम जबरदस्ती, अन्याय अत्याचार, पिळवूणक असह्य झाल्यानंतर प्रतिकाराला सुरवात केली. आपल्या हल्ल्याचे लक्ष कोण हा संभ्रम त्यांच्यात निर्माण झाला. मात्र काही काळातच वसाहतवादी परकीय सत्ता हाच आपला खरा शत्रू असल्याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी वसाहतवादाच्या विरोधात चळवळ सुरू केली.

**शेतकरी चळवळ :**

भारतात ब्रिटिशांच्या पिळवणूकीने शेतक-यांच्या असंतोषाला जन्म दिला. शेतकऱ्यांनी काही काळ अन्याय सहन केला, परंतु सहनशक्ती संपल्यावर आपल्यावर अन्याय करणाऱ्या प्रत्येक गोष्टीला विरोध करण्यास सुरवात केली. १८५८ नंतर राष्ट्रवादाचीही जागृती झाली होती. त्यामुळे राष्ट्रवादी चळवळींची सुरवात झाली. त्यांनी शेतकरी चळवळींना पाठींबा देण्याबरोबर आपल्यात सामावून घेण्याचा प्रयत्न केला.

**बंगालमधील नीळ उत्पादनाविरुद्ध बंड :**

सर्वांना माहीत असलेला शेतकऱ्यांचा पहिला मोठा संघटित उठाव म्हणजे १८५९-६० मध्ये घडून आलेला बंगालमधील नीळ पीकवण्याऱ्या शेतकऱ्यांचा उठाव होय. बंगालमधील नीळ कारखानदार व मळेवाले शेतकऱ्यांना जबरदस्तीने नीळीचे पीक घेण्यास भाग पाडत होते. असे पीक ब्रिटिश कंपनी व व्यापाऱ्यांना कमी दराने विकावे लागत होते. नीळ उत्पादनाने जमीनीचा कस कमी होत असे व कालांतराने जमीनी नापीक होत असत. शेतकऱ्यांनी निळीचे उत्पादन घेण्यास नकार दिल्यास त्यांचा अनेक मार्गानी छळ केला जात असे. प्रसिद्ध बंगाली लेखक दिनबंधू मित्र यांनी १८६० साली 'निलदर्पण' हे नाटक लिहून नीळ उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथांचे चीत्र रंगवले, त्यानंतर शेतकऱ्यांच्या संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होवू लागल्या. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांनी नीळ उत्पादन कमी केले तर काहींनी उत्पादन पूर्वपणे बंद केले. बंगालमधील बुद्धिवाद्यांनी आपले बळ शेतकऱ्यांच्या बाजूने उभे केले. त्यामुळे सरकारला चौकशी आयोग नेमून शेतकऱ्यांचे उठाव सौम्य करण्याचा प्रयत्न करावा लागला, परंतु आयोगाने समस्या सुटल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष कायम राहून त्यांचे उठाव होवू लागले. १८६० च्या शेवटी सरकारने एक आदेश काढून शेतकऱ्यांवर नीळीच्या लागवडीची सक्ती केली जाणार नाही. त्याविषयीचे सर्व तंटे कायदेशीर मार्गानेच सोडविले जातील असे स्पष्ट केले.

**बिहारमधील नीळ उत्पादनाविरुद्ध बंड :**

बिहारमधील नीळ उत्पादक शेतक-यांनी दरभंगा व चंपारण्य याठिकाणी १८६६-६८ च्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर उठाव घडवून आणले पूर्व बंगालमध्ये शेतकऱ्यांनी १८७०च्या दशकात पुन्हा मोठे उठाव घडवून आणले. सामर्थ्यशाली व अन्यायी प्रवृत्तीच्या जमीनदारांनी आपल्या शेतावर काम करणाऱ्या कुळांवर, शेतकऱ्यांवर दडपशाही करणारे अनेक कायदे केले

होते. शेतकऱ्यांच्या जमीनी लुबाडणे, त्यांचा छळ करणे, बेकायदेशीरपणे त्यांची मालमत्ता जप्त करणे, इत्यादी अनेक मार्गांनी त्यांची पिळवणूक चालवली होती. जमीनीवरील कर मोठया प्रमाणात वाढविले होते. शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीवरील ताबा मिळवण्यापासून वंचित ठेवले. प्रत्येक वेळी सरकारी अधिकारी जमिनदारांची बाजू घेत. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळत नव्हता. १८७२ ते १८७६ या काळात शेतक-यांनी कर देण्यास नकार दिला. जमीनदार व त्यांचे गुमास्ते यांच्याविरूद्ध शेतकऱ्यांचे उठाव घडून येवू लागले. सरकारने दडपशाहीचे कायदे करून शेतकऱ्यांची चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. सरकारने शेवटी जमीनदारांच्या दडपशाहीवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

**दक्षिणेतील शेतकऱ्यांचे बंड :**

इ.स.१८७५ मध्ये महाराष्ट्रातील पुणे व अहमदनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांचे उठाव घडून आले. सरकारने महाराष्ट्रात रयतवारी महसूल पद्धत लागू केली होती. त्यामुळे जमीनदार व मध्यस्थांचा त्रास नव्हता, मात्र महसूलाचा दर खूपच मोठा होता. तो महसूल शेती उत्पात्रातून भरणे शक्य नव्हते. त्यांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे. हे सावकार प्रामुख्याने मारवाडी व गुजराथी महाराष्ट्रात बाहेरून आलेले होते. कर्ज देताना ते शेतकऱ्यांबरोबर गहाण व्यवहार करीत असत. ते मोठ्या प्रमाणावर व्याज आकारणी करीत शेतकऱ्यांची सही घेतलेल्या कागदपत्रात परस्पर बदल करून सावकार जमीन आपल्या ताब्यात घेत असत. त्यामुळे शेतकरी व सावकार यांच्यात तणाव निर्माण झाले. अमेरिकेतील मादवी युद्ध संपुष्टात आल्यानंतर कापसाचे वाढलेले भाव कमी झाले. याचवेळी सरकारने शेतसारा वाढविला. त्यामुळे परिस्थिती आणखीनच बिघडली.

सन १८७४ मध्ये शिरूर तालुक्यातील करडे या गावी कालुराम नावाच्या सावकाराने १५०/- रूपये कर्जाच्या वसुलीसाठी बाबासाहेब देशमुख या शेतकऱ्याचे घर जप्त करण्याचे आदेश न्यायालयाकडून मिळविले, गावकऱ्यांच्या विनंतीला न जुमानता घर पाडले. परिणामी सर्व उपन्या सावकारांनी आपल्या मागण्या मान्य कराव्यात यासाठी गावातील शेतकऱ्यांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. गावकरी त्यांच्या दुकानातून वस्तू विकत घेईनात व बलुतेचार त्यांना कोणतीही सेवा देत नव्हते. सावकार गावे सोडून तालुक्याकडे निघाले. आशा बहिष्काराची चळवळ लवकरच अहमदनगर, पुणे, सोलापूर व सातारा जिल्ह्यात पसरली, जेव्हा या सामाजिक बहिष्काराचा फारसा परिणाम होईना तेव्हा बहिष्काराचे रूपांतर शेतक-याध्या उठावात झाले. पारनेर तालुक्यात सुपे या गावात शेतकऱ्यांनी १८७५ मध्ये सावकारांच्या घरावर व पेढयांवर हल्ले सुरू केले. शेतकऱ्यांनी आपली कागदपत्रे मिळवून त्यांची होळी केली. या मोहिमेचाही प्रसार झाला. आंदोलन दडपण्यासाठी सरकारला लष्कर व पोलीस यांची मदत घ्यावी लागली. सुमारे एक हजार शेतकऱ्यांना कैद केले. हे आंदोलन एवढे जबरदस्त होते की सरकारला शेतकऱ्याविरुद्ध साक्षीदारसुद्धा मिळाले नाहीत. शेवटी सरकारला दक्षिण बंड आयोगाची स्थापना करावी लागली. शेतकरी बंड करण्यास उद्युक्त का झाले माची चौकशी करण्याचे काम आयोगावर सोपविले. सरकारने ॲग्रिकल्पचर रिलीफ ॲक्ट (Agriculture Relief Act) पास केला. त्यानुसार काही प्रमाणात सावकारांपासून शेतकऱ्यांना संरक्षण मिळाले.

**चंपारण्य सत्याग्रह:**

काही बिहारी तरुणांनी चंपारण्य येथील शेतकऱ्यावरील अन्यायाकडे १९१६ साली झालेल्या काँग्रेसच्या लखनौ अधिवेशनात. या प्रश्नाकडे गांधीजीचे लक्ष वेधले. गांधीजी चंपारण्य येथे मोतीहारी या गावी गेले असता सरकारने त्यांना जिल्हाबंदीचा आदेश दिला. तो आदेश मोडला व त्यांनी कैसर-ए-हिंद हे सुवर्णपदक सरकारला परत केले, त्यांनी सरकारला आपण शिक्षा भोगण्यास तयार असल्याचे कळविले.

चंपारण्य जिल्ह्यात नीळीच्या शेतीचे मालक इंग्रज होते ते स्थानिक शेतकऱ्यांवर जुलूम जबरदस्ती करीत होते. निळीची शेती करण्यासाठी जबरदस्ती करत होते. शेतकऱ्यांमध्ये प्रतिकार करण्याची क्षमता नव्हती. गांधीजींनी

शेतकऱ्यांसाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यांच्या सत्याग्रहापुढे सरकारला नमते घ्यावे लागले. सरकारने त्यांच्यावरील खटला काढून घेतला. शेतकऱ्यांच्या परिस्थितीत त्यांना सुधारणा कराव्या लागल्या.

**खेडा चळवळ :**

कलकत्ता येथील काँग्रेसच्या अधिवेशनानंतर खेडा जिल्ह्यातील दुष्काळाकडे महात्मा गांधीजींनी लक्ष दिले. पाऊस न पडल्याने लोकांची पिके बुडाली होती. तेथील शेतकरी दुष्काळी परिस्थितीमुळे शेतसारा देवू शकत नव्हते. दुष्काळी कायद्यानुसार शेतकऱ्यांना शेतसाऱ्यातून सुट मिळावयास हवी होती. परंतु सरकारने सारा माफ करण्याऐवजी सारा वसुलीबाबत शेतकऱ्यांवर जुलुम करावयास सुरुवात केली. त्यामुळे गांधीजीनी साराबंदीची चळवळ खेडा जिल्ह्यात सुरू केली. शेतकरी सरकारला सारा देणार नाहीत अशा घोषणेने चळवळीला सुरवात झाली. ही चळवळ यशस्वी झाली. याच चळवळीदरम्यान सरदार पटेल व गांधीजी यांचे संबंध निर्माण झाले.

**मोपला बंड :**

आठव्या व नवव्या शतकात केरळमध्ये येवून स्थायिक झालेल्या मुस्लिम शेतकऱ्यांना मोपला असे म्हणत. ते हिंदू जमीनदारांचे पट्टेदार म्हणून काम करीत. १९व्या शतकात जास्त कर, पट्टेदारीबाबत निश्चितता नसणे, इत्यादीबाबत त्यांच्या जमीनदारांबरोबर तक्रारी होत्या, त्यामुळे त्यांनी केरळमध्ये लहान मोठे २२ उठाव घडवून आणले. त्यात मोपल्यांनी हिंदु जमीनदार व अधिकाऱ्यांच्या हत्या केल्या. सरकारने मात्र त्यास धार्मिक दंगली असे नाव दिले. १९२१ मध्ये मोपल्यांनी मोठ्या प्रमाणावर बंडाला सुरवात केली. मोपल्यांच्या नेत्याला पकडण्यासाठी इंग्रज अधिकाऱ्याने तिरूरांगडीच्या मशिदीत प्रवेश केल्याने बंडाला सुरवात झाली. हिंदु सरकारला मदत करतात असा संशय असल्याने हिंदुंच्या विरोधात हिंसाचाराला सुरूवात झाली. बंड शमल्यानंतर हिंसाचाराला बळी पडलेल्या हिंदुंना आर्य समाजाने सर्वतोपरी मदत केली.

**मुळशी सत्याग्रह:**

पुण्याजवळ मुळशी येथे वीजनिर्मीतीसाठी धरण बांधण्यात येणार होते. धरणग्रस्तांना फारच कमी मोबदला देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. त्यामुळे सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली मुळशी सत्याग्रह घडून आला.

**बाोली सत्यागह :**

महसूल दराची दर वहा वर्षानी फेरतपासणी होत असे. त्याप्रमाणे गुजराथमध्ये फेरतपासणी झाली. तेव्हा २५% साऱ्यात वाढ झाली होती. शेतकऱ्यांनी पटेलांची भेट घेतली. पटेलांनी अर्ज, विनंत्या करून पाहिले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे पटेल यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाला सुरवात झाली. सरकारी अधिकाऱ्यांनी दडपशाहीचे धोरण अवलंबिले. शेतकऱ्यांचा अनेक मार्गानी छळ केला. परंतु शेतकरी डगमगले नाहीत. अखेर पटेल व सरकार यांच्यात तडजोड घडवून आणली. त्यानुसार अत्याचारांच्या चौकशीसाठी एव समिती नेमण्याचे सरकारने मान्य केले.

**कृषक संघमः**

केरळमध्ये समाजवादी काँग्रेस पक्षाच्या प्रयत्नामुळे शेतकरी चळवळ उभारण्यात आली. १९३४ पासून संघटनेच्या बांधणीला सुरवात केली. सरंजामी पट्टी रद्द करावी, जमीन धारणा नुतनीकरण शुल्क रद्द करावे, आगाऊ खंड वसुली रह करावी, इत्यादी मागण्यासाठी जमीनदारांकडे मोर्चा काढून आपल्या मागण्या मान्य करून घेत, कर्षक संघमने कुळकायदा दुरुस्तीसाठी आंदोलन करून ६ नोव्हेंबर १९३८ हा दिवस कुळकायदा दुरूस्तीदिन म्हणून पाळण्यात आला. कालीकत जवळ चेवायूर येथे अखिल मलबार कर्षक संघमचे संमेलन घेण्यात आले. पी. कृष्ण, पिल्लाई हे संमेलनाचे अध्यक्ष होते. समेलनात कुळकाद्यात दुरूस्ती करण्यात यावी म्हणून ठराव पास केला गेला होता.

**आंध्रप्रदेश शेतकरी चळवळ :**

आंध्रप्रदेश जमीन महसूलाच्या वाढलेल्या दरामुळे शेतकरी वर्गाने आंदोलन सुरू केले. त्याचबरोबर जमीनदारी पद्धतीविरूद्ध आंदोलनालाही सुरवात झाली, आंध्रप्रदेशात कुळ कायद्याच्या समस्येने सर्व शेतकऱ्यांना एकत्र आणले. आंध्रप्रदेशातील किनारपट्टीवरील शेतकऱ्यांत विशेष जागृती झाली होती. त्याभागात 'आंध्रप्रदेश स्यत संघटना', 'आंच जमीन रयत संघटना', 'भारतीय शेतकरी संस्था' इत्यादी संघटना स्थापन झाल्या होत्या, त्यांनी सरकारविरुद्ध तसेच जमीनदारांविरूद्ध लढा दिला. १९३७ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराने जमीनदार पक्षाच्या उमेदवाराधा पराभव केला. शेतकन्यांनी बोब्बिली व मुंगाला येथील जमीनदारांविरूद्ध आंदोलन केले. जमीन कसण्याच्या व मासेमारीच्या प्रश्नावरून कालीपटनम् येथील जमीनदारांविरूद्ध आंदोलन करण्यात आले. १९३८ साली आंध्रप्रदेश शेतकरी परिषदेने काढलेल्या मोर्चात २००० शेतकरी सहभागी झाले होते. सततच्या मौर्याने शेतकरी वर्गात जागृती घडून आली होती.

**पंजाबमधील शेतकरी चळवळ :**

इ.स. १९३०च्या दरम्यान पंजाबमध्ये किसान सभा स्थापन झाल्या होत्या, त्यामुळे शेतकरी वर्गात जागृती झाली होती. १९३७ मध्ये 'नौजवान भारत सभा', 'कीर्ती किसान काँग्रेस' व अकाली दलाच्या कार्यकत्यांनी विशेष प्रयत्नांनी शेतकरी वर्गात जागृती घडवून आणली, पंजाबमधील प्रांतीक मंत्रीमंडळात जमीनदारांचे प्राबल्य होते. त्यामुळे शेतकऱ्यांचा रोख त्यांच्या दिशेने होता. सरकारने कालव्यावरील करात विलक्षण वाढ केल्याने शेतकरी संघटनांनी मोर्चा काढण्याचे ठरविले. शेतकयांनी जिल्हा मुख्यालयांवर मोर्चे काढले. लाहोर येथील मोर्चा विशेष प्रभावी ठरला, शेतक-यांनी स्वतः होवून अटक करून घेतली.

मुलतानमध्ये मॉटगोमरी जिल्ह्यात अनेक खाजगी संस्थांनी कालवा वसाहती क्षेत्रात सरकारकडून जमीनी खंडाने घेतल्या होत्या त्याठिकाणी बटाईदार जमीनी कसत होते. जमीनदारांनी त्यांच्यावर पूर्वी कायद्याने रद्द केलेले कर लावले. ते देण्यास त्यांनी नकार दिला. त्यामुळे शेतकरी नेत्यांनी शेतकऱ्यांत जागृती करून संप पुकारला. शेतकऱ्यांनी तयार झालेला कापूस तोडण्यास नकार दिला. अखेर जमीनदारांना नमते घ्यावे लागले.

**पूर्व भारत :**

**बिहार:** स्वामी सहजानंद सरस्वतींनी बिहार प्रांतात शेतक-यांचे संघटन केले. त्यांचेसहकारी कार्यानंद शर्मा, राहूल सांकृत्यायन पंचानन शर्मा, मदुनंदन शर्मा इत्यादींनी गावोगाव फिरून जागृति केली. त्यासाठी शेतकन्यांचे मेळावे, सभा, संमेलने, निदर्शने यांचे आयोजन केले. १९३५ मध्ये किसान सभेने जमीनदारी नष्ट करण्याची घोषणा केली. ती अतिशय लोकप्रिय झाली. १९३८ मध्ये पाटण्यात एक लाख शेतक-यांचा मेळावा घेण्यात आला. त्यात बेकायदेशीर कर रह करावेत, कुळांकडून जमीनी परत घेवू नयेत इ. मागण्या करण्यात आल्या. कुळांकडून काढून घेतलेल्या जमीनी परत द्याव्यात या मागणीसाठी रेबोरा येथे झालेले आंदोलन यशस्वी झाल्याने दरभंगा जिल्ह्यात आशा आंदोलनांची सुरवात झाली. सरण जिल्ह्यात चळवळीचे नेतृत्व जमुना कारजी बाने केले. या चळवळींनी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला, याउलट जमीनदारांनी दहशतीच्या मार्गाचा अवलंब केला. पोलीसांनी शेतकऱ्यांना अटक करूनही चळवळ आटोक्यात येईना. शेवटी जमीनदारांना काही सवलती द्याव्या लागल्या.

**बंगाल:**

बंगालमध्ये जमीनधारणेची शास्वती मिळणे, सरंजामी कर रह करणे, इतर करांचे प्रमाण कमी करणे, कर्जमाफी, कर्जात सवलत मिळणे, इत्यादी मागण्यांसाठी शेतकरीवर्ग संघटित झाला. बंकीम मुकर्जी याच्या नेतृत्वाखाली बरद्वान मधील शेतकऱ्यांनी दामोदर कालवा पाणीपट्टीवरून आंदोलन केले. एप्रिल १९३८ मध्ये २४ परगण्यातील शेतकऱ्यांनी कलकत्त्यात आपला मोर्चा नेला व बऱ्याच मागण्या मान्य करून घेतल्या.

इ.स. १९४६ मध्ये बंगालमधील बराईदारांनी ही चळवळ सुरू केली. बंगाल जमीन महसूल आयोगाने (फ्लाऊड कमिशन) केलेल्या शिफारशीमुळे बराईदारांनी जमीनदरांना १/२ ऐवजी १/३ उत्पन्न देण्याचे ठरविले. तसेच धान्याचे वाटप होईपर्यंत धान्य जमीनदारांच्या गोदामात न ठेवता आपल्या ताब्यात ठेवण्याचे ठरविले. हजाँग येथिल शेतकऱ्यांनी आपल्याकडून वस्तुरूपात खंड घेण्याऐवजी पैशाच्या स्वरूपात घ्यावा अशी मागणी केली. शेतकरी सभेच्या नेतृत्वाखालील या चळवळीने जमीनदार विरूद्ध कुळे असे स्वरूप धारण केले. त्यातच सुहावर्दी मंत्रीमंडळाने "बंगाल बरजदार टेंपररी एभुलेशन बील" कलकत्ता गॅझेटमध्ये प्रसिद्ध केले. त्यामुळे आपल्या मागण्या मान्य होणार असे दिसताच शेतकऱ्यांनी आपली चळवळ सुरू केली. शेतकरी व जमीनदार यांच्यात संघर्ष होवू लागले. जमीनदार व सरकारच्या दडपशाहीमुळे ही चळवळ १९४७ मध्ये जवळ जवळ संपुष्टात आली.

**ओरीसा :**

ओरीसातील शेतकरी चळवळीने ओरीसा प्रदेश काँग्रेस समितीकडून शेतकरी जाहीरनामा मंजूर करुन घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले. १९३७ मध्ये आलेल्या मंत्रीमंडळाने शेतीविषयक कायद्याचा मसूदा मांडला. वेठबिगारी नष्ट करणे, खंडाचे प्रमाण कमी करणे या उद्देशांनी बळवळ चालविण्यात आली. या चळवळीत आदिवासी जमातीही सामिल झाल्या. धनकानाला या संस्थानात मौतचा दंगली झाल्या. जमीनदारांच्या जुलमामुळे अनेक शेतकऱ्यांनी त्या संस्थानातून स्थलांतर केले.

**आसाम :**

आसाममधील सुरमा खोऱ्यात खंडबंदीची चळवळ सुमारे सहा महिने सुरू होती. करुणासिंधू रॉय यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी कुळकायद्यात दुरूस्ती करण्यात यावी म्हणून आंदोलन सुरू केले.

**इतर प्रांत:**

गुजराथमध्ये वेठबिगारीचे (हाळी बांधुआ) निर्मुलन व्हावे यासाठी चळवळ करण्यात आली. त्यात यशही मिळाले. याशिवाय मालगुजारी नष्ट व्हावी, शेतकऱ्यावरील कराचे प्रमाण कमी व्हावे, कर्जवसुली थांबवावी, इत्यादी कारणासाठी शेतकऱ्यांनी नागपूरपर्यंत मोर्चा नेला होता. खेड व सुरतच्या शेतक-यांनी कर मरण्यास नकार दिला. त्यामुळे सरकारच्या रोषास बळी पडावे लागेल म्हणून त्यांनी बडोदा संस्थानात आश्रय घेतला. तरीसुद्धा सरकारने त्यंची मालमत्ता जप्त केली. उत्तर प्रदेशात गांधी-अयर्वीन करार झाल्यानंतरही महसूल बंदी चळवळीचे रूपांतर खंडबंदी चळवळीत झाले. महात्मा गांधीनी एक जाहीरनामा काढून त्यात शेतक-यांनी कायदेशीर खंडाच्या ५०% खंड सरकारी तिजोरीत भरावा असे घोषित केले.

**अखिल भारतीय किसान सभा :**

सविनय कायदेभंगाच्या चळवळीतून पुढे आलेल्या तरुण वर्गाने शेतकरी संघटना स्थापन करणे व आहेत त्या संघटना मजबूत करणे मावर भर दिला. १९३४ मध्ये समाजवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झल्यानंतर डाव्या गटाला कार्य करण्यास वाव मिळाला. त्यातूनच शेतकऱ्यांच्या चळवळीत योग्य समन्वय साधण्यासाठी 'अखिल भारतीय किसान परिषद' स्थापन करण्यात आली, त्यासाठी एन. जी. रंगा व इतर शेतकरी नेत्यांनी पुढाकार घेतला. या परिषदेचे पुढे 'अखिल भारतीय किसान सभेत रूपांतर झाले. किसान चळवळीचे प्रवर्तक म्हणून एन. जी. रंगा यांना ओळखले जाते. १९३७ नंतर गांधीजीनी ग्रामोद्योगावर भर दिला होता. त्याउद्देशाने फैजपूर येथे १९३८ साली काँग्रेसचे ग्रामीण भागातील पहिले अधिवेशन भरविण्यात आले. पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली या अधिवेशनात गांधीजी 'जमीन सरकारची नाही, जमीनदारांचीही नाही तर ती कसणाऱ्यांची आहे' असे आपल्या भाषणात म्हटले.

मुंबई येथील अखिल भारतीय किसानसमीतीच्या बैठठकीत किसान जाहिरनामा पूर्णत्वास आला. जाहिरनाम्यावर फैजपूर अधिवेशनाचा प्रभाव जाणवत होता. जमिन महसूल व खंडाचे प्रमाण पन्नास टक्क्यांनी कमी करावे. शेतकऱ्यांवरील कर्ज स्थगित करावे. सरंजामी पट्टी रद्द करावी. कुळांची जमीनधारा संरक्षित करावी. शेतमजूरांना योग्य वेतन मिळावे. किसान संघटनांना अधिकृत मान्यता मिळावी. इत्यादी प्रमुख मागण्या या जाहीरनाम्यात होत्या.

१९३७ साली काँग्रेसभी मंत्रीमंडळे सत्तेवर माल्यानंतर शेतक-यांसंबंधीत कारावे पास केले. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, आर्थिक मंदीच्या काळात शेतकऱ्यांचा जप्त केलेल्या जमीनी त्यांना परत मिळाव्यात व कुळांचे जमीनधारणेचे हक्क कायम रहावेत यासंबंधीचे कायदे पास केले. प्रांत, जिल्हा, तालुका, गाव अशा विविध स्तरावर शेतकरी परिषदा व बैठका होवू लागल्या. आशा परिषदांना भारतीय काँग्रेस नेते हजर राहून मार्गदर्शन करीत आणि शेतकरी परिषदांद्वारे राष्ट्रीय जागृती करत.

**शेतकरी सभा :**

९ एप्रिल १९३९ रोजी अखिल भारतीय किसान सभेचे अधिवेशन गया येथे भरले. अध्यक्षपद नरेंद्रदेव यांनी भूषविले. सुमारे एक लाखापेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते. शेकतकऱ्यांच्या मागण्यांकडे काँग्रेसने लक्ष द्यावे व शेतक-यांनी काँग्रेस ही संघटना आपलीच आहे असे समजावे. लवकरच महायुद्ध सुरू होईल. काँग्रेसने देशव्यापी लवा द्यावयाचे ठरवले आहे. अशावेळी शेतक-यांनी काँग्रेसला मदत करावी असे ठरवण्यात आले.

३ सप्टेंबर १९३९ रोजी दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्यामुळे शेतकरी चळवळ थंडावली. सुरवातीला शेतकरी नेते महायुद्धात सरकारच्या विरोधात होते. परंतु हिटलरने रशियावर आक्रमण केल्याने व रशियाने दोस्तांच्या बाजूने भाग घेत्ताच भारतातील साम्यवादी पक्षाने सरकारला पाठींबा दिला. त्यामुळे साम्यावादी शेतकरी नेते साम्यवादी नसलेले शेतकरी नेते यांच्यात दुही निर्माण झाली. पुढे भारत छोडो आंदोलन सुरू झाल्यावर साम्यवादी व राष्ट्रवादी नेते यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यामुळे शेतकरी समेत १९४३ साली विभाजन झाले. त्याचवर्षी बंगालमध्ये दुष्काळ पडला. त्यामुळे दैनंदिन वस्तू महाग झाल्या. त्यांचा तुटवडा निर्माण झाला. तेव्हा शेतकरी सभेने तो दूर करण्याचा प्रयत्न केला. महायुद्धानंतर सत्तांतराविषयी वाटाघाटी सुरू झाल्या. त्याबरोबर शेतकन्यांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले. जमीनदारी पद्धात नष्ट व्हावी म्हणून मागणी करण्यात येऊ लागली, आंध्रप्रदेश, त्रावणकोर, तेलंगणा इत्यादी ठिकाणी त्याचे पडसाद उमटू लागले.

सुरवातीला शेतकऱ्यांची चळवळ त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरूद्ध होती. या चळवळीत शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर असल्याने ही जनसामान्याची चळवळ होती. त्यांचा रोख परदेशी मळेवाले, जमीनदार व सावकार यांच्या विरूद्ध होता. या चळवळींचा प्रादेशिक विस्तारही मर्यादित होता. दीर्घकालीन सातत्य व संघटन यांचा अभाव होता. अत्यांतिक जुलूम अवाजवी व असामान्य शोषण व पिळवणूक आणि आपली शेती जाण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतरच शेतकरी उठाव करीत असत. जमीनदारी व सावकारी पद्धती घ्या विरोधात त्यांचा लवा नव्हता. तर जमिनीवरून हाकलून लावले जाईल, अवाजवी कर आकारणी व सावकाराची फसवाफसवी यांना त्यांचा प्रखर विरोध होता. अशिक्षित, आडाणी व निःशस्त्र असूनही

शेतकऱ्यांचे अत्तामान्य धैर्य, समर्पण भावना, संघटनांची कुवत, जात व धर्म यांच्या पलीकडे जाणारी ऐक्य मावना इत्यादींची प्रचीती या लक्चात दिसून आली. शेतकरी चळवळींचा वसाहतवादास विरोध नव्हता, वसाहतवादाची नवी व गुंतागुंतीची प्रक्रिया जाणून घेण्याची त्यांची कुवत नव्हती. त्यासाठी बुद्धीजीवी विचारवंत वर्गाची गरज होती. १९३७ नंतर काँग्रेसने शेतकरी चळवळींना काँग्रेसमध्ये सामावून घेण्याचा व आपल्या चळवळीला पाठींबा मिळवण्याचा प्रयत्न केला. या चळवळींचा प्रादेशिक विस्तार मार्यादित असला तरी वेगवेगळ्या प्रांतात अवलंविण्यात आलेले चळवळीचे मार्ग साधारणतः सारखेच होते. स्वातंत्र्य चळवळीच्या शेवटच्या कालखंडात शेतकरी चळवळ व स्वातंत्र्य

चळवळ नेहमी एकमेकींवर आधारित होत्या. शेतकरी चळवळीने राष्ट्रवादी भूमिका स्वीकारल्यामुळे राष्ट्रीय जागृती शहरापासून खेड्यापर्यंत जाऊन पोहोचली.

## १८५७ चा उठाव

### १.१ प्रस्तावना

जगाच्या इतिहासात १८ वे शतक हे अत्यंत क्रांतिकारक समजले जाते. या कालावधीत युरोपच्या इतिहासात अभूतपूर्व घटना घडल्या त्यामुळे युरोपाच्याच काय संपूर्ण जगाच्या इतिहासास एक नवीन कलाटणी मिळाली. ह्या अभूतपूर्व घटना म्हणजे युरोपात घडून आलेल्या औद्योगिक क्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांती या दोन क्रांतीकारी घटनांमुळे जुने जग ढवळून निघाले. औद्योगिक क्रांतीमुळे तर युरोपचा चेहरामोहरा बदलून गेला. युरोपच्या राजकीय इतिहासात फ्रेंच राज्यक्रांतीला तर अभूतपूर्व महत्त्व आहे. जमीनदारी, सरंजामशाही व हुकूमशाही इत्यादी बाबी नष्ट करुन या राज्यक्रांतीने आधुनिक जगात लोकशाहीचा पाया घातला असेच म्हणावे लागेल. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे एक नवीन युग अस्तित्वात आले.

भारताच्या दृष्टीनेही १८ वे शतक महत्त्वाचे ठरले. व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या विविध बुरोपीय राष्ट्रांनी खरे रूप दाखविण्यास प्रारंभ केला. त्यातूनच भारतात इंग्रजी सत्तेचा पाया रोवला गेला. भारताच्या इतिहासास एक वेगळे वळण मिळाले. मावृष्टीने अठराव्या शतकाच्या मध्यकाळात झालेली प्लासीची लढाई (१७५७) म्हणजे इंग्रजी सत्तेची सुरुवाल मानली जाते.

**उठावाची पार्श्वभूमी**

३१ डिसेंबर १६०० रोजी इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिने ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील राष्ट्रात व्यापार करण्याची सनद दिली. राणी एलिझाबेथचा ईस्ट इंडिया कंपनीला केवळ पाठिंबाच होता असे नव्हे तर ती कंपनीची भागीदारही होती. हातात तराजू घेऊन भारताच्या भूमीवर पाऊल ठेवलेल्या या कंपनीने स्वतः घ्या हितसंबंधाच्या रक्षणाकरिता लवकरच दुसऱ्या हातात तलवार घेतली व हा बळावर १९ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत भारत आपल्या नियंत्रणाखाली आणला. ब्रिटीश भारताचे स्वामी बनले. व्यापाराची मिळालेली सनद खिशात घालून भारतात आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने पश्चिम किनाऱ्यावर आपले पहिले व्यापारी केंद्र १६०८ मध्ये सुरत येथे प्रस्थापित केले. नंतरच्या काळात भारताचे सत्ताधिश बनलेल्या ब्रिटीशांना भारतात व्यापार करण्याचे हक्क मिळविण्यासाठी मोगल बादशहा व त्यांचे प्रांतिक सुभेदारांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागल्या. हजारो मैलावरुन व्यापाराकरिता आलेले इंग्रज भविष्यात भारतीय स्वातंत्र्यावर घाला घालतील हे मोगल सत्ताधीशांना त्यावेळी कसे कळणार ? कंपनीने चालविलेल्या व्यापारामुळे भारतीय कारागीर, व्यापारी यांचा फायदा होतो शिवाय केंद्रीय तिजोरीत भर पडते, एवढेच त्यावेळी त्यांना कळत होते. सागरावर प्रबळ असलेल्या ब्रिटीशांमुळे भारताचा इराण, पूर्व व पश्चिम आशिया, उत्तर व पूर्व आफ्रिका येथील व्यापार व मक्केकडील सागरीमार्ग धोक्यात येऊ शकतो याची शक्यतो जाणीव न झाल्याने मोगलांनी त्यांना भारतात व्यापाराची परवानगी दिली.

१७ व्या व १८ व्या शतकात कंपनीला प्रामुख्याने दोन गोष्टी हव्या होत्या, एक म्हणजे भारत व पूर्वेकडील अन्य राष्ट्रांशी एकतंत्री व्यापार व दुसरी म्हणजे भारतातून माल खरेदी करण्याच्या व तो विकण्याच्या बाबतीत त्यांना युरोपीय काय पण भारतीय व्यपाऱ्यांशीही स्पर्धा नको होती त्यांना व्यापाराची मक्तेदारी हवी होती. कंपनी व्यापाराकरिता भारतात येण्यापूर्वीच पोर्तुगीज व उच व्यापार कंपन्या भारतात कार्यरत होत्या. १६ व्या शतकाच्या प्रारंभीच पोर्तुगीजांनी दीव, दमन, गोवा इ. ठिकाणी आपल्या वखारी स्थापन केलेल्या होत्या. डचांचे लक्ष प्रामुख्याने आग्नेय आशियातील मसाल्यांच्या बेटांवर असले तरी भारतातही सुरत, भडोच, अहमदाबाद, कोचीन, पाटणा, आग्रा इत्यादी ठिकाणी त्यांची व्यापारी केंद्रे भरभराटीस आली होती. पण अठराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत ह्या स्पर्धक कंपन्याची भारतातून हकालपट्टी करण्यात ईस्ट इंडिया कंपनीला यश मिळाले. एवढेच नव्हे तर भारताचा व्यापार, संपत्ती व प्रदेश या सर्वच बाबतीत

कंपनीचा एक बलशाली स्पर्धक बनलेल्या फ्रेंचानाही त्यांनी १७४४ ले १७६३ या काळात पराभूत केले इ.स. १७५७ ते इ.स. १८:५६ पर्यंत ब्रिटीशांनी अनेक मार्गाचा अवलंब करुन प्रचंड साम्राजविस्तार केला.

**१८५७ च्या उठावाची विविध कारणे :**

इ.स. १८५७ मध्ये जो महान संघर्ष झाला तो काही अचानक निर्माण झाला नव्हता. जेव्हापासून भारतात इंग्रजी साम्राज्याचा पाया घातला गेला तेव्हापासून कारणांना सुरुवात झाली होती. हळूहळू ब्रिटीश राजवटीविरुध्द असंतोष निर्माण होऊन तत्कालीन कारणांमुळे एकदम स्फोट झाला होता. थोडक्यात ब्रिटीशांच्या अन्यायी धोरणामुळे जो असंतोष निर्माण झालेला होता त्याचा उद्रेक म्हणजे १८५७ चा संघर्ष होय. १८५७ च्या उठावाची विविध कारणे खालीलप्रमाणे :

**राजकीय कारणे :**

अ) **इंग्रजांचे साम्ग्रज्यवादी धोरण :**

रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंगज, लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टिंग्ज यांनी पुढे रेटलेले आक्रमक साम्राज्यवादी धोरण पाहून भारतीयांना इंग्रजाबद्दल तिरस्कार वाटू लागला. त्यांच्या राजनीतिक व कूटनीतिक कारकमामुळे इंग्रजाबद्दल चीड निर्माण होऊ लागली पुढे साम्राज्यवादी धोरणाचा अवलंब करुन इंग्रजांनी भारताचा सर्व भाग आपल्या ताब्यात आणला त्यामुळे त्यांच्याविरोधात असंतोष निमार्ण झाला व माचे रुपांतर १८५७ च्या उठावात झाले.

**ब) तैनाती फौजेच्या पध्दतीचे दुष्परिणाम :**

इंग्रजांनी आपले साम्राज्य उभे करताना अनैतिक बाबींचा तत्त्वाचा नेहमीच अवलंब केला. क्लाईव्ह, बॉरन हेस्टिंगसारख्या अधिकाऱ्यांनी निती-अनितीचा फारसा विधिनिषेध पाळला नाही. त्यातच इंग्रजांची भेवनीती, त्यांचा व्यापारी साम्राज्यवाद, त्यांची शखाखे व संस्कृतीचे सामर्थ्य यांचे रहस्य अनेक हिंदी राजेराजवाक्यांना समजून आले नाही आपापसातील हेवेदावे व सुखासीन वृत्ती यामुळे त्यांचा हात अधिक झपाट्याने झाला. लॉर्ड वेलस्लीने १७९९-१८०५ या काळात तैनाती फौजेचा वापर करून अनेकांचे प्रदेश आपल्या ताब्यात आणले, बहुतेक सर्व हिंदी सत्ताधीशांवर अनेक प्रकारचे करार लादण्यात आले. त्यांची परराष्ट्रीय चोरणे इंग्रज ठरवू लागले. युध्द व तह करण्याचा राज्यकर्त्यांचा प्रमुख अधिकार त्यांच्याकडून काढून घेतला. त्यामध्ये विशेषत: हैद्राबादचा निजाम, शिंदे, भोसले, होळकर, मराठे सरदार, पेशवे, अयोध्येचा नबाव इत्यादी सत्ताधीश प्रमुख होते. तैनाती फौजेच्या पध्दतीमध्ये इंग्रजी फौजेचा खर्च हिंदी राजांनी करावयाचा व ह्या फौजेवर अधिकार मात्र इंग्रजांचा, हिंदी राजे तैनाती फौजेच्या प्रभावाखाली गेल्यामुळे ते दुबळे बनले. त्यांच्या ठिकाणची पराक्रमाची परंपरा लुप्त झाली इंग्रजानीच त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्विकारल्याने ते आपल्या राज्याच्या कारभाराकडे दुर्लक्ष करू लागले. परिणामी राज्यकारभारातून गोंधळ, अशांतता व अव्यवस्था निर्माण होऊ लागली.

**क) लॉर्ड डलहौसीचे विलीनीकरणाचे धोरण :**

डलहौसीने भारतात साम्राज्यविस्तार करण्यासाठी भारतीय प्रदेशाचे विलीनीकरण करण्याचा सपाटा लावला होता. युध्दाच्या मार्गाने, दत्तक विधानास परवानगी न देऊन, कुशासनाचा आरोप करुन, कर्जवसुलीसाठी प्रदेश घेऊन, पेन्कान व पदव्या रद्द करुन डलहौसीने भारतीय प्रदेशांचे विलीनीकरण केले. इ.स. १८५४ साली शीखांचा पराभव केला व त्यांचे राज्य जिंकले तर १८५२ साली ब्रम्हदेशाशी युध्द करुन दक्षिण ब्रम्हदेश साम्राजात विलीन केला. निपुत्रिक राजेरजवाड्यांनी आपल्या वारसास कंपनी सरकारची पूर्व संमती घेणे आवश्यक असल्याचे घोषित केले कंपनी सरकार च्या डायरेक्टरांनीच हे तत्त्व घोषीत केले होते. साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी या तत्त्वाने मोठी संधी प्राप्त झाली. मृत्यूपूर्वी त्यांनी घेतलेला दत्तक डलहौत्तीने नामंजूर करून साताऱ्याचे राज्य खालसा केले. १८५३ साली नागपूरचा राजा निपुत्रिक मरण पावला. त्याच्या राणीने घेतलेला दत्तक वारसही डलहौसीने नामंजूर करुन परिणामी नागपूरचे राज्य खालसा करुन साम्राजात विलीन केले. झाशीची राणी १८५३ मध्ये विधवा झाली. पतीच्या मृत्यूपूर्वी तिने दत्तक पुत्र

घेतला होता. हे दत्तक विधान नामंजूर करुन डलहौसीने तिचे राज्य खालसा केले, अशाच प्रकारे या तत्वाचा वापर करुन त्याने संबळपूर, जैतपूर, भगत व उदयपूर ही राज्ये खालसा केली. याशिवाय तैनाजी फौजेची थकबाकी वसूल करण्याचे निमित्त करुन डलहौसीने हैद्राबादच्या निजामाकडून त्याचा वऱ्हाड प्रांत १८५३ साली घेतला. तसेच गैरकारभार व अराजकता या कारणाखाली औधच्या नवाबाचे राज्य १८५३ मध्ये खालसा करण्यात आले, त्यांचे हे वागणे अन्यायपूर्ण होते. भारतीय शासक व प्रजा इंग्रजांची शत्रू बनली.

**ड) भारतीय राजेरजवाडयांचा अपमान :**

डलहौसीने अनेक राजेरजवाडयांच्या पदव्या, किताब व तनखे बंद करुन टाकले, पदव्या अथवा तनखे या गोष्टी वंशपरंपरेने चालत नसतात, असे त्याचे मत होते. त्याने १८५२ साली दुक्तऱ्या बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर त्याचा दत्तकपुत्र नानासाहेब याचा वारसाहक्क नामंजूर केला व त्यास मिळत असलेला आठ लाखाचा तनखाही बंद केला. पेशवा ही पदवी आता नाममात्र होती, पण तीही त्याला देण्यात आली नाही. १८५५ मध्ये तंजावरचा राजा मृत्यू पावला. त्याच्या वारसदाराची जहागीर व तनखा या बाबी डलहौसीने जप्त केल्या. तंजावरच्या राजाचे छत्रपती पदही काढून घेण्यात आले. मोगल बादशहा निर्माल्यवत झाला होता. अधिकार व संपत्ती या गोष्टी केव्हाच लयाला गेल्या होत्या. तोही इंग्रजांच्या तडाख्यातून सुटला नाही. मोगल बादशहाच्या मृत्यूनंतर गादीवर येणाऱ्या बादशहाला मोगल सम्राटाच्या राजवाडयात राहता येणार नाही व त्याचा बादशहा किताब काढून घेतला जाइल जसे डलहौसीने बजावले होते. डलहौसीच्या या आक्रमक व अन्यायी धोरणामुळे हिंदी राजेरजवाडे हवालदिल बनले. या नीतीमुळे संस्थानिकांना संभाव्य धोक्याची जाणीव झाली. याशिवाय सातारा, नागपूर, झाशी, उदयपूर ही राज्ये खालसा केल्याने हिंदू प्रजेच्या भावना दुखावल्या तर औधच्या नवाबाचे राज्य नष्ट झाल्याने व मोगल बादशहाला निर्माल्यवत बनविल्याने मुसलमान दुखावले गेले, नीती-अनीतीची चाड न बाळगता इंग्रजांना हिंदुस्थानातील सर्व राज्ये खालसा करावयाची आहेत असे सामान्य लोकांना वाटू लागले.

**इ) नेपियरची गर्वोक्ती**

सर चार्लस नेपियर याची गर्योक्ती स्वातंत्र्य युध्दला कारणीभूत ठरली. तो गर्वाने म्हणाला होता की, जर मी १२ वर्षे भारताचा सम्राट असतो तर एकही भारतीय राजा शिल्लक राहीला नसता. निजामाच्या बाबतीत कांहीच ऐकले नसते व नेपाळ देखील आमचा झाला असता. यामुळे भारतीयांना असे वाटू लागले की इंग्रज हे भारतीय राजांना नेस्तानाबूत करण्यामागे लागले आहेत. त्यामूळे भारतातील संस्थानिकांच्या मनात इंग्रजाबद्दल अनादर निर्माण झाला व पुढे त्यांनी १८५७ च्या उठावात भाग घेतला.

**आर्थिक कारणे :**

अ)**हस्तव्यवसाय व कारागिरी बुढाली** :-

इंग्रजांचा साम्राज्यवाद हा आर्थिक साम्राज्यवाद होता. हिंदुस्थानातून कराच्या रुपाने अथवा व्यापाराच्या रुपाने जास्तीत जास्त संपत्ती मायदेशी नेणे, हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. हे उद्दिष्ट साध्य करण्यात ते पूर्ण यशस्वी झाले. हिंदूस्थानच्या प्रदेशांवर त्यांची मालकी प्रस्थापित होताच, ते मनमानी आपार करु लागले, हिंदी माल त्यांच्या यंत्रावर तयार होणाऱ्या मालाशी स्पर्धा करु शकला नाही. परिणामी हिंदुस्थानातील परंपरागत हस्तव्यवसाय व कलाकुसरीचे धंदे बुडाले, कारागीर बेकार झाले. त्यामुळे बहुतांश लोक शेतीकडे वळले. परंतु सरकारने शेतसारा जास्त वाढविल्याने लोकांच्या असंतोषात अधिकच भर पडली. प्रारंभापासूनच भारतीय संपत्तीचा ओघ पश्चिमेकडे वळविण्यात आला होता. व्यापार इंग्रजांच्याताब्यात असल्यामुळे इंग्रजी मालाला वारंवार अनेक सवलती देण्यात आल्या. हुकमी बाजारपेठ व कच्चा मालाचा पुरवठा करणारी वसाहत याद्दष्टीने इंग्रज भारताकडे पहात होते. भारताचे आर्थिक शोषण फार मोठ्या प्रमाणावर चालू होते. त्यामुळे भारतातील सर्वसाधारण माणूस दरिद्री राहिला. डॉ. ईश्वरी प्रसाद यांच्या मते, "भारतमातेच्या दुधावर इंग्रज पुष्ट बनले परंतु तिच्या लेकरांवर मात्र उपासमारीची पाळी आली".

**ब) करमुक्त भूमीवर कर:**

इंग्रजांच्या पूर्वीच्या शासकांकडून अनेक धार्मिक संस्थाना व व्यक्तीना अनेक वर्षापासून अनुदान म्हणून करमुक्त जमिनी मिळाल्या होत्या. सर विल्यम बेटिंगच्या कारकीर्दीत त्यांना अनुदानासंबंधीचे कागदपत्र दाखविण्यास सांगण्यात आले. शेकडो वर्षांच्या पूर्वीचे कागदपत्र दाखविण्यास सांगण्यात आले. शेकडो वर्षाच्या पूर्वीचे कागदपत्र नष्ट झाले असल्यामुळे ते दाखवू शकले नाहीत म्हणून इंग्रजांनी त्यांच्यावर कर लावला. जे कर भरू शकले नाहीत त्यांच्या जमिनी इंग्रजांनी जप्त केल्या, ज्यांच्या जमीनी गेल्या अशांची संख्या वीस हजार होती. ते सर्व इंग्रजांच्या विरोधात गेले.

**क) इंग्रजी भांडवलदारांकडून होणारी पिळवणूक :**

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीने भारतातही रेल्वे, रस्ते, तारामंत्रे यासारख्या सुधारणा झाल्या हे खरे, पण त्यामुळे या देशाच्या आर्थिक पिळवणुकीस अधिक गती प्राप्त झाली. इंग्लडमधील तयार झालेला माल कमी वेळात हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात पोहचू लागला व तेथून कच्चा माल जलद गतीने इंग्लंडकडे निर्यात होऊ लागला. इंग्रजांचा व्यापार वाढला, कारखानदारी वाढली. परिणामी भांडवल वाढले. हे भांडवल हिंदुस्थानमधील अनेक उद्योगधंद्यात इंग्रज व्यापाऱ्यांनी गुंतवले. या भांडवलावर होणारा फायदा ले मायदेशी नेत असल्यामुळे हिंदुस्थान दरिद्रीच राहिला.

**ड) शेतकरी व जमीनदार यांचा असंतोष व बेकारी:**

बंगालमधील काममधारा पध्दतीने महसूल व्यवस्थेला स्थिरपणा आला पण सरकारचा ठराविक सारा न देता आल्याने अनेक जमीनदारांच्या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या, अशा जमिनदारांची प्रतिष्ठा धुळीला मिळाली. मद्रास, मुंबईसारख्या प्रांतातून रयतवारी पध्दती सुरु करण्यात आली. पण तेथे जमीन महसुलाचा दर काही वेळा उत्पन्नाच्या ५०% इतका अन्यायी असे अशा प्रसंगी शेतकऱ्यांच्या हलाखीस पारावार राहत नसे. औधचे राज्य खालसा केल्यावर तेथे ते जमीनदार दूर सारले गेल्यामुळे नाराज झाले. त्यांचे आश्रित बेकार बनले. जमीनदारांच्या जमीनीबरोबरच जहागिऱ्याही जप्त केल्या.

**३) भारतीयांच्या नोकऱ्या गेल्या:**

इंग्रजांनी भारतीय संस्थानिकांची राज्ये इंग्रजी साम्राज्यात विलीन केल्यामुळे तेथील एकूण साठ हजार सैनिक व असैनिक कर्मचा-यांना नोकरीवरुन काढून टाकले. नोकऱ्या गेल्यामुळे अनेकांची उपासमार होऊ लागली. ज्यांचे ज्यांचे आर्थिक नुकसान झाले, त्यांनी इंग्रजांच्या अन्याय्य व्यवहाराचा प्रचार करुन इंग्रजांच्या विरोधात वातावरण तापविले. स्वातंत्र्य युध्दाला त्यामुळे बळकटी आली.

**सामाजिक कारणे :**

**क) हिंदी लोकांना रानटी समजले जाई:**

इंग्रज हिंदुस्थानचे राजकर्ते बनल्यानंतर त्यांचा ठिकाणी असणारा संस्कृति श्रेष्ठत्वाचा गंड हिंदी लोकांच्या लक्षात येऊ लागला. इंग्रज केवळ आपली संस्कृतीच श्रेष्ठ मानीत असे नव्हे तर हिंदी संस्कृतीला रानटी संस्कृती व हिंदी लोकांना रानटी माणसे असे संबोधीत. हिंदुस्थानातील लोकांचा उध्दार करण्याकरिता आम्ही आलेलो आहोत असा त्यांचा भाव होता. इंग्रजांच्या वंशश्रेष्ठत्वाचा अहंकार, त्यांची अरेरावी व भारतीयांना हीन लेखण्याची त्यांची प्रवृत्ती यांचे चटके समाजात मान्यता व प्रतिष्ठा पावलेले मुंबई न्यायालयाचे सरकारी वकील मंडलिक किंवा बंगालचे उच्चकुलीन सर्वमान्य समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनाही सोसावे लागले. मग सामान्य भारतीयांची काय गत्त असेल याची कल्पना करणे कठीण आहे. रस्त्यावरुन अगदी सर्वांत कनिष्ठ दर्जाचा जरी एखादा इंग्रजी माणूस जात असेल तर तेथून जाणाऱ्या भारतीयांनी घोडागाडीतुन जात असल्यास खाली उतरुन त्याला नम्रपणे सलाम ठोकला पाहिले असा दंडक असे. रेल्वेच्या डब्यात इंग्रज माणूस चढला तर तेथे आगोदरच बसलेल्या हिंदी माणसाला हाकलून लावणे, इंग्रजांच्या

मनोरंजन केंद्रात किंवा उपहारगृहात कुत्री व भारतीय यांना मज्जाव आहे अशा अत्यंत असंस्कृत व मानहानीकारक पाटया लावणे, क्षुल्लक निमित्त करुन मारहाण करणे असे प्रकार होत असत. इ.स. १७८४ साली वॉरन हेस्टिंग्जने सुध्या इंग्रजांच्या तुच्छ भावनेविषयी स्पष्ट कबुली दिली आहे. हिंदी माणसे रानटी असून युरोपातील सर्वात मागासलेल्या देशातील सर्वात मागासलेल्या माणत्तांची सुच्या ती बरोबरी करु शकणार नाहीत अशी दपौक्ती इंग्रज अधिकारी करत. स्वाभाविकच राज्यकर्ते व प्रजा यांच्यामध्ये दरी निर्माण झाली होती. राज्यकर्ते प्रजेपासून फटकून वागत असल्याने ही दरी होऊ कमी शकली नाही.

**ख) हिंदू संस्कृतीवर संकट आल्याची भावना :**

लॉर्ड बेटिंक, लॉर्ड डलहौसी यांसारख्या काही सुधारणावादी इंग्रज राज्यकर्त्यांनी समाजिक कामदे करुन हिंदी समाजात सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. उदा. सतीबंदी कायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा, विधवा पुर्नविवाह संमती कायदा इत्यादी. मा कायद्यां मागची भूमिका योग्य होती, पण सामान्य लोकांना त्यामुळे आपल्या समाजाची चौकटच नष्ट होत आहे, असे वाटू लागले.

ब्रिटीशांनी इंग्रजी शिक्षणाला प्राधान्य देऊन इंग्रजी शाळा सुरु केल्या. हिंदुस्थानातील पारंपारिक धर्मशास्त्रांचा अभ्यास, संस्कृत, अरबी, फारसी भाषांचे अध्ययन इत्यादी बाबी इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे कमी महत्त्वाच्या बनून मागे पडू लागल्या. राज्यकर्त्यांनीही अशा परंपरागत विद्याभ्यासाला उत्तेजन देणे बंद केले. पूर्वी राज्यकारभाराची भाषा फारसी होती. तिची जागा इंग्रजीने घेतली इंग्रजी शिक्षण घेणाऱ्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळू लागली. त्यामुळे हिंदी समाजात आतापर्यंत प्रतिष्ठा व वजन असणारा हिंदू पंडीतांचा व मुसलमान मुल्ला-मौलवींचा वर्ग असंतुष्ट बनला. या देशात जातिव्यवस्था फार प्रखर होती त्यामुळे शाळेत ज्यावेळी निरनिराळ्या जातींची मुले एकमेकांशेजारी बसू लागली त्यावेळी सुध्दा आपली जात सरकारला नष्ट करावयाची आहे असा लोकांना संशय येऊ लागला. सरकार आपल्याखाजगी आणि सामाजिक जीवनात हस्तक्षेप करीत आहे असे लोकांना वाटू लागले.

**धार्मिक कारणे :**

**अ) ब्रिटिशांचे धार्मिक धोरण :**

इंग्रजांच्या आक्रमणाने प्रथम हिंदी लोकांची राज्ये गेली. नंतर व्यापार उहीम बुडाला आणि आता धर्म नष्ट होत आहे, अशी असंतोषाची भावना हिंदी समाजात उत्पन्न झाली, पोर्तुगीजाप्रमाणे सरकारी फतवे काढून व जुलुम जबरदस्ती करुन इंग्रजांनी धर्म प्रसार केला नाही. पण त्यांचे अधिकारी खिश्चन धर्मप्रसाराला अनेक वेळा उघड उघड प्रोत्साहन व पाठिंबा देत. एखाद्या हिंदूने धर्मांतर केले की त्यास सरकारी नोकरी दिली जाई अथवा नोकरीत बढ़ती दिली जाई. १८५६ साली कायदा करुन धर्मातरीत व्यक्तीचा बापजाद्याच्या मालमत्तेवरील हक्क आबाधित राहीला, असा जो इंग्रजांनी कायदा केला तो धर्मप्रसाराला प्रोत्साहन देणारा होता असे हिंदू व मुसलमानांना वाटत होते.

इ.स. १८१३ च्या कायद्याने खिश्चन धर्मगुरुना धर्मप्रसारांसाठी हिंदुस्थानात जाण्याचे स्वातंत्र्य दिले गेले. अनेक प्रकारची आमिषे दाखवून प्रसंगी धाक दाखवून हे मिशनरी धर्मांतराचे कार्य करत असत. दुष्काळासारख्या घटना म्हणजे त्यांना पर्वणीब लाभे. या दुष्काळात अनेक आईबाप मृत्यू पावत व त्यांची निराश्रित मुले हे मिशनरी ताब्यात घेत, प्रसंगी पैसे देऊन विकत घेत व त्यांना आपल्या धर्माची दीक्षा देत. धर्मातरासाठी खिश्चन मिशनत्यांनी शैक्षणिक संस्था, दवाखाने, आर्थिक मदत, अनाथालये इत्यादी मार्गाचा अवलंब केला. प्रसंगी अनैतिक मार्गाचा अवलंब करून धर्मप्रसाराला उत्तेजन दिले. स्वाभाविक हे मिशनरी व त्यांना प्रोत्साहन देणारे राज्यकर्ते हे आपल्या धर्माचे शत्रू आहेत, अशी भावना हिंदी समाजात निर्माण झाली. ब्रिटीशांनी केलेल्या सामाजिक कायद्यांचा व सुधारणांचा वेगळा अर्थ लावून इंग्रज आपली संस्कृती व धर्म नष्ट करण्याचा पध्दतशीर प्रयत्न करीत असल्याचे भारतीयांना वाटू लागले.

**आ) राज्यकर्ते व ईस्टइंडिया कंपनीचा धर्मप्रसाराला पाठिंबा :**

इंग्रजांनी आपला धर्म व संस्कृती भारतीयांवर लावून राजकीय सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांनी केलेल्या सुधारणांमुळे आपली जुनी संस्कृती कदाचित नष्ट होईल असे सनातन्यांना साधार वाटू लागले होते. मुलकी व सैन्यातील लोकांना आपल्याला जबरदस्तीने इंग्रज, खिश्चन धर्माची दीक्षा देणार आहेत अशी भीती भेडसावत होती. पुष्कळशा खित्ती मिशन-यांच्या धर्मप्रचाराच्या सभा जिल्हा कलेक्टरच्या अध्यक्षेतेखालीच होत. कंपनीच्या संचालक मंडळाचा अध्यक्ष डी मेकलस माने तर ख्रिस्ती धर्माचा प्रसार व्हावा म्हणूनच ब्रिटीश साम्राज्य हिंदूस्थानात स्थापन झालेले आहे असे पार्लमेटमध्ये उघड बोलून दाखविले होते. मिशनरी लोकांच्या कारवायांमुळे हिंदूच्या धर्म भावना दुखावल्या गेल्या. हिंदू देव-देवतांच्या तसेच मुसलमानांच्या पौर-पैगंबराचा सरळ सरळ निरादर करने सुरु केले.

**लष्करी कारणे :**

**अ) हिंदी शिपायांना मिळणारी वागणूक :**

१८५७ चा उठाव प्रथम लष्करातील हिंदी शिपायांनी केला, याचे कारण त्यांच्यामध्ये कंपनी सरकारविरुध्द असंतोष खदखदत होता. हिंदी शिपायांना अत्यंत अपमानास्पद व अन्यायी वागणूक दिली जात होती. याउलट गोगा शिपायांची प्रतिष्ठा व मिजास राखली जाई. त्याकाळात भारतीय सैनिकाला फक्त ९ रु. मासिक पगार मिळत होता. या ऐवजी इंग्रज सैनिकाला मात्र सैनिक अधिका-याइतका प्रचंड पगार मिळत असे. एखाद्या हिंदी शिपायाने धर्मांतर करुन खिस्ती धर्म स्विकारला की त्याला बढ़ती मिळत असे. याशिवाय लष्करातील वरच्या हुद्याची जागा हिंदी सैनिक कितीही पराक्रमी असला तरी त्याला दिली जात नसे. लष्करी मोहीमांत इंग्रज अधिकारी प्रथम हिंदी शिपायांची फौज आघाडीवर पाठवत लढाई होऊन पहिल्या हल्ल्यात अनेक हिंदी शिपाई मारले गेले की, मग गोरी फौज पुढे सरकत असे. हिंदी शिपायाची जीवितहानी मोठी होई व शेवटी विजयश्रीची माळ गोन्यांच्या गळयात पड़े. हा सर्व प्रकार हिंदी शिपायांना संतापजनक वाटत होता.

**ब) हिंदी शिपायांवरील जाचक निबंध :**

इंग्रजांनी इ.स. १८०६ साली मद्वात्त लष्करातील हिंदू शिपायांवर गंध न लावण्याची व दाढी न राखण्याची सक्ती करण्यात आली होती. इ.स. १८२४ साली ब्रम्ही युध्दात बंगाल लष्करातील हिंदू शिपायांवर समुद्र पर्यटनाची सक्ती करण्यात आली होती. समुद्राचा प्रवास केल्यास जात बुडते अशी सर्वसाधारण कल्पना असल्याने शिपायांनी प्रत्येक वेळी देशाबाहेर जाण्यास विरोध केला. इ.स. १८४४, १८४९, १८५०, १८५२ या वर्षी याकरिताच सैन्यात बंडे झाली. परंतु लॉर्ड कॅनिंगने १८५६ साली कायदा करून भारतीय सैनिकाला लढण्याकरिता कोठेही जावे लागेल असे जाहीर केले. त्यामुळे हिंदूना बाटविण्या करिता हा कायदा अमलात आणला असा समज सर्वत्र पसरला, बंगालच्या लष्करात ब्राम्हण आणि राजपूत लोकांचा भरणा होता. ते सैन्य वंशपरंपरागत चालत असल्याने त्यात एकमेकांबाबत स्नेह व मातृभाव निर्माण झाला होता. परंतु कालांतराने शूद्र आणि अन्य जाती बंगालच्या सैन्यात भरती होऊ लागल्याने या उच्चपदस्थ जातींमध्ये असंतोष निर्माण झाला, महत्त्वाची गोष्ट म्हणजे दहा हजार मैलांवर राहणाऱ्या 'इंग्रज बादशहाशी मी एकनिष्ठ राहीन' अशी भारतीय शिपायाला शपथ घ्यावी लागत असे.

**क) गोरी फौज संख्येने कमी व महत्त्वाची ठाणी भारतीय सैनिकांच्या नियंत्रणात :**

बंगाल सैन्यातील किंवा इतर लष्करातील बेशिस्तीने कदाचित गंभीर स्वरुप धारण केले नसते, परंतु यावेळी सैन्यात युरोपियन अधिकाऱ्यांची संख्या केवळ १९ टक्के होती. भारतीय सैन्य व इंग्रज सैन्य यांच्यात बरीच तफावत होती. इंग्रजी लष्कारात २ लाख ३३ हजार हिंदी फौज होती, तर गोरी फौज फक्त ४५ हजार होती. आपण बंड पुकारले तर संख्येच्या जोरावर विजयी होऊ असा आत्मविश्वास शिपायांना वाटत असावा. इंग्रज राज्याच्या सुरक्षिततेसाठी

गोऱ्यांची फौज वाढविली पाहिजे, असा इशारा डलहौसीने ब्रिटीश सरकारला दिला होता. पण सरकारने या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले होते.

इ.स. १८४९ साली ब्रिटीशांनी पंजाब जिंकला होता. तेथे बंडाळी होऊ नये म्हणून ४५ हजार गोऱ्यापैकी ४० हजार फौज तेथेच ठेवण्यात आली होती. कलकत्ता व प्रयाग या मधील दिनाजपूर या एका ठिकाणी इंग्रज सैन्याचे नियंत्रण होते. मीरत, दिल्ली, कानपूर या महत्त्वाच्या ठाण्यावर मात्र भारतीय सैनिकाचे नियंत्रण होते. त्यामुळे भारतीय सैनिकांना उठाव करणे सोईचे ठरले.

**ड) इंग्रजी राज्य संपणार ही अफवा :**

सामान्य जनतेत व भारतीय सैनिकांत इंग्रजांचे राज्य शंभराव्या वर्षी संपणार अशी अफवा पसरली. इंग्रजांचे राज्य १७५७ मध्ये स्थापन झाले. १८५७ मध्ये त्यास शंभर वर्ष पूर्ण होतात म्हणून इंग्रजांचे राज्य १८५७ मध्ये संपणार व भारत पुन्हा स्वतंत्र होणार या आत्मविश्वासाने भारतीय सैनिक मनोवैज्ञानिक कारणामुळे इंग्रजांच्या विरोधात संगठित होऊ लागले. पुढे त्यांनी १८५७ च्या उठावात भाग घेतला.

**तात्कालिक कारण (चरबीयुक्त काडतूस)**

भारतीय सैनिकांना एनफील्ड नावाच्या नवीन बंदुका व काडतुसे परविण्यात आल्या होत्या. रायफलीत ठेवण्याअगोदर या काडतुसांना दातांनी तोडावे लागत होते. या काडतुसांना गाईची व डुकराची चर्बी लावण्यात आली आहे. असे जेव्हा सैनिकांना समजले तेव्हा त्यांना वाटले की, इंग्रज सरकार आपला धर्म भ्रष्ट करु पाहत आहे. इंग्रजांनी या आरोपाचे खंडन केले पण काही उपयोग झाला नाही.

एन्फिल्ड बंदुकांसाठी वापरावयाच्या काडतुसांना अशा प्रकारे ३४ व्या पलटणीने नकार दिला. ही बातमी १९ व्या पलटणीत पोहचताच मातील भारतीय शिपायांनी निषेध व्यक्त केला. तेव्हा ती पलटणच बरखास्त करण्यात आली. ३४ व्या पलटणीवरही कारवाई करण्यात आली. त्या सैनिकांवर लष्करी खटले भरण्यात आले. ह्या सर्वांना १० वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली. परिणामी त्याच पलटणीतील मंगल पांडे यांनी कवायत सुरु असतांना गोळ्या घालून युरोपीयन अधिकाऱ्यांना २९ मार्च १८५७ रोजी ठार मारले, मंगल पांडेला ताबडतोब पकडण्यात येऊन लष्करी खटला चालवण्यात आला व ८ एप्रिल रोजी फाशी देण्यात आली. बराकपूरच्या छावणीतील उठावाची बातमी समजताच मीरत येथील सैनिकांनीही बंड केले व उठावास सुरुवात झाली.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की १८५७ चा उठाव हा कोणत्याही एका कारणामुळे घडलेला नसून त्यापाठीमागे राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व लष्करी स्वरुपाची कारणे जबाबदार होती. १७५७ च्या प्लासीच्या लढाईपासून ते १८५७ च्या उठावापर्यंच्या इंग्रजाच्या विविध धोरणामुळे राष्ट्रीय उठाव घडून आला असे आपल्या निदर्शनास येते. त्यामुळे या घटनेला आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

**१८५७ च्या उठावाची व्याप्ती :**

**दिल्ली हस्तगत**

मीरतपासून दिल्ली २० मैल अंतरावर आहे. हे अंतर पार करुन हिंदी शिपाई दुसऱ्या विवशी दिल्लीस आले. बहादूशहास सिंहासनावर बसवून त्याची राजवट सुरु झाल्याची घोषणा करावयाची होती. बादशहा नामधारी बनून तो इंग्रजाच्या हातातील बाहुले बनला होता. अशा परिस्थितीत बंडवाल्यांना साथ देणे त्याला धोक्याचे बाटत होते. बंडवाल्यांनी दिल्लीतील इंग्रजाच्या कत्तली करुन मोठी धामधूम माजली होती. बंडवाल्यांचे पारडे जड होते. शेवटी त्यांच्या दबावाखाली त्याने सिंहासनावर बसण्याचे व हिंदूस्थानचा बादशहा होण्याचे कबूल केले. यानंतर दिल्लीतील दारुगोळयाच्या कोठाराचा ताबा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला, मण कोवारावर असणाऱ्या इंग्रजांनी कोठारास आग

लावून प्रचंड स्फोट घडवून आणला, शेकडो लोक ठार झाले. हे घडत असताना प्रसंगावधान राखून काही इंग्रजांनी ही बातमी तारयंत्राच्या तहाम्याने उत्तर हिंदुस्थानातील प्रमुख इंग्रज अधिकाऱ्यांना कळवून टाकली होती. २४ तासांत दिल्ली बंडवाल्याच्या हातात आली. कालपर्यंत गुलाम असलेला बहादूरशहा हिंदूस्थानचा सम्राट बनला. परंतु बंड करणे सोपे असते पण ते यशस्वी करणे अवघड असते याची प्रचिती लवकरच बंडवाल्याना आली.

लॉर्ड कॅनिंगने पंजाब वगैरे प्रदेशातून दिल्लीकडे फौजा गोळा केल्या. गुरखा, शीख मा लढाऊ जातीची नव्याने भरती करण्यात आली. जूनमध्ये इंग्रजांची एकूण ६५ हजार फौज दिल्लीभोवती उभी राहिली. आपण दिल्ली काबीज केली की, बंडवाल्यांचा उठावाचा कणा मोडेल असा इंग्रजांचा अंदाज होता. बंडवाल्यांची फौज वाढत होती. बंडवाल्यापैकी काहींनी खुर दिल्लीत जाळपोळ व लुटालुट करण्यास प्रारंभ केला होता शिवाय दिल्ली व आसपासच्या जिंकलेल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था निर्माण करता आली नाही, त्यामुळे बंडवाल्यांना स्थानिक प्रजेची सहानुभूती मिळाली नाही. १५ सप्टेंबर १८५७ रोजी इंग्रज व बंडवाले मांध्यालढाईस तोंड फुटले. १० दिवसाच्या कडव्या झुंजीनंतर बंडवाल्यांचा पराभव होऊन दिल्ली इंग्रजांच्या ताब्यात आली. इंग्रजानी दिल्ली जिंकल्यानंतर बहादूरशहाला रंगून येथे पाठवले व पुढे याच ठिकाणी कैदेत त्यांचा मृत्यू झाला.

**कानपूर**

मीरत येथील शिपायांचे बंड, त्यांची विल्लीवरील चाल, विल्लीतील प्रारंभीचा विजय अशा बातम्या शिपायांच्या कानावर आल्या. कानपूर येथे इंग्रज फौजेच्या छावण्या असत नानासाहेब याने कानपूरच्या जवळपासचे प्रदेश ताब्यात घेतले. इंग्रज सेनापती सर हयूम व्हीलरला पळून जावे लागले. त्याने कानपूरच्या किल्ल्यात आश्रय घेतला. नानासाहेबाने कानपूरच्या किल्ला जिंकून घेतला व त्यास आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले, प्रयाग येथे जनरल नील याने क्रांतीकारकांवर अत्याचार केले म्हणून सैनिकांची बदला घेण्याची भावना वाढली. याचा परिणाम अत्ता झाला की, इंग्रज स्त्रिया व मुले यांची १२५ ची संख्या ही काही सौदा कोठी येथे सुरक्षितपणे पोहचू शकली नाही. यापैकी ५ जण पळून गेल्याने वाचले, २८ जून रोजी एक दरबार भरवून सम्राट बहादूरशहा यास १०१ तोफांची सलामी देण्यात आली व नानासाहेब यास पेशवेपद बहाल करण्यात आले. परंतु कानपूर हातातून गेल्याचे कळताच इंग्रजांनी तिकडे फौजा कानपूरावर येण्यापूर्वीच नानासाहेबांच्या फौजेचा धुव्वा उडाला व ती पराभूत झाली. १७ जुलै रोजी इंग्रजांनी चाल करून कानपूर सर केले. पराभूत झालेले नानासाहेब औंधच्या प्रदेशात निसटला च प्रतिकाराची तयारी करु लागले.

सैन्याची जमवा जमव करून नानासाहेब व त्यांचा सेनापती तात्या टोपे गांनी कानपूरवर चाल केली व ते पुन्हा जिंकले पण तो विजय अल्पकाळ टिकला. जनरल कॅम्पबेलने कानपूरवर चाल करुन नानासाहेबांचा पुन्हा एकदा पराभव केला. नानासाहेब व तात्या टोपे ६ डिसेंबर १८५७ रोजी पळून गेले.

**लखनौ**

लखनौ ही औंधची राजधानी होती. औंधच्या नबाबाचे राज्य तर कंपनी सरकारने खालसा केले होतेच. शिवाय नव्या सरकारी धोरणामुळे हजारो जमीनदार बेकार व प्रतिष्ठाहीन बनले होते. नबाबाचे राज्य खलसा केल्याने हजारों शिपाई बेकार झाले होते. मीरत, दिल्ली, कानपूर इ. ठिकाणच्या बंडाच्या बातम्यांनी ही ठिणगी औचच्या प्रदेशात टाकली गेली. ३० मे १८५७ रोजी औधच्या प्रदेशात बंडाचा झेंडा उभारला गेला उठाव एवढा जबरदस्त होता की, औंधमधील इंग्रजी राज्य अवघ्या १०-१२ दिवसात समाप्त झाले.

लखनौमधील इंग्रज लोक व गोरे सैन्य यांनी प्रसंगावधान राखून इंग्रज रेसिडेन्सीत आश्रय घेतला, रेसिडेन्सीमध्ये दोन हजार इंग्रज होते व त्यांच्याभोवती १ लाख बंडवाल्यांनी गराडा घातला होता. इंग्रजांनी मनोधैर्य खचू न देता सतत ६ महिने बंडवाल्यांशी प्रतिकार केला ही बाब कौतुकास्पद मानली पाहिजे. औंधमधील बंडवाल्यांनी इंग्रज स्त्रीपुरुषांवर अत्याचार केले नाहीत ही गोष्ट नोंद घेण्यासाखी आहे. बंडाचे नेतृत्व नबाबाची पत्नी बेगम हजरत महलने स्विकारलेले होते. तिने अल्पवयीन पुत्राला औंधच्या गादीवर बसून इंग्रज राजवट समाप्त झाल्याचे घोषित केले. बहादूरशहाचा अंकित

म्हणून औंधचा नवाब राज्य करणार होता पण इंग्रजांच्या सामर्थ्यापुढे ही राजवट फार काळ टिकू शकली नाही. सप्टेंबर १८५७ मध्ये इंग्रज सेनापती औट्रॅम यांनी लखनौवर चाल केली. १७ नोव्हेंबरला इंग्रज रेसिडेन्सीभोवतीचा बंडवाल्यांचा वेढा उठविला. ज. कॅम्बेलची २० हजाराची फौज लखनौला येऊन पोहचली. इंग्रजांच्या संयुक्त फौजांनी २२ मार्च १८५८ रोजी हल्ला करून लखनौ सर केले.

**बिहार**

बिहारमधील वानपूर येथे इंग्रजांची हिंदी फौज हाती. ही फौज बंड करेल, ही भिती लक्षात घेऊन लॉईड या इंग्रज अधिका-याने हिंदी शिपायांना निःशस्त्र करण्याचा निर्णय घेतला. त्याच्या हुकुमाप्रमाणे हिंदी शिपाई आपली शस्त्रे खाली ठेवत असतानाच गोन्यांची फौज तेथे येऊन पाहेचली. हिंदी शिपायांचा असा समज झाला की आपणांस निःशस्त्र करुन आपली कत्तल करण्याचा लॉईडचा डाव आहे. त्यांनी लगेच शस्त्रे हाती घेऊन गोच्या फौजेवर गोळीबार सुरु केला अशाप्रकारे वानापूरमध्ये बंडाची सुरुवात झाली.

बिहारमधील जगदीशपूरचा वृद्ध जमीनदार कुवरसिंह पावर इंग्रजांनी बरीच जुलूम जबरदस्ती केली होती. त्याने बंडवाल्याशिपायांचे नेतृत्व स्विकारले. अनेक लढाया घडून आल्या. कुवरसिंहने असामान्य शौर्य गाजविले. तथापि इंग्रज फौजेपुढे त्याचा निभाव लागला नाही व लो १८५८ साली मरण पावला, त्याच्या नंतरच्या अमरसिंग नावाच्या बंधूने चैपनि संघर्ष चालू ठेवला, परंतु त्यांना यश मिळाले नाही.

**झाशी**

दत्तक वारसा नामंजूर या तत्वानुसार झाशीच्या राणीच्या दत्तक पुत्रास डलहौसीने राज्याधिकार नाकारुन झाशीचे राज्य खालसा केले होते. राणीला पारतंत्र्याची जाणीव सारखी सतावत होती. खुर तिष्याखजिन्यावर तिचा ताबा नव्हता. १८५७ च्या उठावाने या क्षात्रतेजाला संधी मिळाली, बंडाच्या बातम्या झाशीवर थडकल्या तेव्हा तेथील हिंदी शिपायानीही बंड पुकारुन ६ जून १८५७ रोजी इंग्रज अधिकाऱ्यांची कत्तल केली. त्यातून बचावलेल्या इंग्रजांनी झाशीच्या किल्ल्यात आश्रय घेतला. बंडवाल्यांनी त्यांच्याशी वाटाघाटी करुन त्यांना जीवनदानाचे आश्वासन दिले. पण इंग्रज जेव्हा बाहेर आले तेव्हा त्यांना विश्वासघाताने ठार केले. इंग्रजांची ही कत्तल राणीने घडवून आणली नव्हती. तथापि यानंतर बंडवाल्यांनी राणीकडे जाऊनबरेच द्रव्यत्साहय घेतले व त्यांनी दिल्लीकडे कूच केली. यावेळी नानासाहेब पेशव्याप्रमाणे तिने बंडवाल्याचे नेतृत्व स्विकारले नाही. एवढेच नव्हे तर राणी आपल्याशी एकनिष्ठ राहिल्याचे पाहून इंग्रजानी झाशीचा कारभार आपल्यावतीने तिच्याकडे सुपूर्त केला. तथापि हा इंग्रजांचा डावपेच होता. बंडाच्या संकटातून सावरत असतानाच ते झाशीस झालेल्या इंग्रजांच्या कत्तलीचा राणीविरुध्द पुरावा जमा करु लागले. झाशीच्या कत्तलीत शिपाई कसे रानटीपणाने वागले आणि आपले त्यांच्यापुढे कांही चालले नाही याबद्दल राणीने इंग्रजांना वारंवार लिहून आपली बाजू स्वच्छ असल्याचे निदर्शनाला आणून दिले होते. पण आत इंग्रजांना राणीभोवती फास आवळापाचा होता. परिणामी राणीचे इंग्रजांशी असलेले संबंध झपाटयाने बिघडू लागले. झाशीच्या कत्तलीचा आरोप आपणावर ठेवून इंग्रज आपणास फाशी देणार याबद्दल तिची खात्री झाली, तेव्हां नामुष्कीचे मरण पत्करण्यापेक्षा इंग्रजांशी लढून मरण पत्करण्याचे तिने ठरविले.

झाशी लढविण्यासाठी राणीने पूर्ण लष्करी तयारी केली सर हयू रोज या सेनानीच्या अधिपत्याखाली इंग्रज फौजा झाशीवर चाल करुन आल्या आणि त्यांनी झाशीच्या किल्ल्यास वेढा दिला. राणी मोठचा त्वेषाने किल्ला लढवू लागल्ली, सेनापती तात्या टोपे झाशीच्या मदतीस धावला पण इंग्रजानी त्यांना पराभूत केले. इंग्रजांनी जोमाने हल्ला करुन त्यांनी झाशीच्या तटबंदीत खिंडार पाडले, इंग्रज फौज आत शिरुन लुटालुट व कत्तल करु लागली. झाशी इंग्रजांच्या हाती पडत असताना घोड्यावर स्वार होऊन ती मोठ्या युक्तीने किल्ल्याबाहेर पडली होती. राणी प्रथम काल्पीला पोहचली. काल्पीत नानासाहेब, तात्या टोपे, बांद्याचा नबाब, बाणपूर व शहागड येथील राजे यांचेशी सल्लामसलत केली. पण सर हयू रोजने दोन मोठ्या लढायांत बंडवाल्यांचा पराभव करून काल्पी जिंकली, राणी व तात्या टोपे ग्वाल्हेरला निघून गेले. ग्वाल्हेरचा

राजा शिंदे व मंत्री दिनकरराव पळून गेले. इ.स. १८५८ रोजी ग्वाल्हेरचा किल्ला राणीच्याताब्यात आला. हयू रोजच्या समवेत इंग्रजांना पिटाळून लावले. दुसऱ्या दिवशी १८ जूनला जनरल स्मिथ व हवू रोजने ग्वाल्हेरवर स्वारी केली. राणीने दत्तक पुत्राला पाठीशी बांधून घोडयासकट ग्वाल्हेरच्या किल्ल्यावरुन उडी घेतली व इंग्रजांचे सैन्य उध्ववस्त करीत जाऊ लागली. इंग्रजानी तिचा पाठलाग सुरु केला. शेवटी या लढाईमध्ये राणींना वीर मरण आले.

वरील प्रमुख ठिकाणच्या उठावाशिवाय उत्तर प्रदेशात बनारस, अलाहाबाद, लाहोर मध्य प्रदेशात बाणपूर व शहागड, रामगढ़, इंदूर, महू, राजपुतान्यात अजमेर, नासिराबाद, रोहिलखंड इ. ठिकाणची सर्व बंड मोडून काढण्यात इंग्रज यशस्वी झाले, ग्वाल्हेरच्या लढाईनेच बंडाचा खरा शेवट इराला होता. झाशीची राणी रणांगणावर ठार झाली. नानासाहेब पेशवा, बेगम हजरत महल इ. नेत्यांनी देशत्याग केला. तात्या टोपेने इंग्रजांविरुध्द हालचाली काही दिवस चालू ठेवल्या. अखेर मानसिंह नावाच्या विश्वासघातकी देशद्रोही सरदाराने अलवारच्या जंगलात झोपले असताना तात्या टोपेला १ एप्रिल १८.५९ च्या रात्री पकडून दिले. अशा प्रकारे इंग्रज साम्राज्याविरुध्द भारतातील लोकांनी घडवून आणलेला हा सशस्त्र उठाव अपयशी झाला.

बंडाचा फैलाव सर्व हिंदूस्थानावर झाला नाही हा उठाव एकाच वेळी सर्व हिंदूस्थानभर होऊ शकला नाही हे त्यांच्या अपयशाचे पहिले कारण आहे. दक्षिण हिंदुस्थानातील महाराष्ट्र, म्हैसूर, मद्रास, केरळ इत्यादी प्रदेशात शांतता राहिली. उत्तरेकडेही राजपुताना, पंजाब, नेपाळ व बंगालचा बराचसा भाग येथे बंडाचा उद्‌भव झाला नाही. अफगणिस्थाननेही यावेळी इंग्रजांशी मित्रत्वाचे संबंध ठेवले, पंजाबमधील शांतता आश्चर्यजनक होती. पंजाबचे शीख इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले.

**हिंदी राजेरजवाड्यांच्या पाठिंब्यांचा अभाव** :-

वास्तविक इंग्रजांच्या आक्रमक व स्वार्थी धोरणाखाली हिंदुस्थानातील अनेक संस्थानिक भरडले गेले होते. कोणाचे राज्य गेले कोणाची पदवी गेली, तर कोणाचा तनखा गेला, तरीही त्यांच्यापैकी राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवा, बादशहा बहादूरशहा, कुवरसिंह, बेगम हजरत महल असे काहीजण सोडल्यात बाकीचे संस्थानिक हात बांधून स्वस्थ बसले. शिंदे-होळकर हे मराठ्यांचे एकेकाळचे सरदार इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले, हैद्राबादचा निजाम दिवाण सर आलार जंग हा सुद्धा इंग्रजांशी एकनिष्ठ राहिला.

**बंडवाल्यांना सर्वमान्य नेता मिळू शकला नाही** :-

या उठावात हिंदी लोकांना विशेषतः बंडवाल्यांना सर्वमान्य नेता मिळू शकला नाही. राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुवर सिंह यांनी शिपायांचे नेतृत्व स्विकारून अनेक लढायात शौर्य दाखविल हे खरे तथापि त्यांच्यापैकी कोणी एकजण सर्वमान्य नेता बनू शकला नाही. बहादूरशहा, नानासाहेब, राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महल यांनी आपापल्या बंडवाल्यांचे नेतृत्व केले व परस्पर सहकार्यही केले. परंतु परस्परांशी सहकार्य वेगळे व सर्वमान्य नेतृत्व वेगळे. असे नेतृत्व निर्माण होण्यासारखी त्यावेळची हिंदुस्थानची परिस्थितीही नव्हती आणि बंडवाल्यांना तेवढा अवधीही मिळालेला नव्हता. उलट इंग्रजांच्या कारभार एक होता. साध्या शिपायापासून ते गर्व्हनर जनरलपर्यंत कारभार यंत्रणा बांधली गेली होती. या मुळे बंडवाल्यांचा उठाव अपयशी ठरला.

**सर्वमान्य ध्येयाचा व कार्यक्रमाचा अभाव** :-

१८५७ च्या उठावातील बंडवाल्यांच्या समोर कोणती ध्येये होती? बंडवाले व त्यांचे नेते यांना इंग्रजांचा पराभव करून त्यांची राजवट नष्ट करावयाची होती, असे सर्वसाधारणपणे सांगता येईल. पण इंग्रजांचा पराभव कशासाठी करावयाचा होता अथवा तो झाल्यावर बंडवाल्यांना काय हवे होते? याचे उत्तर अगदी अस्पष्ट आहे. बादशहाला सिंहासन प्राप्त करुन जमल्यास आपल्या सत्तेचे थोडबहुत पुनरुज्जीवन करायचे होते. नानेसाहेबांस पेशवाई मिळवून मराठी राज्याचे पुरुज्जीवन करावयाचे होते. राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महल यांना आपली राज्ये हवी होती. आणि शिपायांना

गोन्या अधिका-यांच्या अन्यायी व उद्दाम वृत्तीचा सूड उगवावयाचा होतो. ध्येयामधील सुसूत्रता हिंदी नेत्यांत दिसून येत नाही.

तसेच सर्व बंडवाल्यांचा मिळून एक सुसूत्र कार्यक्रम, सुसूत्र योजना असे काहीच उठावात दिसत नाही अथवा त्यामागे एखादा हिकमती नेताही नव्हता. काही इतिहासकारांच्या मते बंडाची तारीख ३१ मे ठरली होती. परंतु बंडाचा स्फोट त्याआगोदर म्हणजे २९ मार्च बराकपूरच्या छावणीत घडून आला आणि बंडाचा कार्यक्रम सर्वत्र पोहचण्यापूर्वीच बंड सुरु झाले. त्यामुळे बंडाचे पूर्वनियोजन होऊ शकले नाही. यानंतर अनेक लष्करी छावण्यात शिपायांनी बंडे पुकारली पण त्यांच्या बंडाच्या हालचालीत कोणतीय सुसूत्रता राहिली नाही.

**हिंदी नेते लष्करी डावपेचात कमी पडले:-**

लढाया जिंकण्यासाठी जसे शौर्यपराक्रमादी गुण लागतात, तसे डावपेचाचेही गुणआवश्यक असतात. बंडवाल्यांनी दिल्ली काबीज केल्यावर हर प्रयत्न करुन ताब्यात ठेवणे जरुर होते. कारण दिल्ली ही हिंदुस्थानची पूर्वापार राजधानी या नात्याने तिचा सर्व हिंदुस्थानवर मानसशास्त्रीय प्रभाव होता. हा प्रभाव इंग्रजांनी ओळखला होता, म्हणून त्यांनी हर प्रयत्न करुन दिल्लीचा वेढा निकराने चालविला व ती काबीज केली. दिल्लीच्चा वेढा चालू असताना वेढा देऊन बसलेल्या इंग्रज फौजेला पंजाबमधून कुमक पोहचत असे. ही कुमक बंडवाल्यांना सहज बंद पाडता आली असती पण त्यांना ते सुचले नाही तसेच नानासाहेबाने कानपुर कडून चाल करून दिल्लीच्या मदतीत जावयास हवे होते, तेही त्यांने केले नाही व तो कानपूरकडेच वावरत राहिला, हिंदी नेते डावपेचात कमी पडल्याची उठावातील अनेक उदाहरणे आहेत.

**साधनसामग्री, अनुभव व मनोधैर्य यात इंग्रज वरचढ:-**

इंग्रजांजवळ तारायंत्रे, रेल्वे, डाकसेवा या दळणवळणाच्या सोयी होत्या. स्वाभाविकच इंग्रजी लष्कराच्या हालचाली अचूक व वेळेवर होण्यासाठी त्या साधनांचा मोठा उपयोग झाला. इंग्रजांना जलद गतीने हालचाली करता आल्या, बंदुका, तोफा इत्यादी लष्करी हत्यारांच्या बाबतीतही इंग्रज वरचढ होते. बहुतेक बंडवाले पारंपारिक हत्यारांनी लढत होते. इंग्रजांची हत्यारे आधुनिक व प्रभावी होती. इंग्रज सेनानीच्या ठिकाणी असामान्य मनोधैर्य, शिस्त, आपल्या कार्यावरील अविचल निष्ठा व देशभक्ती होती. इंग्रजाकडे कॅम्पबेल, हयू रोज, नील, लॉरेन्स इत्यादी असे अनेक गुणी अधिकारी व गुणी सेनापती होते.

**उठावास जनतेचा पाहिजे तसा पाठिंबा मिळाला नाही:-**

या उठावात कांही ठिकाणी हिंदी जनतेनेही भाग घेतल्याची कांही उदाहरणे आहेत. तथापि ज्या प्रमाणात सामान्य हिंदी माणसांनी इंग्रजाविरुध्द त्वेषाने उठाव करावयास हवा होता त्या प्रमाणात तो झाला नाही दक्षिणेतील राजेरजवाडे, जहागिरदार व सामान्य जनता शांत राहिलीच, पण उत्तरेकडील सामान्य जनता तटस्थ राहिली. काही ठिकाणी प्रारंभीचे यश मिळाल्यावर बंडवाल्यांनी आपल्या ताब्यात आलेल्या प्रदेशात स्वतःच लुटालुट सुरु केली. त्यामुळे अशा ठिकाणी उठावाला असणारी सहानुभूती बंडवाले मिळवू शकले नाहीत उलट हिंदी लोकांनी इंग्रज फौजातील सैनिकांना मार्गात साहय केल्याचे इंग्रज अधिकारी मान्य करतात. ज्या प्रदेशात बंडवाल्यांनी अत्याचार केले होते तेथे इंग्रजांची सरशी होत असल्याचे पाहून स्थानिक जनतेने बंडवाल्यांना पकडून इंग्रजांच्या स्वाधीन केले अथवा परस्पर ठार मारले.

**बंडवाल्यांच्या नेत्यांत दुही होती** :-

राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे या नेत्यांमधील ऐक्यासारखे कांही अपवाद वगळल्यास बंडवाल्यांच्या नेत्यांत फारसे ऐक्य नव्हते. जेव्हा दिल्ली इंग्रज फौजांनी वेढली गेली त्यावेळी कानपूरचे शिपाई दिल्लीच्या बचावात जाण्यात उत्तुक होते. पण असे म्हणतात की, नानासाहेबांनी त्यांना दिल्लीकडे जाऊ दिले नाही, कारण नानासाहेब बहादूरशहाचे

नेतृत्व अथवा स्वामित्व मानावयास तयार नव्हता दिल्ली बचावली असती तर बहादूरशहाचा सर्वमान्य नेता म्हणून उदय झाला असता व नानासाहेबास ते नको होते.

**आंतरराष्ट्रीय परिस्थिती इंग्रजांना अनुकूल** :-

या उठावाच्या पूर्वी नुकतेच रशियाशी चालू असलेले क्रिमियन युध्द संपून इंग्लंड बिजयी झाले होते. क्रिमियन युध्दातील विजयामुळे इंग्रजांची आतंरराष्ट्रीय प्रतीष्ठा व सामर्थ्य वाढले होते. इराणशी चाललेले युध्द देखील संपुष्टात आलेले होते. अजीमुल्ला व रंगो बापूजी यांनी रशिया, इजिप्त व तुर्कस्थानशी संपर्क साधला होता, पण त्यात त्यांना यश मिळू शकले नाही.

**भारतीयांची विश्वासघातकी वृत्ती:-**

तात्या टोपे यास पकडून देण्यासाठी जसा मानसिंहाने विश्वासघात केला तसा मोगल बादशहा बहादूरशहाचा नातेवाईक इलाही बख्श यानेही दिल्लीत विश्वासघात केला. त्याचप्रमाणे बख्तखानाच्या विश्वासघातमुळे हुमायुनव्या कबरीजवळ बहादुरशहा व बेगम जीनत महल या दोघांना इंग्रज पकडू शकले.

**सागरावर इंग्रजांचे नियंत्रण** :-

इंग्रजांचे समुद्रमार्गावर पूर्ण नियंत्रण होते. त्यामुळे समुद्रमार्गे युध्दसाहित्य वारसद पाठवू शकत होते प्रसंगी लष्करी हालचालीसाठी या मार्गाचा इंग्रजांना उपयोग झाला.

उठावा संबंधातील मतभिन्नता विचारात घेऊन उठावाचे वास्तव स्वरूप काय होते? हे शोधून काढणे जिकीरीचे काम आहे. १८५७ चा उठाव म्हणजे स्वातंत्र्ययुध्द होते असे विचार व्यक्त करणाऱ्या विचारवंता मध्ये आणि इतिकासकारात प्रामुख्याने खालील व्यक्तींचा समावेश होतो.

**१८५७ चा उठाव हे भारतीय स्वातंत्र्य युद्ध होते.**"

**१) संतोषकुमार रे:**

१८५७ चा उठाव म्हणजे लस्करी, सरंजामी अथवा धार्मिक उद्रेक माहून निश्‍चितपणे अधिक काहीतरी होतो, हिंदू आणि मुसलमान यांची घडवून आणलेली क्रांती होती. या क्रांतीचा प्रसार झपाट्याने झाला आणि तिने जनतेच्या बंडाचे आणि स्वातंत्र्ययुध्दाचे स्वरुप धारण केले. खात्रीनेच हा उठाव म्हणजे केवळ शिपायांचे बंड नव्हता तर तो प्रजेचा उठाव होता. जर तो शिपायांचे बंड असता अथवा मूठभर लोकांच्या उठाव असता तर त्यास युरोपातील इटालियन आणि फ्रेंच लोकांची सहानुभूती व सदिच्छा मिळाली नसती. फ्रान्तमध्ये हिंदी उठावाचे "*God's Judgement Upon English Rule in India*" असे वर्णन केले गेले,

**२) कर्नल मॉनसन :**

१८५७ च्या बंडाविरुध्दच्या लष्करी मोहिमेत भाग घेणारा इंग्रज अधिकारी म्हणतो. "त्या वेळच्या परिस्थितीने मला हे दाखवून दिले आहे की, हिंदी समाजात दुष्ट व द्वेषजनक भावना निर्माण करणारी अनेकविध कारणे होती. ही भावना वैयक्तिक नसून राष्ट्रीय स्वरुपाची होती."

**३) स्वातंत्र्यवीर वि.वा. सावरकर**

आपल्या अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' या सुप्रसिध्द ग्रंथात स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात, “१८५७ च्या क्रांतीची प्रमुख कारणे असलेली दिव्य तत्त्चे म्हणजे स्वधर्म व स्वराज्य ही होत. आपल्या प्राणप्रिय धर्मावर हल्ला झालेला आहे, असे यथार्थ रीतीने वित्तू लागताच स्वधर्मरक्षणार्थ जी दीन दीन ही गर्जना सुरु झाली, त्या गर्जनेत व आपले निसर्गदत्त स्वातंत्र्य कपटीपणाने हिरावून घेऊन आपल्या पायात गुलामगिरीच्या शृंखला घातल्या गेल्या हे पहाताच

स्वराज्यसंपादनेच्या पवित्र इच्छेने त्या दास्यशृंखलेवर केलेल्या प्रचंड आघातात त्या क्रांतीचे मूळ आहे." हा उठाव म्हणजे हिंदी लोकांनी आपल्या धार्मिक व राजकीय स्वातंत्र्यासाठी केलेले क्रांतीयुध्द असे मत सावरकरांनी मांडले आहे.

**४) अशोक मेहता :**

'*The Great Rebellion*"या पुस्तकात अशोक मेहता म्हणतात, "१८५७ चे बंड हे शिपायांच्या बंडाहून अधिक होते. अनेक हासास जाणाऱ्या शक्तींना वाट मोकळी करून देणाऱ्या सामाजिक ज्वालामुखीचा तो स्फोट होता." मेहतांच्या मते, "शिपायांना मायुभूमीच्या पारतंत्र्याची सतत जाणीव होती. शिपायांशिवाय लक्षावधी लोकांनी या बंडात भाग घेतला. शिपायांइतकीच प्रजाजनांची या बंडात हत्या झाली, काही ठिकाणी या बंडास जनतेचा पाठिंबा मिळाला. जे इंग्रजांच्या बाजूने गेले त्यांच्यावर हिंदी जनतेने सामाजिक बहिष्कार टाकला, इत्यादी

**१८५८ च्या उठावाचे स्वरुप :**

१८५७ च्या उठावाच्या स्वरूपाविषयी इतिहासात वेगवेगळे विचार प्रवाह आहेत. काहींच्या मते, हे इंग्रजांच्या विरोधात केलेले लष्कराचे बंड आहे. हा विचार इंग्रजी व इंग्रज धार्जिण्या इतिहासकारांनी माडला आहे. काही जणांना हा उठाव महान राष्ट्रीय उठाव वाटतो. काहींना तो हिंदी स्वातंत्र्ययुध्द वाटतो. तर काहींना हिंदू-मुसलमानांचा कट वाटतो.अनेक घटना हे बंड मर्यादित प्रमाणावर का होईना पण राष्ट्रीय उठावाच्या स्वरुपाचे होते, हे सिध्द करतात."

**५) डॉ.एस्.एन्.सेन,**

धर्मयुध्द म्हणून सुरुवात झालेल्या घटनेने शेवटी स्वातंत्र्ययुध्दाचे स्वरूप धारण केले. बंडवाल्यंना परकीय सत्ता उलथून टाकावयाची होती व मोगल बादशाहाच्या नेतृत्वाखाली जुना जमाना परत आणावायाचा होता, या विषयी शंका असण्याचे कारण नाही, आजकालच्या हिंदी अभ्यासकांना हे बंड म्हणजे परकीय वर्चस्वाविरुध्द केलेला उठाव वाटतो. जरी या उठावास सर्वच पाठिंबा मिळू शकला नाही, तरी देशाच्या काही भागातील सामान्य जनतेची सहानुभूती या उठावास होती. औधच्या नबाबी राज्यात जनतेने जो उठाव केला तो फारसा राष्ट्रीय स्वरुपाचा होता असे म्हणत असतानाच डॉ. सेन म्हणतात की, राष्ट्रीय हा शब्द फार मर्यादित अर्थान वापरला पाहिजे. कारण हिंदी राष्ट्रवादाची कल्पना अद्याप गर्भावस्थेत होती.

**६) इतिहासकार आऊट्रम**

इतिहासकार आऊट्रम हा या क्रांतीला फक्त शिपायांचे बंड म्हणत नाही. काडतूसांच्या घटनेनंतर या उठावाला पूर्णपणे संगठित स्वरुपाची क्रांती होय असे आऊट्रम यास म्हणावयाचे आहे. १८५७ च्या उठावात्त सैनिकांव्यतिरिक्त लाखो भारतीयांनी भाग घेतला होता. या स्वातंत्र्य युध्दात जितके सैनिक मरण पावले तितक्या नागरिकांनी देखील आत्मबलिदान केलेले आहे. हे क्रांतीकारक देशभक्त या लढयात आपल्या देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी सहभागी झाले होत, कष्ट दूर करण्यासाठी नव्हे, यावरुन हा उठाव म्हणजे शिपायांचे बंड नव्हे तर स्वातंत्र्ययुध्द होय हे स्पष्ट दिसत आहे. ज्या गतीने हे स्वातंत्रायुध्द पसरले यावरुन हे स्पष्ट होते की, यास जनतेचे प्रबल समर्थन होते. अनेक ठिकाणी नागरिकांनी सैनिकांना पूर्ण सहाय्य दिलेले आढळून येते. ज्या लोकांनी इंग्रजांची बाजू घेतली त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला होता. जनरल हॅवलॉक मास आपल्या सैनिकांना नदी पार करण्यासाठी नौका ही उपलब्ध झाल्या नाहीत व नाविक ही मिळाले नाहीत हे ऐतिहासिक सत्य दृष्टीआड करुन चालणार नाही. कानपूर येथे इंग्रजांनी मजूरांकडून काम करुन घेण्यासाठी दबाव टाकला म्हणून मजूर रात्रीच पळून गेले. अनेक ठिकाणी सर्व श्रेणीच्या भारतीयांनी इंग्रजांपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला. हा उठाव राष्ट्रीय स्वरुपाचा होता हे स्पष्ट करण्यासाठी महत्त्वाचे प्रमाण असे सांगता येईल की बात हिंदू- मुसलमान दोघांनी सांप्रदायिक एकतेच्या भावनेने खांद्याला खांदा लावून सहकार्य केलेले आढळते.

मोगल बादशहाने हिंदूना खुश करण्यासाठी संपूर्ण देशात गोहत्या बंदी केली. त्याने राजपुतान्यातील राजांना पाठविलेला पत्रात लिहीले आहे की, कोणत्याही मुल्यावर भारतातून इंग्रजांना निघतांना पाहणे ही माझी हार्दिक इच्छा आहे. संपूर्ण भारतवर्ष स्वातंत्र व्हावा ही देखील

माझी प्रबळ आकांक्षा आहे. इंग्रजांना भारतातून हाकलून लावले की, मग मला राज्जा करण्याची कोणतीच अभिलाषा नाही. जर आपण सारे शत्रूला देशाबाहेर घालविण्यास आपल्या तलवारी म्यानाबाहेर काढण्यास तयार असाल तर मी देखील आपल्या राज्यशक्तीला व अधिकारांना निवडक भारतीय राजांना सोपविण्यास तयार आहे. वरील मोगल सम्राटाने लिहीलेल्या पत्रावरुन हे स्पष्ट होते की, १८५७ चा उठाव म्हणजे भारतीयांचे स्वातंत्र्ययुध्द होते. हिंदू राजांनी देखील बादशाहच्या या विनंतीचा स्विकार केला व इंग्रजांच्या विरोधात शख उपसले.

**ब) १८५७ चा उठाव शिपायांचे बंड होते ?**

१८५७ चा उठाव हा शिपायांचे बंड होते असे म्हणणाऱ्या इतिहासकारांचा व अभ्यात्तकांचा गट मोठा आहे. या गटात प्रामुख्याने खालील इतिहासकारांचा व विचारवंतांच्चा समावेश होतो.

**१) सर जॉन लॉरेन्स :** बंड सुरु झाले त्यावेळी पंजाब प्रांताचा कारभार पहाणारा सर जॉन लॉरेन्स म्हणतो, बंडाचे खरे मूळ लष्करातच होते. त्याचे मूळ कारण काडतूस प्रकरण होग.

**२) सर जॉन सिली:** हे बंड म्हणजे संपूर्णत देशभिमानरहित स्वार्थी शिपायांचे बंड होते. त्यास एत्देशीय नेतृत्व अथवा जनतेचा पाठिंबा नव्हता.

**३) जनरल कॅम्पबेल:** प्रत्यक्ष ज्याने बंड मोडण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली तो जनरल कॅम्पबेल म्हणतो, हे निर्भेळ शिपायांचे बंड होते. ते सुच्दा बंगाल लष्करातील शिपायांचे बंड होते. कामगारानी संप करावा त्यात लाच हा लष्करी प्रकार समजावा लागतो. शिपायांचे वेळोवेळी लाड पुरविले गेल्यामुळे ते शेफारले गेले होते. त्यात चरबीदार काडतुसांची भर पडली. बंडाची तयारी गुप्तपणे झाली ही समजूत चकीची आहे. शिपायांना खरोखरच बंड करावयाचे नव्हते, तर आपले मनोगत पूर्ण करुन घ्यावयाचे होते.

**४) किशोरचंद्र मित्रा** त्या काळातील बंगाली विचारवंत होते. त्यांनी १८५८ साली काढलेले उद्‌गार, "हे बंड मुलतः लष्करी बंडाच्या स्वरुपाचे आहे. एक लाख शिपायांचे हे बंड आहे. जनतेच्या सहभागाचा त्याच्याशी संबंध नाही."

५) सुभाषचंद्र मुखोपाध्याय, हरिचंद्र मुखर्जी व सर सय्यद अहमद या विचारवंतानी अशीच मते मांडली आहे. ते म्हणतात, "१९ व्या शतकाच्या शेवट पर्यंत इंग्रजी शिक्षण घेतलेल्या हिंदी नेत्यांत व विचारवंतात १८५७ च्या उठावाबद्दल अशीच भावना हाती."

**६)** प्रसिध्द इतिहासकार थॉमसन व गॅरेट मा इतिहासकारांच्या मते, "या बंडास लष्करी बंड अथवा स्थानभ्रष्ट झालेल्या संस्थानिकांनी व जमिनदारांनी आपली गेलेली मालमत्ता व हक्क पुन्हा संपादन करण्यासाठी केलेला प्रयत्न, मोगल बादशाहीची पुनस्थापना करण्याचा प्रयत्न अथवा रक्तांचे युध्द अशा अनेक नावानी संबोधिता येईल. पण त्याकडे कशाही दृष्टीने पाहिले तरी ते स्थानिक, मर्यादित व असंघटित होते. मध्ययुगातील एखाद्या यादवी मुध्दाप्रमाणे अथवा बंगाल प्रांतातील अगदी पारंभाच्या मोहीमेप्रमाणे वाटते पण १८.५१७ च्या तन्हाळयातीला चार महिन्यांत मात्र अशी भीती वाटत होती है बंड खरोखरच स्वातंत्र्ययुध्द बनते की काय तसे झाले असते, तर इंग्रजांना हिंदुस्थान पुन्हा जिंकणे अशक्य होऊन बसले असते.

**७) पी. ई. रॉबर्टस** या इंग्रज इतिहासकराच्या मते, सर्वसाधारणपणे सर जॉन लॉरेन्सच्या दृष्टीकोन सत्याच्या जवळ जाणारा आहे. आपण हे गृहीत धरावयात हरकत नाही की हा उठाव मुलतः लष्करी स्वरुपाचा होता, पण जेव्हा

हिंदुस्थानात बराच राजकीय व सामाजिक असंतोष होता, तेव्हा तो घडून आता. या बंडाच्या योगाने स्वार्थी उदिष्टांची परिपूर्ती करु इच्छिणारे अनेक हितसंबंधी लोक या बंडात सामील झाले होते.

**८) प्रसिध्द हिंदी इतिहासकार डॉ. आर. सी. मुजुमदार** यांच्या मते १८५७ चे बंड ही राष्ट्रीय चळवळ मुळीच नव्हती. बंडाचे नेते राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेले नव्हते, बहादूशहाने शिपायांना मनः पूर्वक सहकार्य केले नाही. झाशीची राणी बंडाच्या प्रारंभी त्यात सहभागी झाली नाही. पण इंग्रजांनी तिच्यावर आरोप ठेवल्यावर ती त्यात सामील झाली.

**९)** प्रसिध्द हिंदी इतिहासकार **डॉ. ईश्वरीप्रसाद** यांच्यामते, या उठावात ग्रामीण व

शहरी जनतेत सारख्याच प्रमाणात देशभक्तीचा उद्रेक झालेला दिसतो. अनेक ठिकाणी भारतीय स्त्रियांनी पुरुषवेष धारण करुन आपल्या ध्येयासाठी लढा दिला. तत्कालीन पुरावा असे सांगतो की, सन १८५७-५८ च्या घटना म्हणजे शिपायांच्या बंडाहून अधिक होत्या पण ते स्वातंत्र्ययुध्द होते का?

स्वातंत्र्य संपादन करणे, हे तर या बंडाचे उदिदष्ट होते पण हिंदुस्थानचा बराच मोठा प्रदेश तटस्थपणे शांत राहीला अगर इंग्रजांना सहाय्यक झाला, हा संघर्ष म्हणजे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे युध्द या विधानास मारक ठरते, तेव्हा या बंडाचे वर्णन कंपनीची राजवट नष्ट करण्याचे व परकीय जोखडापासून स्वातंत्रा मिळण्याचे उदिदष्ट असलेले उत्तरेकडील बंड असेच करणे योग्य होईल.

१८५७ चा उठाव हे शिपायांचे बंड होते या समर्थनासाठी या गटाने अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. पेशवा नानासाहेबांचा वकील अझीमुल्लाखान आणि छत्रपतींचे वकील रंगो बापूजी यांनी कटाची सिध्दता केली अन्ता पुरावा मिळत नाही. इतर देशाकडूनही बंडवाल्यांना मदत मिळाल्याचे दिसत नाही उलट काही हिंदी लोकांनी इंग्रज लष्कराला मदत करून बंडवाल्यांना इंग्रजांच्या स्वाधीन केले अथवा ठार मारले. शिवाय कोणत्याही राष्ट्रीय युध्दात राष्ट्रीय पुढाऱ्यांची आवश्यकता असते असा एकही पुढारी अस्तिवात नव्हता. नियोजनाचा अभाव होता. बहादूरशहाचे राज्य गेले. नानासाहेब पेशवे यांचे वर्षासन बंद झाल्यानंतर त्यांना गतवैभव प्राप्त करण्याची इच्छा निर्माण झाली. अनेकांच्या पदव्या व किताब काढून घेतले.

झाशीचे संस्थान खालसा झाल्यामुळे राणी इंग्रजाविरुध्द असंतुष्ट झालेली होती. थोडक्यात राष्ट्राकरिता ध्येयवादाने प्रेरित होऊन इंग्रजांविरुध्द बंडाळीत सामील झालेली पुढारी मंडळी दिसत नाहीत. त्यामुळे जनता या युध्दातून तटस्थ राहिली. १८५७ च्या संघर्षात 'राष्ट्रीय 'या कल्पनेचा अभाव होता. राष्ट्रीय युध्दाला ज्या ज्या गोष्टी आवश्यक असतात त्यामध्ये अनेक गोष्टी अपूर्ण असल्याचे आपल्याला आढळून येते. भारत ही केवळ भौगोलिक संज्ञा होती. भारत घ्या राष्ट्राची जाणीव त्या काळात निर्माण झालेली नव्हती. या सर्व कारणामुळे त्याला रराष्ट्रीय युध्द म्हणता येत नाही. पंरतु १८५७ च्या उठावामुळे भारतीयांच्या राष्ट्रवादात वाढ झाली व पुढे याचे रुपांतर भारतीय राष्ट्रीय स्वांतत्र्या चळवळीत झाले.

**क) उठावाचे वास्तव स्वरुप :**

अशा प्रकारे अनेक देशी व विदेशी इतिहासकारांनी, नेत्यांनी व विचारवंतानी १८५७ च्या उठावाचा शोध घेण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केला आहे. इंग्रज इतिहासकार व राज्यकर्ते यांच्यामते हे केवळ शिपायांचे व दुखावलेल्या संरजामी मंडळींचे बंड होते, आणि विशेष म्हणजे असेच मत१९ व्या शतकातील हिंदी विचारवंतांनी मांडल्याचे आपण पाहिले, पण नंतरच्या काळात या घटनेला हिंदुस्थानचे स्वातंत्र्य युध्द असे मानले जाऊ लागले याचे कारण २० व्या शतकात प्रारंभापासून आपल्या देशातील सशस्त्र क्रांतीकारक या लढयाच्या तेजस्वी बाजूकडे आकृष्ट झाले. हा उठाव इंग्रज सत्तेविरुध्द असल्याने त्यांनी त्यात आपल्या लढयाच्या प्रेरणा शोधण्याचा प्रयत्न केला, उठावातील नेत्यांना ते हिंदुस्थानचे स्वातंत्र्यवीर मानू लागले. त्यामध्ये ऐतिहासिक संशोधनापेक्षा देशभक्तीचाच भाग अधिक होता. १८५७ च्या उठावात धारातीर्थी पडलेल्या आपल्या लाडक्या नेत्यांबद्दल हिंदी समाजाला अभिमान वाटावा व त्यांना

इंग्रजाविरुध्द संघर्ष करण्याची प्रेरणा मिळावी हा त्यांचा हेतु होता. पण आता इंग्रजी साम्राज्यही इतिहासजमा झाले आहे आणि आता इंग्रजांचे आपल्याशी शत्रुत्वाचे संबंध राहिले नाहीत. अशा स्थितीत हिंदुस्थानाच्या पारतंत्र्यामधील या महत्त्वाच्या घटनेचे मूल्यमापन आपण निःपक्षपाने करणे आवश्यक आहे.

प्रारंभी एक गोष्ठ लक्षात घेतली पाहिले की, बंड या शब्दाचा वाईट अर्थ या घटनेस लागू करता येणार नाही. बंड म्हणजे प्रस्थापित जुलमी राजवटीविरुध्द केलेला उठाव या अर्थाने बंड हा शब्द १८५७ चा उठाव हा केवळ शिपायांचे बंड होते असे म्हणण्यात राज्यकर्त्यांचे व इतिहासकाराचेहित होते. त्या उठावाधा स्वातंत्र्युध्द म्हणून ते का गौरव करतील? तसे त्यानी केले असते तर हिंदी समाजाच्या स्वातंत्र्याच्या हक्काची अप्रत्यक्ष कबुली दिल्याप्रमाणे झाले असते. तसेच २०व्या शतकाच्या प्रारंभापासून आमचे क्रांतीकारक या घटनेस स्वातंत्र्ययुद्ध का म्हणू लागले याचे कारण मागे सांगितलेच आहे. त्यांना १८५७ मध्ये आपल्या प्रेरणा हव्या होत्या. इंग्रजांना विरोध केलेली प्रत्येक व्यक्ती त्यांना प्रिय व राष्ट्रीय वाटत होती व ती देशाच्या स्वातंत्र्यासाठी झगडली असे ते मानत होते.

१८५७ च्या महान उठावाचे तळाशी असणारे सत्य या दोन आत्यंतिक टोकांच्या मतांच्या मध्यभागी आहे. हा उठाव म्हणजे निव्वळ शिपायांचे बंड असे म्हणणे शंभर टक्के खरे नाही व हा उठाव म्हणजे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा राष्ट्रीय लढा होता हे म्हणणेही शंभर टक्के बरोबर नाही.

शिपायांशिवाय हिंदी समाजातील संस्थानिकांनी, जमीनदारांनी, त्यांच्या आश्रयाखाली असणाऱ्या लक्षावधी जनतेने या उठावात सहभाग घेतला होता. काडतुसे तोंडाने तोडण्याची सक्ती गव्हर्नर जनरलने रद्द केली तरी शिपाई शांत राहिले नाहीत औधराज्यातील सामान्य प्रजेवर काही काडतुसे तोडाने तोडण्याची सक्ती सरकाने केली नव्हती मग ती बंडात सामील का झाले ? हिंदू व मुसलमान यांच्यात हेवेदावे असले तरी ते उठावात खांद्याला खांदा लावून लढताना दिसतात. तसेच हा उठाव म्हणजे केवळ शिपायांचे बंड असता तरी पुढे उठाव मोडल्यानंतर राणीच्या जाहीरनाम्यात हिंदुस्थानातील सर्व जनतेला शांत करण्याची व तिला अनेक प्रकारची आश्वासने देण्याची इंग्रजांना गरज नव्हती. सारांशं हे निव्वळ शिपायांचे बंड नव्हते पण त्यात समाजातील अनेकांनी सहभाग घेतला हे कबूल करावे लागेल.

पण जेव्हा आपण या उठावास स्वातंत्र्ययुध्द, राष्ट्रीय युध्द अशी विशेषणे जोडतो त्यावेळी हे शब्द जपून वापरले पाहिजेत. या उठावातील बंडवाल्यांना इंग्रजी अंमल नष्ट करावयाचा होता व आपली राज्ये पुन्हा स्वतंत्र करावयाची होती हे निर्विवाद सत्य आहे. एवढ्याच अर्थाने या उठावास स्वातंत्र्ययुध्द म्हणता येईल. पण ज्या अर्थाने २० व्या शतकात हिंदी स्वातंत्र्य म्हणजे अखिल हिंदी समाजाचे स्वातंत्र्य ही कल्पना विकसित झाली त्या अर्थाने स्वातंत्र्य १८५७ च्या उठावात दिसत नाही. बंडवाले विजयी झाले असते तर बहादूरशहा, नानासाहेब, झाशीची राणी, बेगम हजरत महल यांची राज्ये पुन्हा स्थापन झाली असती, कदाचित इंग्रजांशी एकनिष्ठ राहिलेल्या राजांशी त्यांनी युध्द सुरु केले असते, हिंदी राजे एकमेकांत यादवी लढाया खेळत बसले असते, असे होणे स्वाभाविक होते. ज्या अर्थाने अमेरिकन वसाहतवाल्यांनी आपल्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात व फ्रेंचानी आपल्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यात स्वातंत्र्य हा शब्द मोजला होता त्या शब्दाच्या अर्थाची व्यापकता बंडवालांच्या नेत्यांना लक्षात येणे कठीण होते. मेईजी क्रांतीनंतर ज्याप्रमाणे जपानी सरदारांनी आपले सर्व सरंजामी हक्क राष्ट्राच्या बरणी अर्पण करुन स्वतः सामान्य नागरिकांचे स्थान स्विकारले व स्वयंभू क्रांती करुन राष्ट्र आधुनिक बनवले तसे हिंदी नेते दाखविणार होते का? तशी कांही योजना, तसा काही विचार या काळात मांडला गेला होता का? हा सरंजामी नेत्यांनी सरंजामी हिंदी समाजाचे नेतृत्व स्विकारुन केलेला सरंजामी उठाव होता असे म्हटल्यास वावगे होणार नाही. राष्ट्रीय या शब्दातील अर्थबदलही असेच म्हणता येईल. हिंदूस्थानचे राष्ट्रीयत्त्व यावेळी समाजाच्या गर्भात होते. त्याचा जन्म व्हायचा होता. या संदर्भात पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात, हिंदुस्थानच्या जनतेला एकत्वाने बांधणाऱ्या राष्ट्रीय भावनेचा त्याकाळी अभाव होता, अर्वाचिन पध्दतीचे राष्ट्रीयत्व अजून जन्माला यायचे होते. राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय व विकास ही नंतरच्या काळातील घटना आहे. या राष्ट्रवादाच्या विकासाला अनेक आधुनिक हिंदी नेत्यांचा व विचारवंत यांचा हातभार लागलेला आहे, तेव्हा उठाव असे कसे म्हणता येईल, सारांश राष्ट्रवाद, स्वातंत्र्य या आधुनिक कल्पनांचा शोध १८५७ च्या उठावात घेणे इतिहासाला घरुन

होणार नाही. तसे केले तर आपण आपणाला आवडणाऱ्या कल्पना इतिहासाच्या माथ्यावर मारतो असा त्याचा अर्थ होईल.

**१८५७ च्या उठावाचे परिणाम :**

**१) कंपनी शासनाचा शेवट व ब्रिटीश सरकारचा प्रारंभ** १७७३ मध्ये रेग्युलेटिंग अ‍ॅक्ट हा कायदा ब्रिटीश पार्लमेंटने पारित केल्यापासून विलायत सरकारचे कंपनीच्या कारभारावरील नियंत्रण वाढतच गेले होते. ब्रिटीश सरकारने १८५८ चा कायदा पास करुन भारतात असलेल्या कंपनीच्या शासनाचा शेवट केला व ब्रिटीश सरकारच्या हाती भारतीय शासन व्यवस्थेची सूत्रे घेतली.

**२) राणीचा जाहीरनामा :** १८५७ च्या उठावातून इंग्रज राज्यकर्त्यांनी अनेक घडे घेतले. त्यामुळे त्यांनी हिंदुस्थानविषयक आपले धोरण बदलले १ नोव्हेंबर १८५८ रोजी गव्हर्नर जनरल लॉर्ड कैनिंगने अलाहाबाद मेथे दरबार भरवून व तेथे राणीचा जाहीरनामा घोषित करु आवासनांची खैरात करण्यात आली. आम्ही आता साम्राज्यविस्तार करणार नाही, देशी संस्थनिकाचे हक्क, मानमरातब आणि प्रतिष्ठा यांचा मान राखू, त्यांनी व आमच्या प्रजेने सुखा समाधानाने रहावे अशी आमची इच्छा आहे. अंतर्गत शांतता व चांगले सरकार यामुळेच हिंदुस्थानची सामाजिक प्रगती घडून येईल. देशी संस्थानिकांचे कंपनीशी जे करारमवार झाले असतील ते येथून पुढे आम्ही पाळू, संस्थानिकांना इच्छेनुसार दत्तक घेता येईल, त्यांची राज्ये खालसा केली जाणार नाहीत. धार्मिक अन्याय केला जाणार नाही. सरकार धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करणार नाही. सरकारी नोकऱ्या लायकी पाहून दिल्या जातील, धर्म, वर्ग किंवा जात त्याच्या मार्गात्त येणार नाही. राणीच्या जाहीरनाम्यातून उदात्त भावना प्रगट झालेली आहे.

**३) प्रशासनाचे केंद्रीयकरण** :- १८५७ च्या उठावानंतर ब्रिटीश सरकारने प्रशासनाचे केंद्रीयकरण करुन सत्ता आपल्या हाती घेतली. १८५८ पूर्वी असलेली भागीदार मंडळ व संचालक मंडळ बरखास्त करून भारत मंत्री व इंडिया कैन्सिल निर्माण करण्यात आले, भारत मंत्र्याचे व्हाईसरॉयवर अधिक नियंत्रण निर्माण झाले.

**४) हिंदी लष्कराची पुर्नरचना करण्यात आली** :- १८५७ चा उठाव प्रथम हिंदी लष्करातच झाला. त्यामुळे लष्कराची तातडीने पुर्नरचना करण्याचे काम हाती घेतले. लष्करांतील इंग्रज सैनिकांचे हिंदी लष्करांशी असलेले प्रमाण १:२ इतके वाढविण्यात आले. लष्करी खर्च वाढला. हिंदुस्थानातील महत्त्वाची ठिकाणे इंग्रज फौजेच्या हाती ठेवण्यात आली. शस्त्रागार व तोफखाना इंग्रज अधिकाऱ्यांच्या हाती ठेवण्यात आला. पूर्वी लष्करी तुकडचात संमिश्र जातीचे सैनिक असत. आता लष्करी तुकडचांची उभारणी जातवार करण्यात आली. लष्करामध्ये देशातील विविध गटांची अशी व्यवस्था करण्यात आली की, ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची भावना तयारच होऊ नये. आपल्या जातीजमातीच्या निष्ठा वाढीस लावल्या, जनतेपासून लष्कर दूर ठेवण्याचा हर प्रयत्न केला गेला. एवढेच नव्हे तर सैनिकांच्या हाती वर्तमानपत्रही पडणार नाही याची दक्षता घेण्यात आली. लष्करी बंड उद्‌भवले तर ते सहजासहजी चिरडून टाकण्याइतकी तमारी इंग्रजांनी हिंदी लष्कराची पुर्नरचना करून केली.

**५) इंग्रजी राजवटीबद्दल दहशत व तिरस्कार:-** बंडाचा मोड करीत असतानाकंपनीच्या लष्करी अधिकाऱ्यांनी शिपायांना तर ठार केलेच, शिवाय हजारो निरपराधी सी- पुरुषांचीही त्यांनी कत्तल केली, त्यातून वृध्द व बालकेही सुटली नाहीत. जवळजवळ एक लाख माणसांना फाशी देण्यात आली त्यांची प्रेते कित्येक दिवस झाडावर टांगून ठेवण्यात आली. ज्याला फाशी द्यावयाची त्याला इंग्रज प्रथम चोपून काढत, नंतर त्यांच्या शरीरावरील केस उपटत, जवळच कत्तल केलेल्या लोकांचे रक्त सांडलेले असे, ते रक्त त्यास जिभेने वाटावयास भाग पाडत व इतकी विटंबना केल्यावर मग त्यात फासावर लटकविले जाई. त्यांचे वागणे पशूप्रमाणे झाले होते. याचा परिणाम हिंदी लोकांच्या मनावर झाला. त्यांनी इंग्रजांबद्दल वहशत घेतली. हिंदी लोकांनी भविष्यात असे बंड करु नये, हे इंग्रजांचे उद्दिष्ट त्यांच्या क्रूर कृत्याने कदाचित साध्य झाले असेल, पण त्यांच्या हिंदुस्थानातील राजवटीला कलंक लागला. हिंदी लोकांच्या मनात तिरस्कार निर्माण झाला, १८५७ च्या कौर्याचे व्रण ते विसरले नाहीत. त्यांच्यातूनच पुढे इंग्रजी राजवट उलथून पाडू इच्छिणाऱ्या सशस्त्र

क्रांतीकारकांच्या संघटनांचा जन्म झाला. या क्रांतीकारकांनी इंग्रजाबद्दल द्वेष, शत्रुत्व व स्वदेशाबद्दल प्रेम निर्माण करण्याचा मोठा प्रयत्न केला.

**६) उठावापासून हिदी लोकांनी घेतलेला घडा**:- या उठावापासून इंग्रजांनी जसे काही घड़े घेतले तसे ते हिंदी लोकांनीही घेतले. सरंजामी पध्दतीचा उठाव करुन व पारंपारिक हत्यारांनी लढून आता इंग्रजी राज्य नष्ट करता येणार नाही याची त्यांना जाणीव झाली. नानासाहेब अथवा झाशीची राणी आपले नेतृत्व करु शकणार नाही. तो जमाना आला इतिहासजमा झाला, नवा जमाना तुरु झाला असून नव्या जमान्यात इंग्रज साम्रज्यवाद्यांशी लढण्याची नवी हत्यारे, नवी साधने आपण शोधून काढली पाहिजेत, याची जाणीव हिंदी विचारवंताना झाली. शस्त्राच्या बळाने इंग्रजांचे राज्य नष्ट करण्याच्या भरीला न पडता, त्यांची विद्या संपादन करुन आपण त्यांच्यासारखे होऊनच आपली प्रगती साधता येईल हा धडा हिंदी लोकांनी या उठावातून घेतला. आपण राजेशाही अथवा संरजामशाही यांच्या पुनरुज्जीवनासाठी न घडपडता स्वातंत्र्य, लोकशाही व व्यक्तीस्वातंत्र्य या नव्या युगाच्या हक्कांसाठी संघर्ष केला पाहिजे. या नव्या जाणिवेतून पुढे राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली.

**७) हिंदू-मुसलमानांतील दरी वाढत गेली:** इतिहासात कधीही असे न दिसलेले ऐक्य हिंदू व मुसलमान या दोन धर्मात १८५७ च्या उठावाने घडवून आणले, या दोन्हीही जाती खांद्याला खांदा लावून लढल्या. पण हे ऐक्य पुढे टिकले नाही. पुढे असे ऐक्य होऊ नये म्हणून इंग्रजांनी प्रयत्न केलेले दिसून येतात. बंडामध्ये हिंदूपेक्षा मुसलमान अधिक द्वेषाने लढले होते. स्वाभाविकच इंग्रजांचा राग त्यांच्यावर अधिक होता. बंडाचा मोड करताना इंग्रजांनी त्यांच्यावर अधिक दहशत बसविली. इंग्रजांनी राज्यकारभारत मुसलमानांपेक्षा हिंदूना अधिक जवळ करण्यास सुरवात केली. परिणामी हिंदू व मुसलमान यांच्यातील मतभेदाची दरी रुंदावत गेली.

**८) हिंदुस्थानचे परराष्ट्रीय धोरण इंग्रज ठरवू लागले**:- नव्या राजवटीने एक अत्यंत महत्त्वाचा बदल घडवून आणला. तो म्हणजे हिंदुस्थानचे परराष्ट्रीय धोरण, त्यांचे भवितव्य, इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणाशी जखडण्ण्यात आले. इंग्लंडचा शत्रू तो हिंदूस्थानचाही शत्रू आहे असे राज्यकर्ते हिंदी लोकांना सांगू लागले. पुढे पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात हिंदूस्थान इंग्लडच्या बाजूने युध्दात ओढला गेला.

**९) इंग्रजांची हिंदुस्थानवरील पकड घट्ट झाली:** - उठावातील हिंदी लोकांच्या पाडावामुळे इंग्लंडची हिंदुस्थानवरील पकड घट्ट झाली. आता हिंदुस्थानात सशस्त्र उठाव झाला तरी तो मोहून टाकण्याची सर्व व्यवस्था इंग्रजांनी केली. शिवाय देशी संस्थानिकांशी उदार धोरण ठेवून त्यांना त्यांनी आपल्या पूर्ण नियंत्रणाखाली आणले, इंग्रजांना सशस्त्र विरोध करण्याचे सामर्थ्य कोणाही हिंदी राजाजवळ आता राहिले नव्हते व विरोध करावयाचे कारणही उरले नव्हते. हिंदी समाजाचे नेतृत्व सुशिक्षितांकडे जाऊ पहात होते व हे सुशिक्षित तर इंग्रज साम्राज्याशी एकनिष्ठ राहु इच्छिणारे व त्यांच्या न्यासबुध्दीवर विश्वास ठेवणारे होते. इंग्रज साम्राज्याला आता हिंदुस्थानात कोणताही मोठा धोका उरला नव्हता.

# प्रकरण ५- राष्ट्रीय जागृतीचा विकास

## १८८५ पुर्वीच्या राजकिय संघटना:- बंगाल -

## बंगाल प्रांतातील राजकीय संघटना

### वंगभाषा प्रकाशिका सभा :-

वंगभाषा प्रकाशिका सभा भारतीयांची पहिली राजकीय संघटना म्हणून हिचा उल्लेख केला जातो. कारण राष्ट्रवादाचा पहिला प्रकट आविष्कार म्हणजे सुशिक्षित भारतीयांनी बांधलेली त्यांची 'वंगभाषा प्रकाशिका सभा' होय. हिची स्थापना सन १८३६ मध्ये झाली. राजा राममोहन रॉय यांच्या सहकार्याने कलकत्ता येथे ती स्थापन केली गेली. धार्मिक व सामाजिक कार्यासाठी माणसे एकत्र येते. परंतु राजकीय प्रश्नांना किंवा आर्थिक प्रश्नांना घेऊन संघटना बांधण्याचा हा पहिला प्रयत्न होता. या संघटनेच्या बैठकीमध्ये राजकीय विषय, सरकारी धोरणाबाबत, त्यात सुधारणा करण्यासंबंधी सरकारकडे प्रस्ताव पाठविले जात असत.

### जमिनदारी असोशिएशन:-

जमिनदारांची संघटना द्वारकानाथ टागोर यांनी ही संघटना इ.स. १८३७ साली स्थापन केली. कंपनीच्या काळात बरेचसे इनामदार व जमिनदार डबघाईस आलेले होते. ही संघटना प्रामुख्याने बंगाल, बिहार, पर्यंत प्रसारित झालेली होती. बंगालमधील मोठ्या जमिनदारांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी या संघटनेची स्थापना झाली होती. या संघटनेचे उद्दिष्ट जरी मर्यादित असले तरी आपल्या गाहाण्यांची सरकार दरबारी दाद लावून घेण्यासाठी सनदशीर राजकीय मार्ग त्यांनी अनुसरला होता. भारतातील काही ब्रिटिशांची तिला सहानुभूती तर होतीच पण इंग्लंडमधील ब्रिटिश इंडिया सोसायटीशी देखील संपर्क होता.

### बंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी

या सोसायटीची स्थापना सन १८४३ मध्ये करण्यात आली. या सोसायटीचा मुख्य उद्देश होता बंगालमधील लोकांच्या संपर्कात राहून प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती घेणे. ती सर्व माहिती लोकांच्यामध्ये प्रसारित करणे. त्यानंतर या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी सनदशीर व शांततापूर्ण मार्गाने प्रयत्न करणे.

### ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इ.स. १८५१ साली ह नवी संघटना स्थापन झाली होती. अर्थात पूर्वीच्या अस्तित्वात असणाऱ्या 'जमिनदार असोसिएशन' तसेच 'ब्रिटिश इंडिया सोसायटी' या दोन असोसिएशनचे एकीकरण करून ही नवी 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन'ची स्थापना करण्यात आली होती. या असोसिएशनने प्रामुख्याने केलेले कार्य म्हणजे, दर वीस वर्षांनी ब्रिटिश पार्लमेंटकडून 'चार्टर ॲक्ट' लागू केला जात असे. ते इ.स. १८५३ ला चार्टर ॲक्ट लागू केला जाणार होता. त्यामुळे वरील संघटनेने चार्टर ॲक्टमध्ये आपल्या मागण्याचा विचार करून नंतर ॲक्ट लागू करण्यात यावा यासाठी पुढील सूचनांची मागणी केली होती. उदा. -

१. न्यायविषयक अधिकार कार्यकारी मंडळापासून स्वतंत्र ठेवावेत.

२. लोकांचा सहभाग असलेल्या स्वतंत्र कायदेमंडळाची स्थापना करण्यात आली.

३. स्टँप ड्युटी, अबकारी कर आणि मिठावरील कर रद्द करण्यात यावा.

४. उच्च अधिकाऱ्यांच्या वेतनात कपात करण्यात यावी.

या वरील सूचनांचा ब्रिटिश पार्लमेंटने सहानुभूतीपूर्वक विचार करून कायदेविषयक कामकाजासाठी इ.स. १८५३ च्या नव्या चार्टर ॲक्टमध्ये गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलमध्ये सहा हिंदी सभासदांचा समावेश करण्यात आला.

## ईस्ट इंडिया असोसिएशन

सन १८६६ मध्ये लंडन येथे दादाभाई नौरोजीनी व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या सहकार्याने 'ईस्ट इंडिया असोसिएशन'ची स्थापना केली होती. याचा प्रमुख उद्देश होता ब्रिटिश जनतेला भारतीय समस्यांची ओळख करून देणे. भारताच्या उन्नतीबाबत आस्था असलेल्या सर्वांनाच या संघटनेची दारे मोकळी होती. त्यामुळे विलियम वेडरबर्न सारखी भारताविषयी सहानुभूती असलेली सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकारही या संघटनेत होते. या असोसिएशनच्या या संस्थेच्या नियमित बैठका होत असत. त्यात भारतीय समस्यावर चर्चा होई. त्यामध्ये राजकीय सुधारणांची मागणी केली जाई. एका दशकात या संस्थेच्या शाखा मद्रास, मुंबई, कलकत्ता येथेही स्थापन झाल्या. पण भारतातील शाखांच्या पेक्षा लंडन येथील शाखेचे कार्य अधिक महत्त्वाचे ठरले. लंडन येथे हेन्री फॉसेट, चार्लस ब्रेडलॉ, विलियम डिग्बी, विलियम वेडरबर्न इ. उदारमतवादी इंग्रजांनी या संस्थेच्या व्यासपीठावरून भारताविषयी ब्रिटिश लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. फॉसिटने तर पार्लमेंटचेही लक्ष भारतीय प्रश्नांच्यावर केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. भारतात राष्ट्रीय चळवळीचे बीजे रुजू लागल्यानंतर साहजिकच या संस्थेचे कार्य मंदावू लागले.

## इंडियन लीग

सन १८७० नंतर बंगालमध्ये नव्या राजकीय विचारांचे स्फुरण दृष्टोत्पत्तीस येऊ लागले. राजकीय हक्कांची जाणीव होऊ लागलेल्या सुशिक्षित महत्त्वाकांक्षी बंगाली तरुणांना आपल्या विचारांच्या अभिव्यक्तीसाठी जुन्या राजकीय संस्थांची व्यासपीठे अपुरी आहेत, या संघटना नव्या विचारांना वाचा फोडण्यास असमर्थ आहेत याची जाणीव होऊ लागली व त्यासाठी नव्या संघटना प्रस्थापित करण्याची निकड त्यांना जाणवली. त्यातूनच 'अमृत बझार' पत्रिकेचे संपादक शिशिरकुमार घोष यांनी पुढाकार घेऊन 'इंडियन लीग'ची सन १८७५ साली स्थापना केली. भारतीय जनतेत राष्ट्रवाद जागृत करून राजकीय जागृती करण्याचा या संस्थेचा हेतू होता. बंगालमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी कार्य करीत असलेल्या स्थानिक संस्थांशी संपर्क साधून परिणामकारकरित्या राजकीय कार्य करण्यासाठी सर्वांनी संघटित होण्याचे आव्हान इंडियन लीगने दिले. या लीगच्या कार्याबद्दल कलकत्ता येथील 'इंग्लिशमन' या वृत्तपत्राने 'भारतीय जनतेतील राजकीय जागृतीचा आविष्कार प्रथमच स्पष्ट करणारी संघटना' असा या संस्थेचा उल्लेख केला आहे. परंतु पुढे कलकत्ता येथे स्थापन झालेल्या 'इंडियन असोसिएशन' या राजकीय संस्थेपुढे ही संस्था गौण ठरली.

## इंडियन असोसिएशन

सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे या संस्थेचे संस्थापक. त्यांनी २६ जुलै, १८७६ रोजी कलकत्त्याच्या अलबर्ट हॉलमध्ये भरलेल्या सभेत 'इंडियन असोसिएशन'च्या स्थापनेची घोषणा केली होती. इंडियन असोसिएशन स्थापन करण्यामागे त्यांचा उद्देश होता सुशिक्षित महत्त्वाकांक्षी मध्यम वर्गीयांच्या व्यथांना वाचा फोडून त्यांना सार्वजनिक कार्यासाठी संघटित करण्याची गरज त्यांना प्रकर्षाने जाणवू लागली. बंगालमधील तत्कालीन राजकीय संस्था जमीनदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व त्यांच्या हितसंबंधाची जपणूक करणाऱ्या असल्यामुळे त्या मध्यम- वर्गियांच्या कल्याणासीच काळजी वाहू शकणार नाहीत असे वाटून त्यांनी नवी स्वतंत्र संस्था स्थापन केली. या असोसिएशनच्या स्थापनेवेळीच त्याची उद्दिष्टे त्यांनी स्पष्ट केली होती. ही संस्था अखिल भारतीय चळवळीचे केंद्र असावी असा त्यामागील हेतू होता. कारण सर्व भारतीयांना एका समान

राजकीय व्यासपीठावर एकत्र आणण्याची गरज बंगालमधील भारतीय नेत्यांना प्रकर्षाने जाणवत होती. या संस्थेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे

१. समान राजकीय हितसंबंधाच्या व आशा-आकांक्षाच्या जाणिवेद्वारा भारतातील भिन्न वंशीय व भिन्न जातीय लोकांची (एकी घडवून आणणे.)

२. देशात प्रबळ लोकमत तयार करणे.

३. महत्त्वाच्या समस्यांची उकल व्हावी याकरिता सार्वजनिक चळवळ संघटित करून त्यात सहभागी होण्यास सामान्य नागरिकांना उद्युक्त करणे.

४. हिंदू-मुसलमानात मैत्रीची भावना जोपासणे. इ.

आनंद मोहन बोस हे या संस्थेचे पहिले सचिव होते. राजकीय जागृतीचे माध्यम म्हणून 'बंगाली' हे वृत्तपत्र या संस्थेमार्फत १८७९ मध्ये प्रकाशित होऊ लागले, या संस्थेने राज्यकर्त्यांच्या प्रतिगामी धोरणावरच टीकेचे अस्त्र चालविले तर वेळोवेळी भारताच्या हितसंबंधाना बाधक होणाऱ्या शासकीय धोरणाबाबत लोकमत जागृत करण्यासाठी सार्वजनिक सभा भरवल्या. अफगाण युद्धाच्या वेळी सरकारने केलेला भारतीय निधीचा अपव्यय, परदेशी कापडाच्या आयातीवर घटविलेला आयात कर, दुष्काळाबाबतचे शासनाचे औदासिन्य इ. विषयावर लोकमत जागृत करण्यात या संस्थेला यश मिळाले. थोडक्यात, भारताच्या राजकीय चळवळीला व्यापक राष्ट्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न करणारी पहिली संघटना म्हणून इंडियन असोसिएशनचे स्थान भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात महत्त्वाचे मानले जाते.

## मुंबई प्रांतातील राजकीय संघटना

### बॉम्बे असोसिएशन

बंगालप्रमाणेच मुंबई इलाख्यातही राजकीय जागृतीची सुरुवात झाली होती. त्यामध्ये जगन्नाथ शंकरशेट यांच्या पुढाकाराने मुंबईतील काही सुशिक्षित, उत्साही तरुणांनी एकत्र येऊन 'बॉम्बे असोसिएशन' नावाची संस्था मुंबई येथे सन १८५२ मध्ये स्थापन केली. जनतेचे प्रश्न, अडचणी सरकार पर्यंत पोहोचविणे आणि सनदशीर मागनि सोडविणे असे संस्थेचे उद्देश होते. मुंबईतील पारशी, मुसलमान, हिंदू, पोर्तुगीज, ख्रिश्चन इ. विभिन्न धर्मगटांचा या संस्थेला पाठिंबा होता. भारतीयांच्या अडचणी राज्यकर्त्यांच्या कानी घालून त्या सोडविण्याचा प्रयत्न ह्या संस्थेचा होता. सन १८५३ साली ब्रिटिश पार्लमेंटने ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेचे नूतनीकरण करणार हे ध्यानात घेऊन सन १८५२ मध्ये कंपनी सरकारच्या धोरणावर प्रखर टीका करणारे आणि भारतीयांच्यासाठी अधिकाराची मागणी करणारे एक लांबलचक निवेदन तयार करून ते त्यांनी पार्लमेंटला सादर केले. या निवेदनातील विचार इतकी सुसूत्रपणे व तर्कशुद्ध मांडले होते की इंग्लंडचे उदारमतवादी पुढारीही प्रभावित झाले. नोकरीत भारतीयांना उच्चपदे मिळावीत अशा मागण्याही ह्या संस्थेने सरकारकडे केल्या होत्या.

### सार्वजनिक सभा

सनदशीर राजकीय चळवळीची पायाभरणी मुंबई इलाख्यात करणारी पहिली उल्लेखनीय संस्था म्हणजे सन १८७० पासून पुण्यात कार्यरत असलेली सार्वजनिक सभा. यापूर्वीच या सभेची स्थापना १८६७ साली 'पूना असोसिएशन' म्हणून झाली होती. त्यानंतर जवळ जवळ तीन वर्षांनी त्याचे नामकरण 'सार्वजनिक सभा' म्हणून करण्यात आले. या संस्थेच्या स्थापनेच्या पुढाकारामध्ये गणेश वासुदेव जोशी यांचा सहभाग होता. त्यांना तत्कालीन काळात आणि त्यानंतरही 'सार्वजनिक काका' म्हणूनच ओळखले जाते. सार्वजनिक काका

स्वतः काढलेल्या सुताचे कपडे वापरत. त्यांनी ठिकठिकाणी स्वदेशी मालाची दुकाने उघडले व स्वदेशी मालाला उत्तेजन देऊन राजकीयदृष्ट्या लोकमत जागृत करण्यास व राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यास मदत केली. पुण्याच्या जवळ असणाऱ्या मराठे राजेरजवाड्यांचा या संस्थेशी निकटचा संबंध होता. काही सरदार या संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिवही होते. न्या. रानडे हे या संस्थेचे प्रेरणाशक्ती आणि सुत्रचालक होते. सन १८७७ साली महाराष्ट्रावर दुष्काळाची छाया पडली असता या संस्थेने गावोगावी कार्यकर्ते पाठवून दुष्काळग्रस्तांना मदत देण्याचे कार्य हाती घेतले. सरकारी मदत कार्याला सहकार्य दिले. त्याचबरोबर दुष्काळ-पिडीत जनतेच्या व शेतकऱ्यांच्या मागण्या निवेदनाद्वारे शासनाला सादर करून, लोकमताचे दडपण सरकारवर आणून शेतकऱ्यांच्यासाठी सवलतीही मिळवल्या. या संस्थेच्या अविरत व निःस्वार्थ कार्यामुळे सार्वजनिक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळे सार्वजनिक सभा ही महाराष्ट्रातील लोकमान्य राजकीय संस्था बनली. तिच्या शाखा वाई, सातारा, सोलापूर, नाशिक येथेही स्थापन झाल्या. सन १८९१ ते १८९६ च्या दरम्यान गो. कृ. गोखले या संस्थेचे सचिव होते. तर सन १८९६ साली या सभेची सूत्रे टिळकांच्या जहाल गटाच्या हाती आली. त्यांनी या संस्थेचा राजकीय जागृतीसाठी अधिक हिरीरीने उपयोग करून घेतला. थोडक्यात, सार्वजनिक व राजकीय जागृतीचे जे कार्य केले व सनदशीर राजकीय चळवळीचा पाया पश्चिम महाराष्ट्रात घालून आर्थिक उन्नतीसाठी औद्योगिकरणाचा आणि स्वदेशीचा मंत्र या संस्थेने घालून दिला म्हणून सार्वजनिक सभेला आगळे स्थान आहे.

**बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन**

सन १८८५ साली फिरोजशहा मेहता, बदुद्दीन तय्यबजी, न्या. के. टी. तेलंग यांनी ही संस्था स्थापन केली. ह्या पुढाऱ्यांचा भारतातील ब्रिटिश सत्तेची स्थापना ही ईश्वरी योजना आहे असा विश्वास होता. कारण तत्कालीन काळात या व्यक्ती पाश्चात्य शिक्षणाने व उदारमतवादी विचारप्रणालीने प्रभावित झालेल्या होत्या. ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर त्यांची श्रद्धा होती. अर्थात त्यावेळी मुंबईत अस्तित्वात असलेल्या बॉम्बे असोसिएशन व 'ईस्ट इंडिया असोसिएशन' या संस्था फारशा क्रियाशील नव्हत्या. त्यामुळे न्या. तेलंग, फिरोजशहा मेहता इ. नी नवी संस्था प्रस्थापित करण्याची गरज वाटली त्यामुळे 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन'ची स्थापना केली. या संस्थेने प्रामुख्याने ब्रिटिशांच्या शोषक धोरणावर व दडपशाहीवर टीका करीत असत. भारतीयांना स्वशासनाचे अधिकार मिळावेत ही त्यांची प्रामुख्याने मागणी होती. त्यासाठी त्यांनी सार्वजनिक सभातून भारतीयांच्या प्रश्नांची चर्चा करून राजकीयदृष्ट्या लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला, तसेच जनतेच्या मागण्या निवेदन, अर्ज, विनंत्या याद्वारे सरकारला सादर करण्याचे मुख्य कार्य केले.

**मद्रास इलाख्यातील संघटना**

**मद्रास नेटिव्ह असोसिएशन**

मद्रासमध्ये सन १८५२ साली 'मद्रास नेटिव्ह असोसिएशन'ची स्थापन करण्यात आली. बंगालमधील ब्रिटिश इंडियन असो. ची शाखा म्हणून पाहिले जात असे. या संस्थेने कंपनी सरकारच्या गैर कारभाराबाबत प्रकाश टाकणारे एक निवेदन पार्लमेंटला सादर केले होते. या निवेदनामध्ये शेतकऱ्यांवर लादला गेलेला अवास्तव कर, त्याचबरोबर महसूल अधिकाऱ्यांच्याकडून होणारी शेतकऱ्यांच्या पिळवणूक याचा उल्लेख केलेला होता. धरणे, कालवे व पूल बांधण्याची, शिक्षणप्रसाराची व स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याची मागणीसुद्धा केली होती.

**मद्रास महाजन सभा**

'मद्रास महाजन सभे'ची स्थापना सन १८८४ साली करण्यात आली होती. रंगय्या नायडू, सुब्बराव पंतलू, एम. वी. राघवाचार्य, सुब्रह्मण्यम् इ. विद्वान मंडळानी हिच्या स्थापनेमध्ये पुढाकार घेतला होता. सन १८८५ मध्ये या सभेने एक मोठी परिषद आयोजित केलेली होती. त्यामध्ये त्यांनी विधिमंडळाचा विस्तार करून

त्यात भारतीय प्रतिनिधींचा अंतर्भाव करण्याचा व कार्यकारी मंडळ व न्यायमंडळाचे अधिकार वेगळे करण्याचा ठराव पास करण्यात आले होते.

## राष्ट्रीय जागृतीत भारतातील मध्यमवर्गांची भुमिका:-

कोणत्याही समाजाचे आणि सामाजिक वर्गाचे वर्गीकरण उत्पादन पद्धतीच्या अधारावर केले जाते. असे असले तरी सामाजिक वर्ग हे वास्तविकतः आर्थिक वर्ग मानले गेले पाहीजे. उत्पादन पद्धतीच्या आधारावर वर्ग संबंध स्थापन होतात. आणि जेव्हा उत्पादन प्रक्रिया खंडीत होते, तेव्हा या उत्पादन प्रक्रियेवर अधारीत असणारे वर्ग खंडीत होण्यास सुरुवात होते. आणि ही उत्पादन व्यवस्था खंडीत झाल्यानंतर नव्या उत्पादन व्यवस्थेचा उदय होतो ही नवी उत्पादन व्यवस्था नवे उत्पादन संबंध आणि नव्या सामाजिक व आर्थिक वर्गाना जन्म देते. भारतीय कृषी, उद्योग, व्यापार, ग्रामिण व्यवस्था, शहरी व्यवस्था, आणि येथील राजकिय आणि सांस्कृतीक व्यवस्थेवर इंग्रजी राज्याच्या प्रभावामुळे काही जुने वर्ग उदा. हस्तव्यवसाय करणारे वर्ग नष्ट झाले. आणि काही नवीन वर्ग उदयास आले. यात सावकार, भांडवलदार, बुद्धीजीवी, मध्यम वर्ग आणि कामगार वर्ग मात्र संपूर्ण भारताय या वर्गाचा उदय एकसमान नव्हता.

भारतात नव्या सामाजिक वर्गाचा उदय ब्रिटीश शासनकाळात एक नवी सामाजिक व्यवस्था, नव्या प्रकारची राज्यव्यवस्था, नवे प्रशासकिय तंत्र, इंग्रजी राजवटीतील नव्या शिक्षण प्रसाराचा प्रत्यक्ष परिणाम होता. इतिहासकाळात हे वर्ग भारतीय समाजात नव्हते. वर्गाचा उदय भारतात इंग्रजी राज्याच्या विजयनंतर विकसित झालेल्या नव्या आर्थिक रचनेचा परिणाम होता. ब्रिटीशांनी भारताचा जो भाग जिंकून घेतला त्या भागात नवी अर्थव्यवस्था आमलाम आणली. या नव्या अर्थव्यवस्थेच्या परिणामाने नव्या वर्गांना जन्म दिला. भारतात सर्वप्रथम ब्रिटीशांनी बंगल प्रांतात कट आणि विजयद्वारे सत्ता हस्तगत केली. त्यामुळे सर्वप्रथम या भागात नव्या वर्गाचा उदय झाला. आणि जमिनदारीच्या रुपाने १७९३ मध्ये जमिनीवर खागजी मालकी प्रस्थापीत करण्यात आली. त्यामुळे बंगालमध्ये सर्वप्रथम दोन नव्या वगर्गाचा उदय झाला. एक जमिनदार आणि दुसरा कुळे. सर्वप्रथम बंगाल आणि मुंबईमध्ये अनुक्रमे ज्युट आणि कापुस उद्योग काढण्यात आले. त्यामुळे उद्योगपती वर्गाच्या उदयास पोषक परिस्थिती तयार झाली. या शिवाय ब्रिटीशांनी ज्या भागात आपली सत्ता स्थापन केली त्या भागात प्रशासन चालविण्यासाठी प्रशासकीय व्यवस्था आमलात आणल्या. ब्रिटीशांनी विजय मिळविल्यानंतर प्रशासन चालविण्यासाठी आधुनिक शिक्षणसंस्था काढल्या या शिक्षणसंस्थांमधुन वैद्यकिय, कायदा, विज्ञान या सारखे आधुनिक शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम म्हणून व्यावसाईक वर्गाचा उदय झाला. ब्रिटीशांच्या भारतात आगमनापुर्वी मुस्लिम समाजातील उच्च समजला जाणारा वर्ग व्यापार आणि सावकारी या धंद्यांपासून दूर राहीला., त्यांनी प्रशासकिय आणि सैनिक सेवा आपले कार्य मानले. या शिवाय मुसलमान हे उत्तर भारतात मोठ्या संख्येने रहात असल्यामुळे ब्रिटिशांनी उत्तर भारतातबर नंतर सत्ता प्रस्थापित केली. परिणामी ब्रिटीशांच्या धोरणांच्या प्रभावाखाली मुसलमान इतर वर्गाच्या तुलनेने नंतर आला. परिणामी हिंदूच्या तुलनेने मुसलमानांमध्ये सुशिक्षीत मध्यमवर्गाचा उदय नंतर झाला.

इंग्रज सरकारने सत्ता हस्तगत केल्यानंतर करप्रनाली सुव्यस्थित करण्यासाठी जमिनीवर खागजी मालकी हक्कांची सुरुवात केली. भिन्न-भिन्न समुदायांमध्ये या नव्या समाजिक वर्गाच्या उदयाची प्रक्रिया समान नव्हती. कारण इंग्रजांच्या सत्तास्थापनेपूर्वी काही खास वर्ग निश्चित आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यामध्ये गुंतलेले होते. उदा. इग्रजांच्या आगमनापुर्वी हिंदूमध्ये वाणी व्यापारी जमात होती. ब्राह्मण शिक्षण देण्याच्या कार्यात गुंतलेले होते. इंग्रजांच्या आगमनापुर्वी मुस्लीम समुदायातील उच्च वर्ग सैनिकी आणि प्रशासकिय सेवतच होता. या काळापर्यत मुसलमानांमध्ये शिक्षणाचा अभाव होता. कारण मुस्लिम ज्या उत्तर भारतात रहात होते तेथे तुलनेने ब्रिटीश राज्याची स्थापना नंतर झाली परिणामी ब्रिटीशांच्या धोरणांचा प्रभाव

हिंदूंच्या तुलनेने मुस्लिमांमध्ये नंतर पडलेला दिसून येतो. त्यामुळे मुसलमानांमध्ये सुशिक्षीत मध्यमवर्गाचा उदय होण्यास बराच अवधी जावा लागला.

**नवे सामाजिक वर्गः-**

इंग्रजांच्या भारतात सत्ता स्थापनेनंतर भारतीय समाजात नव्या वर्गाचा उ उदय झाला. शेतीच्या क्षेत्रात उदयास आलेले हे नवे वर्ग पुढीलप्रमाणे होते. प्रामुख्याने हे वर्ग भारताच्या ग्रामिण भागात इंग्रजांनी लादलेल्या नव्या प्रशासकिय आणि आर्थिक व्यवस्थेचा तो परीणाम होता. त्यात १) इंग्रज सरकारने निर्माण केलेले जमिनदार २) अनुपस्थित जमिनदार/ भूमिपती ३) जमिनदारांच्या जमिनी कसणारी कुळे ४) स्वतःची जमिन कसणारा शेतकरी ५) शेतीमध्ये काम करणारे मजुर ६) व्यापारी ७) सावकार इ.

शहरी भागात ब्रिटीशांच्या प्रशासकिय आणि अर्थिक धोरणांमुळे नवे वर्ग समोर आले. त्यात १) औद्योगिक व्यावसायीक, व्यापारी आणि भांडवलदार २) उद्योग, दळणवळण आणि खाण उद्योगात काम करणारे कामगार ३) लहान व्यापारी आणि दुकानदारांचा वर्ग जो नव्याने उदयास आलेल्या भांडलशाही अर्थव्यवस्थेशी जोडला गेला. ४) इंजिनीयर, डॉक्टर, वकिल, प्राध्यापक, पत्रकार, कारकून इतर वर्ग. हा वर्ग बुध्दीवादी मध्यमवर्गाचे प्रतिनिधीत्व करीत होता.

**जमिनदारः**- जमिनदारांचा वर्ग म्हणजे भारतात मिळालेली इंग्रज सरकारची देणगी होती. एन. एम. घोष म्हणतात की, "ज्या जमिनदारांबरोबर कायमधारा पद्धती स्विकारण्यात आली तो लार्ड कॉर्नवालिस याने निर्माण केलेला वर्ग होता. ते पूर्णपणे इंग्रज सरकारने निर्माण केलेले जमिनदार होते. त्यामुळे या जमिनदारांनी नियमित इंग्रज सरकारचे आणि सरकारी धोरणांचे समर्थन केले. फक्त जमिनदारांच्या हक्कांवर गदा आणण्याचा प्रयत्न ज्यावेळी इंग्रज शासनाने केला त्यावेळी या जमिनदारांनी सरकारचा विरोध केला. ब्रिटीश शासनालाही अशा कंपनी आणि राजपदा विषयी निष्ठा असलेला वर्ग हवा होता. त्यामुळे ब्रिटीश शानकर्त्यांनी नियमित या वर्गाचे हितसंबंध जोपासले." लार्ड लारेन्सने आपल्या सत्तेचा उपयोग बिहारमधील तालुकादारांचे हितसंबंध जोपासण्यासाठी केला. लार्ड लिटनने असे स्पष्ट मत मांडले की, "जमिनदारांनी आणि भारतातल्या रुढीवादी शक्तींनी ब्रिटीश शासनाचे समर्थन केले पाहीजे." परिणामी इंग्रज सरकारने केलेल्या कायदेविषयक सुधारणांमध्ये जमिनदरांना विशेष प्रतिनिधीत्व देण्यात आले. त्यामुळे जमिनदारांनी विधीमंडळात आणि बाहेरही राष्ट्रवाद्यांच्या विरोधी भुमिका घेवून इंग्रज सरकारची बाजू घेतली. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर मवाळवाद्यांनी, जहालवाद्यांनी आणि गांधी समर्थकांनी लोकशाही अधिकार, प्रशासकिय सुधारणा, आणि स्वराज्याची मागणी विधीमंडळात केली तेव्हा जमिनदार आणि तालुकादारांनी या राष्ट्रवादी मागण्यांना विधीमंडळात विरोध केला. किंबहुना जेव्हा स्वराज्याच्या मागणीकरीता भारतीय राष्ट्रवाद्यांनी संघर्ष केला तेव्हा हा संघर्ष दडपून टाकण्यासाठी इंग्रज सरकारचे समर्थन केले अथवा सरकारला मदत केली. कारण या नव्या व्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या जमिनदार वर्गाला अशी भिती वाटत होती की, जर प्रजासत्ताक, सामाजिक, आर्थिक आणि राजकिय परीवर्तन झाले तर जमिनदार वर्गाच्या हितसंबंधांना धोका निर्माण होईन, नव्हे तर आपल्या वांचे अस्तित्व धोक्यात येईल या करीता ब्रिटीश शासन चिरकालीन रहावे यासाठी हा वर्ग प्रयत्न करीत होता. कारण शेतसारा वसुलीतून मोठे उत्पन्न जमिनदाराला मिळत होते. नव्हे तर शेतकऱ्यांकडून जास्तीच्या प्रमाणात सारा घेवून हा जमिनदार सारा हडप करीत होता. त्यामुळे भारतातील शेतकऱ्यांच्या दैन्यवस्थेला वहुतांशी जमिनदार वर्ग कारणीभुत होता. एकुणच जमिनदार वर्ग हा परंपरावादी आणि विलासी जीवन जगणारा वर्ग होता. जमिनदारांनी इ. स. १८५१ मध्ये ब्रिटीश इंडीयन असोशिएशन ही संघटना स्थापन केली. ई. एस. मॉन्टेग्यूने १९३० मध्ये प्रकाशित केलेले पुस्तक "इंडीयन डायरीज्" मध्ये लिहले की, "ब्रिटीश इंडीयन असोशिएशन बर्दवानच्या महाराजा जे परंपरावादी भारतीयांचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या अद्यक्षेतेखाली स्थापन झालेली परंपरावादी संघटना आहे. त्यांना इंग्रजांशी संबंध स्थापन करण्याची ईच्छा

आहे." १९२५ मध्ये स्थापन झालेल्या बंगाल जमिनदारी असोशियशन ने ही घोषणा केल की, जमिनदार ब्रिटीश सरकारचे समर्थन करतील. १९३८ मध्ये पहिल्या अखिल भारतीय जमिनदार कॉन्फ्रेन्स मध्ये भाषण करतांना मैमनसिंगच्या महाराज्याने असे भाष्य केले की, "जर आम्हाला एका वर्गाच्या रुपाने जिवंत रहावयाचे असेल तर आम्ही सरकारचे हात मजबूत केले पाहीजे." इंग्रजांनी स्थापन केलेल्या नव्या प्रशासकिय व्यवस्थेमध्ये सर्वप्रथम भारतीय संस्थानांचे राजे जोडले गेले. १८६२ च्या इंडीयन कॉन्सिल ॲक्ट अन्वये पटीयाला चे महाराज आणि बनारसच्या राज्याला गर्व्हनर जनरलच्या कार्यकारणी परिषदेत मनोनित करण्यात आले. या संदर्भात के. बी. कृष्णा द, प्राब्लेम ऑफ मायनोरीटीज मध्ये लिहतात "मनोनित करण्याची प्रकिया राजांपासून सुरु झाली. त्यानंतर जमिनदार, सेवानिवृत्त अधिकारी, व्यापारी आणि व्यावसाईक वर्गाला मनोनित करण्यात आले." एकूणच भारतीय समाजाला प्रभावीत करणाऱ्या मुद्यांकडे या जमिनदारांनी सोईस्कर दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात बिपीनचंद्र पाल लिहतात. "लिटनच्या वृत्तपत्र कायद्याचा विरोध करण्यासाठी इंडीयन असोशिएशन ने कलकत्त्याच्या टाऊन हॉलमध्ये एक सभा आयोजित केली. बंगरलच्या जमिनदारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या ब्रिटीश इंडीयन असोशिएशनने या सभेला येण्यास नकार दिला. तरीही फक्त कलकत्ता आणि बंगालमधीलच नाही तर संपूर्ण भारतातील मध्यमवर्गाने इंडीयन असोशिएशनच्या या विरोधाचे अनुमोदन केले." कारण जमिनदारांना शेतीमधून मिळणाऱ्या कराच्या रुपाने भरपुर पैसा मिळत होता. त्यांनी कुळांवर जास्तीचा कर आकारल्यामुळे जमिनदारांचा तर आर्थिक फायदा होत होता मात्र त्यामुळे कुळांची स्थिती अतिशय दयनिय बनली होती. कुळांच्या परिस्थिबरोबर शेतीची स्थितीही खालावत होती. कारण शेतीमध्ये गुणवत्तापूर्ण खते आणि बियाणे उपलब्ध होत नव्हते. भारतीय राष्ट्रवाद्यांनी आणि इंग्रज अधिका-यांनी जमिनदारी पद्धती असलेल्या भागात कृषी अर्थव्यवस्थेच्या वाईट दशेवर आणि तेथील कुळांच्या भयंकर गरीबीवर मते नोंदविली. तरीही सरकारने याकडे लक्ष दिले नाही. कारण सरकाला जमिनदारांकडून राजकिय आणि आर्थिक फायदा होता. तर राष्ट्रवाद्यांमधुन अनेक जण जमिनदार आणि खोतांमधून असल्यामुळे त्यांनी जमिनदारी पद्धतीचे समंथन केले.

जमिनदार वर्गाविषयी भारतीय आणि विदेशी टिकाकारांनी असे मत व्यक्त केले की, जमिनदार भारतीय अर्थव्यवस्थेत कोणतीही उत्तम भुमिका बजावित नाहीत. या शिवाय या टिकाकारांनी जमिनदार व्यवस्था संपुष्टात आणण्यासाठी सुचना केल्या व असे मत मांडले की, भारतीय लोकसंख्येपैकी एक मोठा हीस्सा शेतीवर अवलंबून आहे. शेतीत सुधारणा करण्यासाठी आणि शेतीचा विकास करण्यासाठी जमिनदारी व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. तथापी भारतीय जमिनदारांनी सुधारणा आणि विकासाच्या मुद्यांना सातत्याने विरोध केला. भारतात जेव्हा राष्ट्रीय अंदोलनाने जोर धरला तेव्हा शेतकरी, कुळे आणि मजूर यांची अंदोलने सुरु झाली. त्यावेळी जमिनदारांनी तेव्हा जमिनदार आपल्या हक्कांच्या आणि अधिकारांच्या संरक्षणाकरीता ब्रिटीशांवर अवलंबून राहीले. आपल्या संघटनांद्वारे आणि विधानपरीषदेत त्यांनी जमिनदारांकरीता योग्य आणि परिणामकारक प्रतिनिधीत्वाची मागणी केली.

**व्यावसाईक वर्गः-**

भारतात ब्रिटीश सत्ता स्थिरस्थावर झाल्यानंतर व्यापार उदीम वाढले. परदेशी व्यापार, आधुनिक उद्योगांची स्थापना, बँकांच्या स्थापनेमुळे नव्या व्यावसाईक वर्गाचा उदय झाला. हा वर्ग अधुनिक व्यावसाईक, औद्योगिक आणि आर्थिक भांडवलदार मध्यमवर्ग होता. हा वर्ग आर्थिक आणि सामाजिक रुपाने पुढारलेला वर्ग होता. युरोपीयन लोक भारतात व्यापार, बैंका आणि उद्योगव्यवसायात गुंतलेले होते. स्वतःहाचे हितसंबंध जोपासण्यासाठी त्यांनी आपल्या स्वतःहाच्या संघटना निर्माण केल्या. आर्थिक उद्योगांच्या तत्कालिन स्थितीप्रमाणे भारतीय लोकांना बरोबर घेवून संघटना निर्माण केल्या. सुरवातीला युरोपीयन चेंबर्स ऑफ कॉमर्स ही संस्था १८३४ मध्ये स्थापन झाली. १८३६ मध्ये मुंबई आणि मद्रासमध्येही या संघटनेची

स्थापना झाली. मात्र पहिली भारतीय चेंबर्स ऑफ कॉमर्स ची स्थापना द बेंगाल नेशनल चेंबर्स ऑफ कॉमर्स च्या रुपाने १८८७ मध्ये झाली. १९०० मध्ये कलकत्त्यात मारवाडी चेंबर्स ऑफ कॉमर्स ची स्थापना झाली. १९०९ मध्ये मद्रासमध्ये साऊथ इंडीया चेंबर्स ऑफ कॉमर्स या संस्थेची स्थापना झाली. या संस्थांच्या स्थापनेनंतर १९२५ मध्ये इंडीयन चेंबर्स ऑफ कॉमर्स ही संस्था स्थापन झाली. या संस्थांच्या स्थापनेचा उद्देश भारतात व्यापार आणि उद्योगांना वाढवून भारतीय लोकांच्या हितांचे रक्षण करणे होते. नंतरच्या काळात भारतीय व्यावसाईक वर्गाच्या संघटनाही निर्माण होण्यास मदत झाली. इ. स. १९२७ मध्ये महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स ही संघटना स्थापन झाली. युरोपीय व्यवसाईक आणि भारतीय व्यावसाईक यांचे हीतसंबंध सारखे असल्यामुळे दोघांमध्ये स्पर्धा होती. भारतीय व्यापाऱ्यांची मुख्य तक्रार अशी होती की, इंग्रज सरकारने ब्रिटीश व्यापाऱ्यांना दिलेल्या संरक्षणामुळे व युरोपीय देशांशी व्यापार करण्यासाठी भारतीय व्यापाऱ्यांना व्यापार करण्यासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. या शिवाय परदेशांशी व्यापार करण्यासाठी भारतीय व्यापाऱ्यांवर अनेक निबंध लादण्यात आले होते.

भारतातील या व्यावसाईक वर्गाने इंग्रज व युरोपीयन व्यापाऱ्यांना जास्तीच्या सुविधा आणि आर्थिक लाभ देण्यासंबंधीच्या ब्रिटीशांच्या धोरणांवर कडाळून टिका केली व त्याविरोधात संघर्ष केला. उदा. जहाज उद्योगात इंग्रज व्यापा-यांना जास्तीच्या सवलती देण्यावर या भारतीय व्यावसाईक वर्गाने टिका करायला सुरुवात केली. त्यामुळे श्री हाजी यांनी लेजिसलेटीव्ह कौन्सिल मध्ये रिजर्वेशन ऑफ द कोस्टल टैफीक ऑफ इंडीया हा कायदा बनविण्याचा प्रस्ताव ठेवला. त्याकरीता त्यांनी असे सांगीतले की किनारी प्रदेशातील व्यापारावर इंग्रजांचे प्रभुत्व आहे. भारतीय नौकायन उद्योगाची स्पर्धा या परकिय भांडवलदारांशी असल्यामुळे भारतीय उद्योगांच्या विकासाला ते अडसर आहेत. मात्र व्यावसाईक आणि व्यापारी वर्गाने ब्रिटीशांना कोणताही हींसक विरोध केला नाही. भारतातील ब्रिटीश सम्राज्य म्हणजे इंग्लडमधील भांडवलदारांचे सम्म्राज्य होते. त्यामुळे विकसित भांडवलशाही व्यवस्थेच्या सरळ संपर्कामुळे भारतातही भांडवलदार वर्गाचा उदय झाला. भारतात या भांडवलदार वर्गात सावकार, व्यापारी आणि उद्योगपती या वर्गाचा भरणा होता. भारतात भांडवलशाहीचा उदय विदेशी भांडवलाच्या विरोधाच्या प्रक्रियेतून घडून आला. बाजाराच्या शाळांमधून भांडवलदार वगांने राष्ट्रीय विचारांचे धडे घेतले. भांडवली गुंतवणुकीपासूनच या वर्गाला ब्रिटीश भांडवलदारांच्या विरोधाचा समोर जावे लागले. त्यातून या भांडवलदार वर्गाने आपल्या उद्योगांच्या संरक्षणाकरीता सरकार विरोधात तिव्र अंदोलने केली.

१८८० च्या दशकात भारतात आधुनिक उद्योगांचा विकास झाला. औद्योगिक बुर्जुआ वर्गाच्या साधनसंपत्तीत वाढ झाली. याच काळात भारतीय बुद्धीवाद्यांनी राष्ट्रवादी अंदोलनाची सुरुवात केली होती. आणि १८८५ मध्ये भारताची प्रमुख राष्ट्रवादी संघटना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली होती.

१९०५ पर्यंत उदयोन्मुख भारतीय औद्योगिक भांडवलदार वर्गात जागृती आली होती. या वर्गाने बुद्धीवादी आणि व्यावसाईक वर्गाचे राष्ट्रीय अंदोलनात समर्थन केले. इंग्रजांच्या नोकऱ्या स्विकारलेल्या या व्यावसाईक वर्गाचे उद्दीष्ट दवाखाने, कायदे आणि पत्रकारीतेच्या क्षेत्रातील ब्रिटीशांचा एकाधिकार संपृष्टात आणणे हा होता. भारताचा सर्वात मोठा उद्योग, कापड उद्योगाचा विकास इंग्रज व्यापाऱ्यांच्या हितसंबंधांविरोधात होत होता. त्यामुळे भारतीय उद्योगपतींना स्वदेशीवाद आणि संरक्षणवाद या मुद्यांवर भर द्यावा लागला. ब्रिटीश सरकारच्या आर्थिक धोरणांवर टिकाकारांनी टिका केली की, ब्रिटीश उद्योगपतीच्या दबावात येवून भारतीय उद्योगांना नख लावण्याचा प्रयत्न केला. त्यांनी भारताला कृषीप्रधान देश बनविण्याचे कार्य केले. जो देश ब्रिटीश उद्योगांसाठी कच्च्या मालाचा पुरवठा करीत राहील आणि भारताचा आर्थिक विकास ब्रिटीश उद्योगांना अनुकूल असा करण्यात आला. अशा प्रकारे भारताची अर्थव्यवस्था ब्रिटनच्या सम्राज्यवादी विचारांना सहाय्यक बनली. तरीही भारतात सुती कापड उद्योगाचा विकास झालेला दिसतो.

सुती कापड उद्योगाने प्रारंभी गुजराती आणि मारवाडी उद्योगपतींचे लक्ष वेधून घेतले. मुंबईत आवश्यक कच्चा माल, दमट हवा, स्वस्त मजूर वर्ग आणि कापडासाठी तयार बाजारपेठ सर्व काही उपलब्ध होते. त्यामुळे मुंबईत १८५० नेतरच्या काळात उद्योग सुरु झाला. त्यानंतर १८५० नंतर मुंबईत कापड उद्योग सुरु झाला. १८६० नंतरच्या दशकात गृहयुद्धामुळे अमेरीकेतील कापसाची किंमत एकदम वाढली. त्यामुळे नंतर आलेल्या मंदीमुळे कापड उद्योगावर वाईट परिणाम झाला. १८७० नंतर हळूहळू परिस्थिती सुधारु लागली. १८७९ पर्यंत कापड गिरण्यांची संख्या ५६ झाली. १९०५ पर्यंत ही संख्या २५६ झाली त्यात २ लक्ष कामगार काम करु लागले. भारतातील कापड उद्योगांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले.

१) लंकेशायर आणि मैचेस्टरच्या सुती कापडाशी स्पर्धा.

२) इंग्लडच्या राणीने लावलेला पक्षपाती आणि उत्पादन कर.

३) १८८९-८० या काळात विदेशी माल मुक्तपणे भारतात आणण्याची परवानगी देण्यात आली.

४) युरोपीन मालकीच्या व युरोपीयन प्रभावाखाली असलेल्या बैंक उद्योगाकडून दिर्घकालीन कर्जाची सवलत न मिळणे.

५) परकिय सत्तेमुळे योग्य व आवश्यक संरक्षण न मिळणे.

वरील सवलती मिळाल्या नसल्या तरी भारतीय उद्योगपतीनी हिंमत सोडली नाही. २० व्या शतकाच्या प्रारंभापासून स्वदेशी चळवळीने भारतीय उद्योगांना काही प्रमाणात प्रोत्साहन मिळाले. त्यावरुन एक गोष्ट स्पष्ट झाली की, भारतीय उद्योगांचे भाग्य भारतीय स्वातंत्र्याच्या भाग्याशी जोडले गेलेले आहे. त्यामुळे त्यानंतरच्या काळात भारतीय उद्योगपतींनी काँग्रेस व कॉग्रेसी नेत्यांना आर्थिक आणि मानसिक पाठबळ दिले. भारताच्या अद्योगिकरणातील एक महत्वाचा टप्पा म्हणजे १९०७ मध्ये जमशेदजी टाटांनी 'टाटा लोखंड आणि पोलाद कंपनी सुरु केली. या कंपनीने लौकरच कच्च्या लोखंडाच्या आणि पोलादाच्या उत्पादनाला सुरुवात केली. इ. स.

१८५०- ६० या काळात भारतात मळे उद्योग ( चहा, कॉफी, रबर, निळ) ताग गिरण्या, कोळस्याच्या खाणी, यामध्ये काम सुरु झाले. १८८० च्या दरम्यानच्या काळात भारतात २० ताग गिरण्या, ५६ कोळसा खाणी कार्यरत होत्या तीच संख्या १८९५ मध्ये २९ ताग गिरण्या आणि १२३ कोळसा खाणी अशी झाली. मात्र या उद्योगांमध्ये जास्त संख्या परकिय उद्योगपतीची होती. व त्यांना सरकारचे समर्थन होते.

पहिल्या महायुद्धाचा काळ भारतीय उद्योगपतींसाठी सुवर्णयुग होता. परकिय आयात या काळात फारच थोडी राहीली आणि दुसऱ्या बाजूने सरकारला युद्धप्रयत्नांसाठी बराच माल खरेदी करावयाचा होता. कच्च्या मालाची निर्यात बंद झाली परीणामी त्याची किंमत कमी झाली व त्यामुळे उद्योगपतींना त्याचा बराच फायदा झाला. या शिवाय मजूरांच्या वेतनात फार बाढ झाली नाही. त्यामुळे या काळात भारतीय उद्योगांनी चांगली कमाई केली. या महायुद्धाचा दुसरा परिणाम असा झा की, त्यामुळे राजकिय जागृती घडून आली व भारतीय उद्योगांना संरक्षण देण्याची मागणी समोर येवू लागली. त्यावर सरकारची प्रतिक्रिया फारशी अनुकूल नव्हती. तरही सरकारने १९१६ मध्ये एक औद्योगिक आयोग स्थापन केला. व त्याकडे अशी जबाबदारी देण्यात आली की, उद्योग व व्यापार क्षेत्रात कोणती आर्थिक मदत करता येईल. लष्कराला आवश्यक असलेल्या सामुग्रीची खरेदी भारतात केली जावी. व त्या वस्तूंच्या उत्पादनाकरीता भारतात नवे कारखाने काढले जावेत. त्यामुळे भारतीय उद्योगांच्या विकासाला थोडासा हातभार लाभला. त्यामुळे भारतीय उद्योगपतीच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती चांगलीच सुधारली. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात राष्ट्रीय काँग्रेस आणि काँग्रेसी नेत्यांची लोकप्रियता वाढली होती. १९१९- २० नंतर काँग्रेसवर उद्योगपतींचा प्रभाव वाढला. या काळानंतर

काँग्रेस गांधींच्या नेतृत्वात मार्गक्रमण करीत होती. गांधींनी अधुनिक मशिनांवर तयार होणाऱ्या मालावर बहिस्कार टाकण्याचे धोरण अवलंबिले. त्यामुळे भारतीय उद्योगपतीमध्ये एक भितीचे वातावरण निर्माण झाले मात्र गांधींनी १९२० च्या कलकत्ता अधिवेशनात स्वदेशी तत्वाचा स्विकार केला. त्यामुळे उद्योगपती काँग्रेसच्या आणखी जवळ गेले. उद्योगपतींनी काँग्रेसशी सहकार्य ठेवून आपल्याला ब्रिटीश शासकांकडून आर्थिक आणि राजकीय फायदे मिळविण्यासाठी काँग्रेसच्या अंदोलनांचा वापर केला. महात्मा गांधींच्या प्रभावाखाली काँग्रेस असतांना गांधींनी वर्गसंघर्षाच्या सिद्धांताला पूर्ण विरोध केला. त्यामुळे गांधी उद्योगपतींना आपले समर्थक वाटू लागले. मात्र या उद्योगपतींचा ऑल इंडीया ट्रेड युनियन काँग्रेसला विरोध होता. कारण इंग्लडमधील संस्थेप्रमाणे ही भारतीय संस्था वर्गसंघर्षाच्या सिद्धांतवर अधारलेली होती. असे असले तरी या उद्योगपतीनी गांधीनी अहमदाबाद येथे स्थापन केलेल्या ट्रेड युनियन मजुर महाजन या संघटनेशी सलोख्याचे संबंध ठेवले कारण हि संघटना वर्ग सहकार्यच्या तत्वावर अधारीत होती.

बिडला, बजाज, अम्बालाल साराभाई, कस्तुरभाई लालभाई, आणि इतर समृद्ध उद्योगपतींनी गांधींच्या नेतृत्वात कॉंग्रेसचे समर्थन करण्याचे धोरण ठेवले आणि काँग्रेसच्या संघटनासाठी आर्थिक मदत दिली. या उद्योगपतींनी गांधीवादाच्या प्रचाराकरीताही सहकार्याचे धोरण ठेवले व आर्थिक मदत दिली. कारण गांधीवादात गरीबी आदर्श रुपात मांडण्यात आली.

शिवाय विरोधकाचे मन प्रेमाने जिकंता येते हे गांधीवादाचे सुत्र होते. व उद्योगपतींची अशी धारणा होती की, कमी पगार आणि दुर्बल आर्थिक परिस्थितीत काम करण्यासी व मजुरांना नियंत्रीत करण्यासाठी या तत्वज्ञानाचा आपणास उपयोग होईल. मात्र याच उद्योगपतीनी गांधीवादी आर्दश स्वतःच्या जीवनात पाळले नाहीत.

महात्मा गांधीनी जी अंदोलने सुरु केली त्या अंदोलनांचा सरकारवर दबाव आणण्याकरीी आणि आपले हित साधण्याकरीता उपयोग करुन घेण्यात आला. १९३७ मध्ये काँग्रेसी सरकारे सत्तारुढ झालेली होती या सरकारच्या धोरणांवर डाव्या विचारांच्या राष्ट्रवाद्यांनी टिका केली की, 'काँग्रेसची सरकारे भांडवलशाहीचे समर्थन करतात. या काळात उद्योगपतीच्या एका गटाने या करीता काँग्रेसचे सर्मथन केले कारण कॉंगेस त्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण करते.' मुंबईमध्ये कापड मिल कामगारांच्या अंदोलनात काँग्रेस सरकारने पोलिसांचा वापर करुन हे अंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. श्रम विवाद कायदा (Treade dispute Bill) लागू करणे, अहमदाबाद आणि सोलापुर मध्ये मजुरांच्या सभांवर बंदी घालणे, काही मजूर नेत्यांना पकडून दुसऱ्या ठिकाणी पाठवून देण्यात आले. या काँग्रेसी सरकारच्या धोरणांमध्ये भांडवलशाहीचे समर्थन करणारी तथ्ये अढळतात त्यामुळेच डाव्यांनी काँग्रेसबर टिका केलेली दिसते.

इतर वर्गाप्रमाणेच औद्योगिक भांडवलदार वर्गाने आपल्या मागण्यांसाठी, व आपले हितरक्षणाकरीता अनेक संघटना स्थापन केल्या. १८७५ मध्ये बॉम्बे मिल ओनर्स असोशिएशन, १८८१ इंडीयन टी असोशिएशन, १८८४ इंडीयन ज्युट मिल असोशिएशन, १८९१ अहमदाबाद मिलऔनर्सेज असोशिएशन, १९२७ फेडरेशन ऑफ इंडीयन चेंबर्स ऑफ कॉमर्स अन्ड इंडस्ट्रीज, १९२०, एम्पलायर्स असोशिएशन ऑफ सदर्न इंडीया, १९३३ ऑल इंडीया ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रीयल एम्पलायर्स, आणि १९३३ मध्येच एम्पलायर्स फेडरेशन ऑफ इंडीया या संस्था स्थापन करण्यात आल्या. या सर्व संघटनांचा उद्देश औद्योगिक भांडवलदारांचे हितसंबंध जोपासणे हाच होता.

या काळात भारतीय अर्थव्यवस्था एकाधिकारशाहीकडे जात होती. भांडवलदारांची संख्या दिवसेंदीवस कमी होत होती भांडवलदारांना एक उद्योग, किंवा उद्योग समुहावर एकाधिकार मिळवयाचा होता. त्यामुळे भारतीयांच्या आर्थिक जीवनावर उद्योग त्याचा घातक प्रभाव पडला. आणि भारतीयांच्या सामाजिक, रार्जाकय आणि बौद्धीक जीवनावर उद्योगपतींचे नियंत्रण निर्माण झाले. बिडला यांनी वृत्तपत्र व्यवसायावर

आपली पकड निर्माण केली. आपल्याला अनुरुप असे लिखाण या वृत्तपत्रांमधून त्यांनी करुन घेतले. त्यामुळे वैचारीक गुलामगीरी निर्माण होण्यास मदत झाली.

**मध्यमवर्ग:-**

कोणत्याही सामाजिक व्यवस्थेत मध्यमवर्ग कोणाला म्हणावे हा एक यक्षप्रश्न आहे. ब्रिटीश सरकारच्या काळात या मध्यमवर्गात तिन समुहांचे लोक येतात. १) सरकारी कर्मचारी २) व्यावसाईक वर्ग उदा. वकील, डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, पत्रकार इ. ३) छोटे व्यापारी, कारागिर इ.

ब्रिटीश शासनकाळात नव्या प्रशासकिय व्यवस्थेची सुरवात झाली. त्यामुळे सरकारी कर्मचारी वर्गाचा उदय झाली. व्यापार, उद्योग, विमा, डाक, रेल्वे, इ. उद्योगांमध्ये अनेक कर्मचारी नियुक्त करण्यात आले. इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून ब्रिटीश सरकारने भारतात एका अशा वर्गाचा उदय झाला जो रंग आणि रक्ताने भारतीय पण बुद्धी आणि विचारांनी इंग्रज होता. या वर्गाचा परकिय संस्कृती आणि त्या संस्कृतीच्या नैतीक मुल्यांमध्ये विश्वास होता. दुसरीकडे डॉक्टर, वकील, लेखक, पत्रकार, प्राध्यापक विद्वान आणि समाज सुधारकांचा जन्म झाला. याच वर्गातून बुद्धीवादी वर्गाचा जन्म झाला. या सर्वच लोकांची उदारमतवादी विचारांमध्ये विश्वास होता. राजा राममोहन रॉय आणि त्यांचा गट असा गट होता ज्या गटाने सर्वप्रथम पाश्चिमात्य संस्कृतीचे अध्ययन केले. या संस्कृतीला तर्क आणि लोकशाही सिद्धांतावर परखुन घेतले. १९ व्या शतकाच्या पहिल्या दशकात शिक्षण घेतलेल्या भारतीयांची संख्या कमी होती. इंग्रज सरकाराने अनेक शाळा आणि महाविद्यालय स्थापन केल्यानंतर, व ख्रिस्ती मिशनरी आणि भारतीय बुद्धीवाद्यांच्या प्रयत्नाने भारतात शिक्षणाचा प्रसार झाला. या सर्व प्रयत्नांमुळे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात एक मोठा वर्ग उदयास आला.

आधुनिक भारताच्या राष्ट्रीय इतिहासात निर्णायक आणि महत्वपुर्ण भुमिका बजावली. त्यांनीच भारतात राष्ट्र या संकल्पनेचा प्रसार केला. त्यांनी भारतात सुधारणा चळवळींना संघटीत करण्याचे पयत्न केले. त्यांनी नंतरच्या काळात राष्ट्रीय अंदोलनांना संघटीत केले. या वर्गाने शेक्षणिक आणि प्रचारकार्याद्वारे राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्याचे विचार केले. या वर्गाने साहित्याच्या माध्यमातून आणि संस्कृती आणि राष्ट्रवादाचा प्रसार केला. त्यांनी वैज्ञानिक, कवी, इतिहासकार, सामाजशास्त्री, साहित्यकार, तत्वज्ञानी, अर्थशास्त्रज्ञ इ. लोक याच वर्गाने दिले. आधुनिक पाश्चिमात्य लोकशाही मुल्यांचा प्रसार करणाऱ्या या बुद्धीवादी वर्गाने भारताच्या कठीण प्रश्नांचा अभ्यास केला. आणि भारतीयांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य केले.

१८५१ ते १८८४ या काळात या बुद्धीवादी वर्गाने तीन संघटना सुरु केल्या. मद्रास नेटिव्ह असोशिएशन, बॉम्बे असोशिएशन, आणि इंडीयन असोशिएशन या संघटना सुरु झाल्यानंतर त्यांनी आपल्या मागण्या सरकारकडे मांडण्यास सुरुवात केली. सरकारी सेवाचे भारतीयीकरण करण्याची मागणी केली. ही मागणी या बुद्धीवादी वर्गाच्या हितसंबंधाशी जोडली असली तरी भारतीय राष्ट्रवाच्या विचारांना हि मागणी पोषक ठरली. १८५७ मध्ये भारतात तिन विद्यापीठे स्थापन करण्यात आली. या विद्यापीठांच्या स्थापनेमुळे सुशिक्षीत भारतीयांच्या संख्येत वाढ झाली. आणि याच वर्गात भारतात प्रथम राष्ट्रवादाचा उदय झाला याच वर्गाने भारतात १८८५ मध्ये भारताची राष्ट्रीय संघटना राष्ट्रसभा स्थापन केली. कॉँग्रेसने इंग्रजी भाषेचा स्विकार करुन बुद्धीवाद्यांना आपल्याकडे आर्कर्षीत केले. अशा प्रकारे बुद्धीवादी हे कॉँग्रेसचे नेता बनले.

कॉँग्रेसच्या स्थापनेनंतर राष्ट्रीय कॉँग्रेसच्या नेतृत्वात अनेक अंदोलने झाली. २० व्या शतकाच्या पुर्वाधापर्यंत कॉँग्रेस बुद्धीवाद्यांच्या ताब्यात होती. नंतरच्या काळात कॉँग्रेसच्या सभासदांची संख्या वाढली त्यामुळे सामान्य लोकही कॉँग्रेसमध्ये सहभागी होवून राष्ट्रीय चळवळीला हातभार लावू लागले.

**कुळे आणि त्यांच्या संघटना:-**

जमिनदारीच्या उदयाबरोबर भारतात कुळांचा उदय झाला. जमिनदारीच्या शोषणामुळे या कुळांची स्थिती अतिशय दयनिय बनली होती. बराच काळ लोटल्यानंतर जमिनदार आणि शेती कसणारी कुळे यांच्यामध्ये दलालांची साखळी निर्माण झाली. त्यामुळे शेती कसणाऱ्या कुळांची स्थिती शोषनिय बनली. १८५९ आणि १८८५ मध्ये लागू करण्यात आलेल्या बंगाल टेनेशी ॲक्ट चा उद्देश कसणाऱ्या कुळांना संरक्षण देणे आणि त्याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे हा होता. तरीही या कायद्यांचा फारसा प्रभाव पडला नाही, दिवसेंदीवस कुळांची परिस्थिती हालाखीची बनत गेली. जमिनदारी भागातील कुळांव्यतीरीक्त रैयतवारी भागातही अशा प्रकारच्या कुळांचा वर्ग उदयास आला होता. शेतकऱ्यांच्या शोषणामुळे शेतकरी गरीब बनले त्यामुळे शेतीवरील हक्क या शेतकऱ्यांना सोडून दयावे लागले व ही शेती कर्जाच्या ओझ्यात अडकल्यामुळे सावकारांच्या घस्यात गेली. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे साधन जावून शेतकरी हवालदिल झाला. या शेतकऱ्यांनी या सावकारांची जमिन खंडाने कसण्यास घेतली. मात्र खंड आणि उत्पन्न यांचा ताळमेळ न बसल्याने हे शेतकरी अधिकच गरीब बनत गेले. हळूहळू या शेतकऱ्यांमध्ये या विषयी जागृती निर्माण होण्यास सुरुवात झाली. उत्तर प्रदेश, बंगाल, बिहार, आणि इतर भागातही शेतकरी आणि कुळांच्या संघटना निर्माण होण्यास सुरुवात झाली. या शेतकरी संघटनांनी कुळांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांच्या मागण्यांचे एक पत्र तयार केले आणि या मागण्यांसाठी अंदोलने केली. या संघटनांनी जी अंदोलने केली त्यात जवाहरलाल नेहरु, एन. जी. रंगा, स्वामी सहजानंद या सारखे राष्ट्रवादी नेतेही शामील होते. त्यामुळे कुळे, शेतकरी आणि शेतमजुर राष्ट्रवादाच्या प्रभावाखाली आले. या समुहांनी आपल्या वर्गाच्या मागण्यांबरोबर राष्ट्रीय चळवळीशी सहकार्याचे धोरण ठेवले. हळूहळू आर्थिक आणि सांकृतीक रुपाने मागासलेल्या कुळांमध्ये राष्ट्रीय भावना घर करीत होती. मात्र या किसान सभांनी आणि कुळांच्या संघटनांनी इंग्रज सरकार बरोबर भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसवरही टिका करण्यास सुरुवात केली. त्यांचे म्हणणे असे होते की, कॉंग्रेस जमिनदारांचे हित जोपासण्याचा प्रयत्न करते. या शेतकरी संघटनांनी शेतसारा कमी करावा, जमिनदारांकडून होत असलेले शोषण थांबवावे अशा प्रकारच्या मागण्या केल्या. तर शेतकरी संघटनानी जमिनदारी पद्धती नष्ट करण्याचीही मागणी केली.

**शेतकरी समाज आणि शेतकरी असंतोष:-**

इ. स. १८५७ नंतर भारतात वसाहतीक शासनाच्या पिडवणूकीच्या धोरणाविरुद्ध निर्माण झालेली प्रतिक्रीया म्हणून शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या असंतोष व या पूर्वी घडून आलेल्या उठावाच्या स्वरुपात सातत्य दिसते. १८५७ नंतर आदिवासी असलेल्या आणि आदिवासी नसलेल्या शेतकऱ्यांमध्ये वसाहतीक संस्था, वसाहतीक धोरणे आणि वसाहतीक कायदे या विषयी जागृकता निर्माण झालेली दिसते. या शेतकरी अंदोलनांचे दोन वैशिष्ट दिसतात. एक या शिवाय यापैकी काही शेतकरी अंदोलनांनी वसाहतीक शासनाच्या विरुद्ध असलेला आपला राग व्यक्त करण्यासाठी व अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी कायदेशीर क्षेत्र म्हणून वसाहतीक न्यायसंस्थेचा वापर केला. आणि दुसरे म्हणजे वैशिष्ट्य म्हणजे दु:खी शेतकरी वर्गचे प्रवक्ता म्हणून शिक्षित मध्यमवर्गीयांची भूमिकाही वाढलेली होती. यामुळे हा बाहेरील बुद्धीवादी वर्गाचा वाढलेला हस्तक्षेप शेतकऱ्यांच्या हितसंबंध जोपासण्यासाठी होता की आपल्या स्वताहाच्या चळवळीला गती देण्यासाठी होता. हा एक चर्चचा विषय बनला. प्रो. रविंदर कुमार म्हणतात "ज्या वेळी परंपरागत माध्यम आणि पद्धती अप्रभावी ठरलेले होते त्या काळात ग्रामिण समाज आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद साधण्याचे एक माध्यम म्हणून मध्यमवर्गीय नेत्यांनी प्रमुख भूमिका

बजावली." दुसरीकडे १९ व्या शतकात शेतकऱ्यांविषयी मध्यमवर्गाच्या वर्तनुकीबद्दल प्रो. रणजित गुहांनी "वारसाहक्कने मिळालेली संरक्षक वृत्ती आणि पश्चिमेकडील मानवतावादी वृत्ती यांचा मिलाप म्हटले आहे.

मात्र या मध्यमवर्गाच्या मध्यस्ताची भुमिकेचा प्रभाव काहीही असो तरीही १९ व्या शतकातील शेतकरी चळवळीची एक नवे वैशिष्ट्य दिसून आले. ते म्हणजे न्यायप्रक्रीयेचा आधार घेणे होय.

बंगालमधील १८५९- ६० मधील निळीचा उठाव हा या काळातील प्रमुख घटनांपैकी एक होता. ज्यात शेतकरी चळवळींचे जुने आणि नवे वैशिष्ट्य समोर येतात. मध्य आणि पूर्व बंगालमध्ये निळीची शेती करणा-यांमध्ये पिळवणूक इ ालेले शेतकरी मळेमालकांचे विरोधक बनले. १८३२ मध्ये बडासात जिल्ह्यातील तीतू मिर च्या अनुयांयांनी स्थानिक निळीच्या मळेमालकांना हादरवून सोडले. याच काळात पूर्व बंगालमध्ये दादूमियाँच्या नेतृत्वात झालेल्या फराईजी अंदोलकांचे लक्ष काही निळीचे मळेमालक होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात या मळेमालकांनी जास्त प्रमाणात शेतकऱ्यांची पिळवणूक करयला सुरुवात केली. कारण निर्यात वस्तू म्हणून निळीचे आर्थिक महत्व कमी झाले व निळीच्या मळेमालकांना भांडवल पुरवठा करणारी युनियन बँक १८४७ डबघाईला आली. काही काळ ही पिळवणूक सहन केल्यानंतर शेतकऱ्यांविषयी सहानुभुती असलेला जॉन पिटर ग्रँट १८५९ मध्ये बंगालचा लेप्टनंट गर्व्हनर बनला. त्याच्या प्रोत्साहनामुळे सर्वच अधिका-यांनी शेतक-यांची बाजू घेतली. कारण त्यांचा बळाचा वापर करुन शेतकयांचे शोषण करण्याचे मळेमालकांचे धोरण हे मुक्त व्यापाराच्या धोरणांच्या विरोधात होते. आणि मुक्त व्यापाराला जर वाव मिळाला नाही तर कंपनीच्या कर्मचाऱ्यांना मिळणारा आर्थिक लाभ मिळणार नाही. म्हणूनच या वसाहतवादाच्या हितचिंतकांनी शेतकऱ्यांची बाजू घेतलेली दिसते.

इ. स. १८५९ मध्ये नाडीया, मुर्शिदाबाद आणि पाबना या विस्तृत भागातील शेतकऱ्यांनी मळेमालकांकडून आगाऊ रक्कम घेण्यास नकार दिला. जैसोरचे शेतकरीही पेरणीच्या हंगामात या अंदोलनात शामिल झाले. त्यामुळे या अंदोलनाचे लोण संपूर्ण बंगालमध्ये पसरले. मळेमालक आणि त्यांच्या गुमास्त्यांनी निळ पिकवण्याची या शेतक-यांना सक्ती केल्याने त्यांचा कडाडून विरोध करण्यात आला. स्थानिक जमिनदारही या मळेमालकांविरुद्ध चिडलेले होते. कारण जमिनदारांच्या पुर्वाश्रमीच्या गावचा प्रमुख या स्थानाला धक्का लागलेला होता. कलकत्त्यामध्ये या परकिय असलेल्या निळीच्या मळेमालकांच्या सर्मथकांनी एक अस्थाई कायदा १८६० मध्ये पारीत केला. आणि शेतकऱ्यांना व कुळांना निळ पिकवण्याची सक्ती करण्यात आली. न्यायालयात शेतकऱ्यांनी आणि कुळांनी दाद मागीतली. अशा प्रकारचे खटले मोठ्या प्रमाणात या काळात दाखल करण्यात आले. या काळातील उत्साही न्यायाधिशांनी शेतकऱ्यांना १८६० च्या कायद्यान्वये निळ पिकवण्याची सक्ती केली. मात्र लेप्टनंट गर्व्हनर असलेल्या गॅटने या कायद्याची सिमा ६ महिन्यांपेक्षा जास्त वाढवण्यास नकार दिला. तेव्हा मळेमालकांची आदेश न मानणाऱ्या कुळांना आपल्या जमिनीवरुन काढून टाकण्याचे प्रयत्न करण्यात आले. यावेळीही या कुळांनी न्यायालयात धाव घेतली. कारण १८५९ च्या सारा कायदा १० प्रमाणे १० वर्षापर्यंत जमिन कसणाऱ्या शेतकरी कुळांना काढून टाकण्याचा अधिकार मळेमालकांना नव्हता.

शिक्षीत मध्यमवर्ग आणि काही युरोपीय मिशनरींचा हस्तक्षेप या पूर्ण प्रसंगाचा एक महत्वाचा पैलु होता. दिनबंधू मित्र यांनी सप्टेंबर १८६० मध्ये बांगला भाषेतील नाटक निलदर्पण प्रकाशित केले. हे या काळातील एक साहसी कृत्य होते कारण निळीच्या मळेमालकांचे अत्याचार यात दाखविण्यात आले होते. सुप्रसिद्ध बंगाली कवी मायकेल मधुसुदन दत्त यांनी या नाटकाचे इंग्रजी भाषांतर केले. या नाटकाला भारत आणि इंग्लडमधील उदारमतवाद्यांच्या निर्दशनास आणून देण्यासाठी चर्च मिशनरी सोसायटीच्या रेव्ह. जेम्स लॉग यांनी प्रकाशित केले. यामुळे कलकत्ता सुप्रिम कोर्टात जेम्स लॉग यांच्यावर मानहानीचा खटला दाखल करण्यात आला. यात लांगला १ महिने कारावास आणि १००० रु. दंड ठोठावण्यात आला. या खटल्याच्या निकालाने कलकत्त्यातील शिक्षीत मध्यमवर्गाला धसकाच बसला. मात्र तरीही भारतीय वृत्तपत्र हिंदू पेट्रीयट आणि सोमप्रकाश या वृत्तपत्रांनी शेतकऱ्यांच्या व कुळांच्या मागण्या लावून धरल्या. इ. स. १९६३ पर्यंत हे अंदोलन संपृष्ठात आले कारण निळीला मागणीच राहीली नाही. बंगालमधील निळीची शेती बंद झाली असली

तरी दुरवरच्या बिहारमधील भागात निळीचे सरकारी हस्तक्षेपाशिवाय निळीचे उत्पादन सुरु राहीले. निळीच्या या उत्पादनासाठी बंगालमध्ये लागलेले भांडवल आता बिहारमध्ये वापरण्यात आले.

भारताच्या राष्ट्रीय अंदोनात शेतक-यांची भुमिका काय होती याकडे सर्वप्रथम कॅथलिन गफ यांनी लक्ष वेधले. १९७४ मध्ये इकॉनॉमिक अँन्ड पालिटीकल विकली मध्ये प्रकाशित झालेल्या लेखात कॅथलिन गफ यांनी "भारतातील वसाहतवादी सत्ता आणि या वसाहतवादी राज्याचे फायदे ज्यांना मिळाले त्यांच्या विरुद्ध शेतकरी संघर्षाचा मोठा इतिहास आहे." अशा प्रकारचे ७७ शेतकरी विद्रोह आपणास या काळात झालेले दिसून येतात. या शेतकरी विद्रोह्यांनी केलेल्या मुख्य kap College A

मागण्या पुढीलप्रमाणे

१) जमिनदारी पद्धतीचा शेवट

२) बेगारीची पद्धती बंद करण्यात यावी.

३) शेतसान्याचे दर कमी करावेत

४) शेतक-यांची हडप केलेली जमिन शासनाने परत करावी. या शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या होत्या.

पूर्व आणि मध्य बंगालमध्ये फराईजी अंदोलनाच्या रुपाने शेतकऱ्यांमध्ये असंतोष दिसून आला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात या अंदोलनाचे लोण संपुर्ण बंगालभर पसरले. या अंदोलनामुळे १८७३ मध्ये पाबना जिल्ह्यातील इसुफशाही तालुक्यात पहिली अॅग्ररीयन लिग स्थापन करण्यात आली. या भागात जमिनदारांचे शेतकऱ्यांवर अत्याचार वाढले होते. या भागत कायदेशिर शेतसारा वसुलीबरोबर इतरही कर आकारण्यात आले होते. या शिवाय शेतसारा दिवसेंदीवस वाढत होता. तरीही शेतकऱ्यांनी या जमिनदारांना विरोध केला नाही. मात्र शेतकऱ्यांना जो पट्टा, (भुखंड) दिला जात होता. तो फक्त मर्यादीत कालावधीकरीता दिला जात होता. कारण जर १२ वर्षाकरीता हा भुखंड शेतकऱ्यांना कसण्याकरीता दिला तर हे शेतकरी १८५९ चा कायदा नियम १० अंतंगत येतील त्यातून त्यांना संरक्षण मिळेल अशी या भागातील जमिदारांची धारणा होती. म्हणून त्यांनी शेतक-यांना पट्टे देतांना मर्यादित कालावधीकरीता दिले. मात्र यातून शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. मात्र हे अंदोलन शांततापूर्ण आणि आहिंसक मार्गाने चालविण्यात येणारे अंदोलन होते. कारण ब्रिटीशांच्या न्यायप्रियतेवर या अंदोलनकत्यांचा विश्वास होता. शिवाय या अंदोलनकर्त्यांनी अॅग्रेरियन लिग जमिनदारांना न्यायालयात ओढण्यासाठी व जमिनदारांविरुद्ध पैसा जमा करण्यासाठी उभी केली होती. या काळात शेतसाऱ्याचे अनेक खटले न्यायालयात प्रलंबित होते. पाबना जिल्हयातील या जमिनदारी मोडून काढण्यासाठी काढलेल्या अॅग्रेरीयन लिग पासून प्रेरणा घेवून ढाक्का, मैमनसिंग, त्रिपूरा, बाकरगंज, फरीदपूर, बोगरा आणि राजशाही भागातही अशा अॅग्रेरीयन लिग स्थापन करण्यात आल्या. येथेही जमिनदारांच्या विरोधात दिवाणी न्यायालयात अतिरीक्त शेतसारा वसुल करण्याचे खटले दाखल करण्यात आले. या अंदोलनाचे काही नेते हींदू होते आणि काही मुसलमान होते. मात्र संप्रदायवाद या अंदोलनात नव्हता. या अंदोलनाचे नेतृत्व दादू मियाँ आणि त्यांचा मुलगा नया मियाँ यांनी केले. नया मियाँ यांनी १८८० च्या काळत मेहंदीजंग या भागातील शेतक-यांचे संघटन केले. या अदोलनाने संपूर्ण बंगालमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिणामी सरकारने १८८५ मध्ये बंगाल टेनेशी अॅक्ट हा कायदा पारीत केला. या कायद्याने शेतीवरुन शेतकऱ्यांना काढून टाकण्याच्या जमिनदारांच्या हक्कांवर लगाम लावली. या कायद्यान्वये एकाच गावात १२ वर्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या शेतीवरुन काढून टाकता येणार नाही असा कायदा केला. मात्र या अंदोलनाच्या काळात शिक्षीत मध्यम वर्गाने दुटप्पी धोरण ठेवले.

जमिनदारांच्या अत्याचाराविरोधात शेतकऱ्यांचा संघर्ष फक्त बंगालपुरताच मर्यादीत नव्हता तर मलबार भागातील मोपला कुळांनी जेनमी जमिनदारांच्या विरोधात उठाव केला. मलबारमधील मोपला ही कुळे अरब व्यापाऱ्यांचे वंशज होते. जे या भागात वसाहत करुन राहू लागले. ब्रिटीशांनी मलबार ताब्यात घेतल्यानंतर मोपल्यांच्या हक्कांवर गदा आणण्याचे कार्य ब्रिटीशांनी केले. या ठिकाणी असलेले जनमी जमिनदार हिंदू होते तर मोपले हे मुस्लिम कुळे होती. के. एम. पन्नीकर म्हणतात "राज्य आणि जमिनदारांनी दुहेरी करपद्धती लादून या मोपल्यांचे शोषण केले." हिंदू आणि मुसलमानांच्या या सामाजिक चौकटीत बेलयमकोड चे उमर काझी, मम्पुरमचे सैयद अलवी तंगल, आणि त्यांचा मुलगा सैयद फजल पुक्कोया तंगल, सैयद सनाउल्लाह मकटी तंगल, यांनी एक अशी विचारप्रणाली मांडली की, ज्या विचरांमुळे खुल्या व्यापक विद्रोहाला चालना दिली. मात्र सशस्त्र बळाचा वापर करुन मोपल्यांचे हे बंड मोडून काढण्यात आले.

इ. स. १९१८ नंतर शेतकऱ्यांमध्ये राष्ट्रभावनेचा उदय होण्यास सुरुवात झाली. ते संघटीत राष्ट्रीय चळवळीमध्ये भाग घेवू लागले. व त्यांच्या संघटना निर्माण होण्यास सुरुवात झाली. इ. स. १९१८ मध्ये उत्स्फुर्तपणे अनेक शेतकरी अदालने झाली. मात्र एकजुटीने ही अंदोलने झाली नाहीत, हि विखुरलेली अंदोलने होती. आणि या अंदोलनांचा मुख्य उद्देश स्थानिक शेतक-यांच्या निर्माण झालेल्या आर्थिक समस्या सोडवणे हा होता. १८७० ते १८९७ या काळात भारतात अनेकवेळा भयंकर दुष्काळ पडले. त्यात १८७०, १८९६ आणि १९९७ चे दुष्काळ जास्तच भिषण होते. दुष्काळ प्रभावीत भागातील शेतकऱ्यांना अने क संकटांना तोंड द्यावे लागले. त्यातच निर्माण झालेल्या आर्थिक मंदीने या शेतकऱ्यांच्या दुखःत भर टाकली. त्यामुळे या काळात स्थानिक जमिनदार, सावकार, आणि सरकार यांच्या विरोधात शेतकरी उठाव घडून आले.

१८७० च्या बंगालमधील दुष्काळाने तेथील कुळांवर उपासमारीची वेळ आली. त्यामुळे या कुळांनी शेतसारा देण्यास नकार दिला. त्यांनी न्यायालयाचे आदेश मानले नाहीत. त्यामुळे या कुळांना त्यांच्या जमिनीवरुन काढून टाकण्याचे प्रयत्न केले. यावेळी मात्र या कुळांनी मिळेल त्या हत्याराने सरकार आणि जमिनदार यांच्याविरोधात संघर्ष केला. यामुळे संपूर्ण बंगाल आणि

संथाळ परगण्यातील ग्रामिण भागात अराजकता निर्माण झाली. मात्र सरकारने हा विरोध मोडून काढला मात्र तरीही एक समिती नियुक्त केली. या समितीच्या शिफारशीनंतर १८८५ मध्ये बंगाल टेनेसी ॲक्ट हा कायदा लागू करण्यात आला.

१८६४ नंतर अमेरीकन यादवी युद्ध समाप्त झाले आणि त्यामुळे कापसाची कीमत कमी झाली. याचा भारतीय शेतक-यांवर खोलवर आणि दुरगामी प्रभाव पडला. या पिकाच्या उत्पदन वाढीकरीता आणि शेतजमीनीच्या मशागतीसाठी शेतक-यांनी जी कर्ज घेतली होती. त्या कर्जाचा बोझा या शेतकऱ्यांवर सतत पडला. त्यामुळे १८७५ मध्ये मराठा शेतकऱ्यांनी उठाव केला. मात्र सरकारने दमन मार्गाचा वापर करुन हा विद्रोह दडपून टाकला. मात्र तरीही हा विद्रोह दडपून टाकण्यासाठी सरकारला प्रयत्न करावे लागले. मात्र शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने डेक्कन ॲग्रीकल्चर रिलीफ ॲक्ट १८७९ मध्ये पास केला. त्यामुळे सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावण्याच्या धोरणाला आळा बसला.

१९ व्या शतकाच्या अखेरीस पंजाबमध्ये सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावण्यास सुरुवात केली. त्यामुळे याठिकाणच्या शेतकऱ्यांनी या सावकारांविरोधात बंडाचा झेंडा उभारला. सरकारने पंजाबमधील परिस्थिती निवारण्यासाठी पंजाब लँड ॲलिएनेशन ॲक्ट १९०२-०३ मध्ये पारीत केला.

लार्ड कर्झनच्या काळात शेतसारा विषयक धोरणावर सरकारचा एक प्रस्ताव अ रिजोल्युशन ऑफ गव्हर्नमेंट ऑफ इंडीया ऑन लैन्ड रेव्हेन्यु पॉलीसी हा प्रस्ताव स्विकारण्यात आला. या कायद्याचे प्रमुख उद्दीष्ट कुळांना जमिनदारांच्या जास्तीच्या मागण्यापासून संरक्षण देणे होता. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने १९०५ ते १९१९

या काळात उद्योगपतीना संरक्षण देण्याचे धोरण स्विकारले. मात्र शेतक-यांच्या मागण्यांकडे काँग्रेसने दुर्लक्ष केले. विशेषता या काळात काँग्रेसने जमिनदारी पद्धतीत शेती कसणाऱ्या कुळांच्या मागण्यांकडे काँग्रेसने लक्ष दिले नाही. किंबहूना काँग्रेसचे माजी अध्यक्ष रमेशचंद्र दत्त लार्ड कर्झनच्या या आव्हानाचे उत्तरही देवू शकले नाहीत की, जमिनदारांची लालसेपासून कुळांची मुक्तता करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले आहेत.

असहकार अंदोलनाच्या काळात शेतक-यांच्या एका गटामध्ये मोठ्या प्रमाणात राजकिय जागृती झाली होती. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सरकारच्या विरोधासाठी साराबंदी मोहीम हाती घेतली., या माहिमेचा शेतक-यांवर मोठा व्यापक प्रभाव पडला. शेतकऱ्यांनी या राजकिय संघांची व्याख्या साराबंदी अंदोलच्या रुपात करण्यास सुरुवात केली. अनेक शेतकऱ्यांचे प्रश्न अतिरीक्त शेतसाऱ्याशी जोडले असल्याने शेतकऱ्यांना हे अंदोलन आपलेसे वाटू लागले त्यामुळे शेतकरी काँग्रेसच्या या अंदोलनात शामिल झाले. असहकार चळवळीच्या काळात अश्या अनेक शेतकरी चळवळी उभ्या राहील्या ज्यांचे नेतृत्व कॉग्रेसकडे कींवा कॉग्रेसच्या पुढाऱ्यांकडे नव्हते. कर्नाटकच्या गुंटूर जिल्ह्यात अशा स्थानिक नेत्यांनी अंदोलन केले. राजस्थानातील मेवाड भागात विजयसिंग पथिक, माणिकलाल वर्मा, रामनारायण, बाबा सिताराम दास, यांनी तर जोधपुर मध्ये जयनारायण व्यास यांनी शेतकरी अंदोला संघटीत केले. राजस्थानात या अंदोलनात भिल्लांना सहभागी करुन घेण्यासाठी मोतीलाल तेजावत यांनी खुप मोठी आणि मोलाची भुमिका बजावली. या अंदोलनाच्या नेत्यांनी महात्मा गांधी आणि काँग्रेसशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. या अंदोलनाची तिव्रता इतकी होती की, सरकारला या अंदोलनाची भिती वाटू लागली. म्हणून सरकारने रानटीपणाने हे अंदोलन चिरडून काढले.

१९२१-२२ च्या काळात काँग्रेसी नेत्यांनी शेतकरी अंदोलनांना दिशा देण्याचा प्रयत्न केला. पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी प्रतापगढ मध्ये अवध टेनेशी ॲक्टला विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांना संघटीत केले. मात्र हे अंदोलन जमिनदारांच्या विरोधात असल्याने गांधीनी जमिनदारांविरोधात शेतकऱ्यांनी संघर्ष करु नये अशी भूमिका घेतली. मात्र ह्या अंदोलनाची वाढती लोकप्रियता पाहून सरकारने १९२१ मध्ये अवध रेंट अक्ट हा कायदा पारीत केला. त्यामुळे शेतकयांना जास्तीच्या भुमिकर वसुलीपासून थोडासा दिलासा मिळाला.

असहकार अंदोलनाच्या काळातच गांधीच्या अहिंसेच्या धोरणांना बाजूला सारुन बाबा रामचंद्र यांनी शेतकऱ्यांना संघटीत करुन जमिनदार आणि शेतकऱ्यांविरुद्ध केबर कसली. या अंदोलनाने १९२२ मध्ये संयुक्त प्रांतात व्यापक दंगे घडून आले. मात्र लवकरच हे अंदोलन दडपून टाकण्यात आले. १९२१-२२ मध्ये हरदेही, बाराबंकी, बहराईच आणि सुल्तानपुर भागात एका अंदोलनाने जोर धरला. या अंदोलनाचे नेते मदारी पासी होते. १९२२ मध्ये सरकारने हे अंदोलन दडपून टाकले. १९२२ ते २४ या काळात रंम्पा अदिवासी शेतकऱ्यांनी अल्लुरी सिताराम राजू याच्या नेतृत्वात बंड केले. राजूने गनिमी कावा या युद्धपद्धतीचा वापर करुन ब्रिटीशांना जेरीस आणले मात्र शेवटी हे अंदोलन दडपून टाकण्यात ब्रिटीशांना यश आले.

गांधीवादी मार्गाचा अवलंब करुन, यशस्वी होणारे पहिले अंदोलन १९२७-२८ बाडोली शेतकरी अंदोलन होते. शेतसान्यात २२% केलेल्या वाढीच्या विरोधात या ठिकाणी शेतकऱ्यांनी संघटीत होवून लढा दिला. या अंदोलनाचे स्थानिक नेते कुवरजी आणि कल्याणजी मेहता हे होते. मात्र त्यांच्या प्रयत्नाने सरदार वल्लभभाई पटेल यांनी अंदोलनाची सुत्रे आपल्या हातात घेतली. सरकारने दडपशाही धोरणांचा अवलंब करुनही साराबंदी सुरुच राहीली. मात्र जप्त केलेली जमिन परत देण्याच्या व न्यायलयीन चौकशी करण्याच्या अटीवर हे अंदोलन परत घेण्यात आले.

इ. स. १९३० मध्ये काँग्रेसचे नेते महात्मा गांधी यांनी आपल्या ११ मागण्यांचे निवेदन सरकारला सादर केले. मात्र यावेळी साम्यवादी आणि समाजवादी विचारांच्या लोकांनी गांधीवर या ११ मागण्यांना घरुन टिका केली. त्यांचे म्हणणे होते की, 'गांधींनी या मागण्यांमध्ये भांडवलदारांच्या हितांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला

मात्र कामगार आणि शेतकरी यांच्या कोणत्याही मागण्यांकडे गांधींनी लक्ष दिले नाही.' या बाबतीत एन. जी रंगा म्हणतात की, गांधींनी जमिनदारांकडून बसूल होणारा शेतसारा कमी करण्याची मागणी करावयास पाहीजे होती. त्यामुळे शेतक-यांच्या कर्जबाजारीपणाला आळा बसला असता. शिवाय मजूरांकडून कमी वेतनावर काम करवून घेणाऱ्या उद्योगांचे राष्ट्रीयकरण करण्याची मागणी केली पाहीजे होती.

१९२९ मध्ये शेतीवर संकट निर्माण झाले. जागतिक अर्थव्यवस्थेत या काळात मंदीची लाट होती. या वैश्विक मंदीचा शेतकऱ्यांवर प्रभाव पडला. त्यामुळे या काळात अनेक शेतकरी संघटना निर्माण झाल्या, या शिवाय या काळादरम्यान काही शेतकरी संघटना निर्माण झालेल्या आपणास दिसतात. इ. स. १९१८ मध्ये इंद्रनारायण द्विवेदी यांनी संयुक्त प्रांतकिसान सभा स्थापन केली. १९२० मध्ये बाबा रामचंद्र यांनी अवध किसान सभा, तर १९२३ मध्ये एन. जी. रंगा यांनी रैयत असोशिएशन, गुंटूर, संयुक्त प्रांत किसान संघ (१९२४), स्वामी सहजानंद यांची बिहार प्रादेशिक किसान सभा, बंगालमध्ये फजलुल हक यांचा प्रजा पक्ष, पंजाबमध्ये फज्ले हुसैन यांचा युनियनिष्ट पक्ष शेतकऱ्यांच्या हितसंरक्षणाकरीता स्थापन झालेले पक्ष होते.

१९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत शेतकऱ्यांनी उस्युर्तपणे सहभाग नोंदविला. आध्रप्रदेश, संयुक्त प्रांत आणि गुजरात या भागात साराबंदी अंदोलन हाती घेण्यात आले. पंजाबमध्ये शेतकरी संघटना तयार करण्यात आल्या व सारा न देण्यासाठी अंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र, बिहार आणि मध्यप्रांतात जंगल सत्याग्रह करण्यात आला. अशा प्रकारे डॉ. विपीनचंद्रा म्हणतात, "सविनय कायदेभंग चळवळीने शेतकरी चळवळी संघटीत करण्यात महत्वाची भूमिका बजावली. या चळवळीतून एक लढाऊ राजकिय कार्यकर्त्यांची एक पूर्ण पिढी तयार झाली." या नव्या पिढीमध्ये समाजवादी विचारांचा प्रसार होवू लागला होता. त्यामुळे १९३६ मध्ये लखनऊ येथे "अखिल भारतीय शेतकरी काँग्रेस " ची स्थापना करण्यात आली. या नंतर ही संघटना अखिल भारतीय किसान सभा म्हणून ओळखली जावू लागली. या संघटनेचे पहिले अध्यक्ष म्हणून स्वामी सहजानंद आणि सचिप म्हणून एन. जी. रंगा यांची निवड करण्यात आली. १९३६ च्या फैजपूर अधिवेशनाच्या काळात काँग्रेसनेही शेतकऱ्यांची गऱ्हाणी सरकार समोर मांडण्यास सुरवात केली. परिणामी काँग्रेस आणि शेतकरी संघटना जवळ येण्यास मदत झाली.

१९३७-३९ या काळात शेतकरी चळवळीमध्ये वाढ झाली आणि शेतकऱ्यांनी अधिक संघटीपणे सम्राज्यवादी शासन आणि जमिनदारांविरोधात मोहीत उघडली. प्रांतांमधील काँग्रेसी सरकारांनीही कृषी कायद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी ठोस पावले उचलली. मलबार भागात याच काळात शेतकरी संघटना उभ्या राहील्या आणि या संघटनांनी मलबारमधील शेतकऱ्यांमध्ये जागृती घडवून आणणासाठी पयत्न केले. या प्रयत्नांमध्ये पी. रामकृष्ण पिले आणि रामचंद्र नेडूमगडी यांची मोलाची भूमिका होती. अशा प्रकारे आंध्र प्रदेशात शेतकऱ्यांना संघटीत करण्यासाठी एन. जी. रंगा आणि पी. सुंदरैय्या यांनी प्रयत्न केले. बिहारमध्ये जमिनदारी समाप्त च्या घोषणेद्वारे स्वामी सहजानंद, कार्यानंद शर्मा, राहून सांकृत्यायन, पंचानन शर्मा आणि यदूनंदन शर्मा यांनी शेतकऱ्यांना संघटीत केले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात शेतकरी अंदोलनांमध्ये शिथीलता आली. कारण हिटलरने या काळात रशियावर आक्रमण केले. रशियात साम्यवादाचा प्रभाव असल्याने आणि शेतकरी आणि कामगार यांच्या हिताचे तत्वज्ञान असल्याने

शेतकऱ्यांनी आपला मोर्चा फॅसिष्ट तत्वज्ञानाच्या विरोधात वळविला आणि सम्राज्यवाद्यांचे युद्धकाळात समंथन केले. मात्र साम्यवादी नेत्यांमध्ये मतभेद झाल्यामुळे स्वामी सहजानंद आणि एन. जी. रंगा हे नेते शेतकरी संघटनांमधून बाहेर पडले. तरही शेतकऱ्यांचे संघटन टिकवून ठेवण्यात या संघटनांनी महत्वाची भूमिका बजावली.

महायुद्ध समाप्तीनंतर शेतकरी अंदोलनांमध्ये पुन्हा जोश आला. बिहारमध्ये जमिनदारी समाप्त करण्यासाठी संघर्ष सुरु झाला. त्रावणकोर राज्यात पुनप्पा वायलय शेतकरी आणि सरकार यांच्यात हिंसक संघर्ष सुरु झाला. या अंदोलनात जवळपास ८०० लोक शहीद झाले. याच अंदोलनाने त्रावणकोर संस्थान भारतात विलीनीकरणाचा मार्ग मोकळा करुन दिला. तेलंगानातील शेतकऱ्यांनाही यावेळी निजामाविरोधात संघर्ष करावा लागला. छापामार युद्ध पद्धतीने या अदोलनकर्त्यांनी निजामाविरोधात लढा दिला. हा संघर्ष जवळपास ६ वर्ष सुरु होता. रविनारायण रेड्डी आणि पी. सुंदरैय्या यांच्या नेतृत्वात ३००० गावे या अंदोलनाने प्रभावीत झाली.

युद्धोत्तर काळात सुरु झालेले बंगालमधील महत्वाचे अंदोलन तेभागा अंदोलन होते. या अंदोलनकत्यांनी पिकाचा दोन तृतिअंश भाग शेतकऱ्यांना देण्याची मागणी केली. १९४० च्या भुमीकर आयोगाने अश्या प्रकारे हिस्सा पाडण्याची शिफारस केली होती. मात्र जमिनदारांनी कुळांची ही मागणी मान्य केलो नाही म्हणून अंदोलन उभे राहीले. दिनाजपुर, रंगपूर, जलपाईगुडी, रंगपूर, मिदनापूर, खुलना आणि चोबिस परगणा इ. जिल्ह्यामध्ये हे अंदोलन पसरले. या अंदोलनाचे नेतृत्व कृष्ण विनोद राय, अवनी लाहिरी, सुनील सेन, भवानी सेन, मोनी सिंग, विभुती गुहा, समर गांगुली, गुरुदास ताल्लुकेदार यांनी केले. १९४७ पर्यंत हे अंदोलन तिव्र होते मात्र नंतर हळूहळू शांत झाले.

**कामगार:-**

प्राचीन काळापासून भारतात उद्योगव्यवसाय अस्तित्वात होते. भारतात युरोपीयनांचे आगमन भारतातील पक्का माल घेण्यासाठीच झाले होते. मात्र १७ व्या शतकात निर्माण झालेल्या इंग्लडमधील अद्योगिक क्रांतीने भारतातील कुटीउद्योगांना नख लावण्याचे प्रयत्न केले. त्यातून भारत कच्च्या मालाचा उत्पादक देश बनला.

भारतातही काळाच्या ओघात नवे उद्योग सुरु झाले. १८५४ मध्ये मुंबईला कापड गिरणी आणि कलकत्त्यास ज्युट गिरणी सूरु इ पाली. चहा व्यवसायातही शेकडो मजूर कार्यरत होते. कापड उद्योगात १८८६ साली मजूरांची संख्या ७४००० होती. ती १९०५ मध्ये १,९५००० झाली. ज्युट उद्योगातही १८७९-८० मध्ये २७४९४ मजुरांची संख्या होती १९०६ मध्ये ही संख्या १५४९६२ ३ ालली. युरोपीयन देशांमध्ये प्रारंभीच्या काळात मजुरांना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागले त्या समस्या भारतीय मजुरांपुढेही होत्या. या समस्यांना तोड देण्यासाठी मजुरांमध्ये आपल्या हक्कांविषयी जाणिव निर्माण होण्यास सुरुवात झाली होती. आणि कामगारांनी आपल्या संघटना स्थापन करुन संघटीतपणे लढा देण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. या प्रयत्नांचा परिणाम म्हणून

१८९७ मध्ये अमलगेटेड सोसायटी ऑफ रेल्वे सव्व्हेट्स ही संस्था स्थापन झाली. या संघटनेत रेल्वे उद्योगातील वरीष्ठ श्रेणीचे कर्मचारी सहभागी झाले होते. आणि त्यातही बहुतेक अँग्लो इंडीयन होते.

२० व्या शतकाच्या पहील्या दशकात कलकत्त्यात प्रिंटर्स युनियन आणि मुंबईमध्ये पोस्टल युनियन या संघटना स्थापन झाल्या. मात्र या युनियनचे सदस्य संख्येने खुप कमी होते. १९१८ च्या काळात काही बंदही पाळण्यात आले. मात्र यात संघटनेच्या जाणिवांचा अभाव होता. राजकिय दृष्टीने कामगार वर्गात १९१८ पर्यंत जागृती घडून अली नव्हती. मात्र १९१८ मध्ये लोकमान्य टिळकांना अटक झाल्यावर मुंबईच्या गिरणी कामगारांनी केलेला संप उस्फुर्त होता. रशीयाचा साम्यवादी नेता लेनीन याने या घटनेचे स्वागत केले. १९१८ नंतर कामगार वर्गाच्या संघटना निर्माण होण्यास सुरुवात झाली आणि कामगारांमध्ये या काळात राजकिय जागृतीही घडून येण्यास मदत झाली. कारण पहिल्या महायुद्धाच्या काळात मजुरांवर आर्थिक संकट निर्माण इ गले. या कारणाने जर्मनी, आस्ट्रीया, तर्कस्थान, या देशांमध्ये लोकशाहीवादी क्रांत्या घडून आल्या. रशियात समाजवादी क्रांती इ गली या क्रांतीने भारतात मजुरांमध्ये नव्या जाणिवा निर्माण करण्याचे कार्य केले. १९१८

ते १९२० या काळात संपूर्ण देशभरात अनेक संप पुकारण्यात आले. मुंबई, कानपुर, कलकत्ता, सोलापूर, जमशेदपूर, मद्रास आणि अहमदाबाद ही संपाची केंद्रे होती. अशा प्रकारचे संप भारतात पहिल्यांदाच होत होते. मात्र राजकिय जाणिवतून मजुरांनी रौलट कायद्याच्या विरोधात संप पुकारला. ही घटना म्हणजे राजकिय अंदोलनात कामगारा वर्गाच्या प्रवेशाची सुचना होती.

१९२० मध्ये नारायण मल्हार जोशी, लाला लचपतराय, जोसेफ बॅप्टीस्टा यांच्या प्रयत्नामुळे ऑल इंडीया टेड युनियन काँग्रेसची स्थापना झाली. या संघटनेचा उद्देश भारतातील सर्व प्रांतिय संघटनांमध्ये जाणिवा निर्माण करुन त्यांचे एकीकरण करणे हा होता. पहील्या महायुद्धाच्या काळात वस्तुंच्या किंमती वाढल्याने उद्योगपतींना त्याचा प्रचंड फायदा झाला. मात्र मजुरांचे मजुरीचे दर वाढले नाहीत. १९१५ ते १९२४ या काळात ज्यूट कारखान्यांनी सरासरी १४ टक्के लाभांश दिला. पण मजुरांची मजुरी वार्षीक १२ पाँडस् होती. सुती कापडाच्या कारखान्यांनीही सरासरी १२ टक्के लाभांश दिला. याच काळात भारतीय राजकारणाच्या रंगमंचावर गांधींचे आगमन झाले. त्यांनी स्वातंत्र्याची चळवळ अधिक व्यापक बनविण्याचा प्रयत्न केला. त्यादृष्टीने त्यांनी कामगारांना आणि शेतकऱ्यांना चळवळीत सहभागी करुन घेतले. याच काळात १९१९ मध्ये रशियात झालेल्या बोल्शेव्हिक क्रांतीने जगाला साम्यवादाचे धडे दिले. त्यातुन कामगारांमध्ये जागृती निर्माण होवून त्यांनी राष्ट्रीय स्तरावर अशी संघटना स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले. या प्रयत्नांचा परिणाम म्हणून ३१ ऑक्टोबर १९२० रोजी आयटुक ( All India Treade Union Congress) ही संघटना स्थापन झाली. या संस्थेचे पहिले अध्यक्ष म्हणून लाला लचपतराय यांची निवड करण्यात आली. आयटकच्या स्थापनेत नारायण मल्हार जोशी, जोसेफ बॅप्टीस्टा यांचाही मोलाचा वाटा होता. १९२७ पर्यंत आयटकशी ५७ कामगार संघटना संलग्न करण्यात आल्या. या काळात आयटकबर ना. म. जोशीसारख्या उदारमतवादी नेत्याचा प्रभाव होता.

१९२० नंतर साम्यवादी चळवळीच्या प्रभावामुळे कामगारांमध्ये थोडीशी लढाऊ वृत्ती जागृत होण्यास सुरुवात झाली होती. साम्यवादी अंतरराष्ट्रीय संघटनेच्या ४ थ्या अधिवेशनात आयटकला असा निर्देश देण्यात आला केवळ मजूरी या विषयापुरतेच कार्यक्षेत्र न ठेवता आयटकने सम्राज्यवाद आणि भांडवलशाही नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत.

१९२६- २७ मध्ये आयटकमध्ये दोन गट निर्माण झाले. पहिला गट सुधारणावादी होता. त्याला जिनेवा ॲमस्टरडॅम पक्ष असे म्हणत. या गटाची ईच्छा ॲमॅस्टरडॅम येथे कार्यालय असलेल्या इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन (IFTU) या गटाशी संलग्न होण्याची होती. दुसरा गट क्रांतीकारी होता त्याला मास्को गट असेही म्हणत, या गटाला मास्कोडून निर्देशीत होणाऱ्या रेड इंटरनॅशनल लेबर युनियन (RILU) या संघटनेशी संलग्नीत व्हावे असे वाटत होते. एकूणच या सर्व लोकांवर साम्यवादी विचारांचा प्रभाव फारच जास्त होता.इ. स. १९२८ मध्ये देशात अभुतपुर्व औद्योगिक अशांतता होती. एकूण यावेळी २०३ हरताळ पाळण्यात आले. त्यात ५०६८५१ लोक सहभागी झाले. यावळी असे दिसून आले की, या हरताळांच्या मागे आर्थिक उद्दीष्ट नसून राजकिय विचार होते. यावेळी क्रांती या साम्यवादी वृत्तपत्राने असे म्हटले की, "जो पर्यंत भांडवलशाही समाप्त होत नही तो पर्यंत शांतता निर्माण होणार नाही." मात्र या संघटनांचे कोणत्या अंतरराष्ट्रीय संघटनेत सहभागी व्हावे यावर एकमत नव्हते. अखेर आयटकने Pan Pacific Secretariat a Third International या संघटनॅबरोबर सलग्न होण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयाच्या विरोधात जोशीच्या नेतृत्वात मावाळवादी आयटकमधून बाहेर पडले व त्यांनी १९२९ मध्ये अखिल भारतीय ट्रेड युनियन फेडरेशन ही संघटना स्थापन केली.

ट्रेड युनियनची वाढती शक्ती पाहून सरकारने त्यावर कायदेशिर बंधने आणण्याचे ठरविले. त्यादृष्टीने १९२८ मध्ये सरकारने सार्वजनिक सुरक्षितता विधेयक (Public Sefety Bill) आणि कामगार विवाद कायदा ( Treade Dispute Bill) आणण्याचे ठरविले. या कायद्यानुसार रेल्वे, डाक, पाणी आणि विज या सारख्या

सार्वजनिक सवेतील हरताळांसाठी १ महिन्याची पुर्वसुचना देणे बंधनकारक होते. राजकिय कारणांसाठी तसेच पाठींबा म्हणून हरताळ करण्यावर बंदी घालण्यात आली. औद्योगिक क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी चौकशी समितीची आणि लवादाची तरतुद कायदयात होती. कामगार चळवळींवर साम्यवादाचा प्रभाव वाढल्याने सरकारने दडपशाही धोरणांचा अवलंब केला. १९२९ मध्ये आर्यविन सरकारने कामगार चळवळीच्या मुख्य नेत्यांना पकडून खटला चालविण्याकरीता मिरतला आणले. ३१ कामगार नेत्यांवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला. हा खटला ३१/५ वर्ष चालला आणि त्यात मुज्जफर अहंमद, श्रीपाद अमृत डांगे, जोगळेकर, स्पॅट, ब्रेडले आणि उस्मानी आणि इतर नेत्यांना वेगवेगळी शिक्षा ठोठावण्यात आली. १९२९ ते १९३३ या काळात चाललेल्या खटल्याने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले. त्यावर आईनस्टाईन, एच. जी. वेल्स, हेरॉल्ड लॉस्की, रोमांरोला, रुड् ाविल्ट यांच्यासारख्या जगन्मान्य नेत्यांनी टिका केली. १९३३ मध्ये ब्रिटीश ट्रेड युनियन काँग्रेस आणि मजूर पक्षाच्या संयुक्त समितीने मिरत खटल्याचे वर्णन *The Judicial Scandal* असे केले. आरोपीच्या बचावासाठी भारतात डावे आणि उजवे एकत्र आले. त्यांनी व्यापक अधारावर एक केंद्रीय बचाव समिती स्थापन केली. त्यावेळी झालेल्या कापड मजुरांच्या संपामध्ये १ लक्ष मजुर सहभागी झाले.

सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात तर सरकारने कामगारांशी अतिशय कठोर धोरण ठेवले. कायद्याद्वारे आणि आयोग स्थापन करुन कामगारांचा छळ करण्यात आला. परिणामी कामगार नेत्यांमध्ये ऐक्क्याची भावना निर्माण झाली. त्यामुळे विविध कामगार संघटनांचे एकिकरण घडून आले.

१९३७ मध्ये सहा प्रांतात काँग्रेस सरकारे स्थापन झाल्यानंतर कामगार चळवहीला खूप चालना मिळाली. १९३८ पर्यंत कामगार संघटनांची संख्या २९६ झाली. कामगारांप्रती काँग्रेस शासनाचे धोरण सहानुभुतीपूर्ण होते. या काळात सर्वात यशस्वी संप कानपुरच्या कामगारांनी केला. हा संप ५५ दिवस चालला. या संपामध्ये ४०००० कामगारांनी सहभाग घेतला. त्यावर सरकारने कानपुर कामगार चौकशी समिति नियुक्त केली. या समितीचे अद्यक्ष राजेंद्रप्रसाद होते. अशा प्रकारे बिहार, मुंबई, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश शासनांनीही चौकशी समीत्या नियुक्त केल्या. ज्यांनी कामगारांच्या कल्याणाकरीता काही शिफारशी सुचविल्या. काही कल्याणकारी कायदेही करण्यात आले. काही कायदेही करण्यात आले. त्यात मुंबई औद्योगिक विवाद कायदा, मुंबई गुमास्ता कायदा, मध्यप्रदेश प्रसुती कायदा, बंगाल प्रसुती कायदा, इ. U

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पुन्हा वस्तूंच्या किंमती वाढल्या मात्र मजुरीच्या दरात वाढ झाली नाही. १९४० मध्ये देशात खूप मोठे संप झाले मात्र कारण देशातील स्पोटक परिस्थितीचा प्रभाव कामगार संघटनांवरही पडला. १९४० मध्ये आयटकने एक ठराव करुन सम्राज्यवादाप्रती आणि फॅसिष्टवादाप्रती सहानुभुती दर्शविण्यास नकार दिला. असही प्रतिवाद करण्यात आला की, ज्या युद्धामुळे भारताला स्वातंत्र्य मिळणार नाही आणि कामगार वर्गाचा कोणताही फायदा होणार नाही त्या युद्धात भारताने सहभागी होणे निरर्थक आहे. साम्यवादापासून जहाल लोकशाही नेता बनलेल्या मानवेंद्रनाथ रॉयने आयटकपासून वेगळे होवून सरकारचे समर्थन करणारी इंडीयन फेडरेशन ऑफ लेबर नावाची संघटना स्थापन केली. त्याचे बक्षिस म्हणून सरकारने या संघटनेला दरमहा १३००० रु. अनुदान जाहीर केले. रशियावर आक्रमण झाल्यापासून साम्यवादाच्या प्रभावाखाली असलेल्या गटाने सरकारचे समर्थन करणे सुरु केले.

सरकारचे समर्थन केल्यामुळे साम्यवाद्यांवर अविश्वसनियतेचा ठपका बसला., मात्र तरही राष्ट्रीय नेत्यांना आयटकचे नेतृत्व आपल्या हातात घेता आले नाही. परिणामी बल्लबभाई पटेलांनी इंटुक (INTUC) नावची स्वतंत्र्य संघटना स्थापन केली. अशा प्रकारे स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी कामगार चळवळही राजकिय विचारांच्या अधारावर विभाजीत झाली.